# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar.**

वर्ष ४६] आकोला—सोमवार तारीख ६ माहे मे सन १९१२ ई० [ अंक १८


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचना:- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पावडें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

#### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्याक.

हा बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अगर बाकी इसमास अ- त्यापैकीं मरनाचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप- याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips.
आकोला २।१०।११ एजंट
नं १

#### मुंबई बँकेचें सोनें

मुंबई बँकेचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकेच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपेचें वजन २६३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१.९.१० एजंट
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं.

### सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात, माल काळजीपूर्वक

वक्शीर व्ही. पी. नें पाठवू. मालाच खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
आदितवारपेठ, नासिक
श्री राधावल्लभाजयांत

## वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा हिसाबरा काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा १। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ता:—
गोस्वामी राधामोहन शर्मा
नं ४ चित्तावाना आगरा.

## नोटीस

सर्वत्र लोकास या नोटिशीचे द्वारें जाहीर करण्यांत येत आहे कीं, जनाब चीफ कमशनर साहेब बहादूर मध्यप्रांत यांच्या जुडीशियल डिपार्टमेंट नोटिफिकेशन नंबर १९०३ तारीख १८ सप्टेंबर १९११ यांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांनीं निकाल केलेल्या मिसलांची व्यवस्था, रक्षण व नाश या संबंधानें नोटिफिकेशन नंबर ३५६३ ता० २६ मार्च सन १९०६ मध्यें जे नियम प्रसिद्ध केले गेले आहेत त्या नियमा- नुसार ता० २६ मार्च १९०६ चे पूर्वींचे सर्व नियम रद्द समजले जाऊन पूर्वींच्या जुन्या मिसलांची व्यवस्था केली जाईल करितां सर्व लोकास कळविण्यांत येतें कीं ज्यांनीं ज्यांनीं जुन्या मिसलामध्यें महत्वाचे कागद दाखल केले असतील ते परत घेण्या कारतां ता० १ मे सन १९१२ चे आंत आमचे कोर्टांत अर्ज दाखल करून आपले कागद परत घेऊन जावें असें न केल्यास सदरहू कागदांचा नवीन नियमा- प्रमाणें नाश केला जाईल. कळावें.

अकोला
ता० १७ जानेवारी १९१२ इ.

A. D. Barr.
डिस्ट्रिक्ट व सेशनजज्ज
नो० नं० ४४ पश्चिम वऱ्हाड

## खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

### जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला

यांचे दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाळ | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळ्या | ” | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | ” | २ |
| क्षोभ्रलेहाच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | ” | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १५ |
| त्रिभूवन किर्ती | ” | ॰ |
| श्वास कुठार | ” | ॰ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | ॰ |
| समिर पन्नग | ” | ८ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ८= |
| डोळ्यांचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ॥. |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ॥= |
| मध्यम | ” | ।-॥ |
| लहान | ” | ८= |
| उमाचा शिर्का | ” | ।= |
| मध बाटली | | |
| मोठा | ” | ।= |
| लहान | ” | ८=॥ |
| सिनमावर तेल | ” | .॥. |
| ग्लिसराईन बाटली. | | ८= |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ८=॥ |
| शरबतादूर. | तोळा | ॥. |
| कुंवल्यादि वटी | ” | .॥ |
| हिंगणबेटाचे तेल | ” | ८= |
| नारायण चूर्ण | ” | ८= |
| इसबगोल तुपाचा दपट | | ८= |
| ग्रहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | •= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ८= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.

ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला.

## नोटीस

नोटीस माधो वल्लद सोमा पाटील चोपडे राहणार दभाडी ता० मलकापूर

यास:—

खालीं सही करणार इजकडू व नोटीस देण्यांत येतें कीं तुझांस लग्नाची बायको असून तुह्मी मजला गंधर्वानीं केले त्यावेळेस तुमचा माझे आईबापाशीं असा करार होता कीं मी माझी लग्नाची बायको इस फारकती देऊन घराचे बाहेर काढून देतों असे तुह्मी बोलून आपण सेलापूर येथें जाऊन दोन रुपयाचा स्टांप आणून तो टाकरखेड मुक्कामीं सीताराम पांडु पाटील याचे घरीं लिहिला व त्यांत अशी शर्त व करार लिहून दिला होता कीं मी माझी लग्नाची बायको आणणार नाहीं आणील तर डागिन्यासह हीच फारकत समजावी असें लिहून दिलें आणि माझ्याशीं गंधर्व लावलें. गंधर्व लावल्यावर तमचे येथें ५ वर्षे राहीली आणि आनंदानें संसार केला. त्यानंतर तुह्मी आपली लग्नाची बायको घेऊन आणात व माझे अंगावरील डागडागिनें व कपडेलत्तें काढून घेऊन मजला माझे आईबापाचे घरीं ह्मणजे टाकर- खेडचें जगल्यांत आणून सोडून दिलें व आपण तसेच आपले गांवीं मचरी आले असा तुह्मी माझ्याशीं विश्वासघात केला त्यानंतर मी आपले आईबापाचे घरीं राहून सावकाराचे कर्ज काढून आज आठ महिने झालें मी माझे पोट भरीत आहे. साव- काराचे कर्ज आजपावेतों ६० रुपये झाले आहे. मजला आतां कोणी कर्ज देत नाहीं तर आतां या नोटीशीनें कळविते कीं हा नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत माझे कर्ज सावकारास देऊन व तुमची लग्नाची बायको इस फारकती देऊन मजला आपले घरीं नांदावयास घेऊन जावें असे आपण न केल्यास हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करील मग तुमचा माझेवर व गंधर्वाच्या नवऱ्यावर कोणतेच प्रकारचा हक्क चालणार नाहीं. या उपर आपण माझ्याशीं विश्वास देऊन माझ्या बापाजवळून पंचा समोर तो दस्त- एवज आपण घेऊन गेला तो पुन्हा माझे बापा जवळ आणून दिला नाहीं तर आतां विश्वासघात केल्याबद्दल व माझे डागिन्याबद्दल कायदेशीर व्यवस्था केली जाईल कळावें. ता० २६।४।१२

सही

तारी मर्द माधो चोपडे राहणार टाकरखेड तर्फे बाप मुकुंदा वल्लद शामा पाटील बगळ रा० टाकरखेड
नि० आंगठा.

नो० नं० २२४

वऱ्हाडसमाचार.

वैशख वद्य ६ शके १८३४ परिधावी

## दान.

आपल्या हिंदुशास्त्राची आज्ञा आहे कीं घरीं अतिथि आला असतां त्याची सेवा करावी, व यथाशक्ति द्रव्यदान करून त्याची इच्छा तृप्त करावी. तसें केल्यानें त्या अतिथीनें संचित केलेल्या पुण्याचा अंश यजमानाला मिळतो. देव मुद्धां कधीं कधीं अतिथीच्या रूपानें येतात, यासाठीं अतिथीला विन्मुख करूं नये, ही चाल अद्यापही जुन्या समजुतीच्या लोकांत रूढ आहे. कोणाही हिंदूच्या घरीं--विशेषतः दोन प्रहरच्या वेळीं-भिकारी गेला असतां मूठभर तांदूळ, बाजरी, ज्वारी कांहींना कांहीं तरी त्याला घालतातच. ही मूळची दानाची पद्धति अतिशय चांगली होती. तिच्या योगानें पुढें आळशी लोकांना उत्तेजन मिळून मूळच्या सद्रीतीचा दुरुपयोग होऊं लागला हा त्या मूळच्या चालीचा दोष नाहीं. हा दोष आमचा आहे. आह्मी त्या चालीला इष्ट वळण वेळींच लाविलें नाहीं, मागून आली तीच रीत पुढें चालविली याबद्दल जर कोणी जबाबदार असतील तर ते आमचे पूर्वज नव्हत, तर आह्मी आहों. कारण हिंदुशास्त्रांनीं जरी दानाची महती गाइली आहे तें तरी दान पात्रापात्रतेचा विचार न करतां करावें असें शास्त्रकारांचें मुळींच ह्मणणें नाहीं. उलट त्यांनीं दानाचे सात्विक, राजसिक, आणि तामसिक असे तीन वर्ग करून त्यांच्या उच्चतेच्या पायऱ्या ठरवून टाकिल्या आहेत. ‘दातव्यमिति यद्दानं दीयते नुपकारिणे। देशे कालेच पात्रेच तद्दानं सात्विक स्मृतम्’ थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे यथाकाल, यथोचित व पात्रापात्रतेचा विचार करून केवळ कर्तव्यबुद्धीनें निष्कामतः केलेलें जें दान तें सात्विक ह्मणजे उत्तम होय. कोणत्याही काळांतली व राष्ट्रांतली दानाची कल्पना याहून उच्चतर असेल हें संभवनीयच नाहीं. इतक्या उच्च प्रतीच्या आदर्शाला सगळ्यांनाच जातां येणें शक्य नाहीं. ह्मणून शास्त्रकारांनीं त्याच्या खालची पायरी राजसदानाची ठेविली आहे. भगवद्गीतेंत राजसदानाची लक्षणें सांगितलीं तीं अशीं- ‘यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः। दीयतेच परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्’ ॥ या दानांत स्वतःच्या लाभाचा संबंध आला, ह्मणून त्याची पायरी खालीं लागली. याच्याही खालच्या पायरीचें ह्मणजे अत्यंत निकृष्ट दान ह्मणजे तामस दान होय. भगवान् श्रीकृष्ण ह्मणतात. ‘अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते। असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम्’ ॥ पैहल ह्मणजे सात्विक दान हें खरें परोपकारबुद्धीचें व पुण्यदायक दान होय. दुसरें दान ह्मणजे निवळ दुकानदारी-आपणास कांहीं लाभ होईल या आशेनें केलेलें व तिसऱ्याला अचरटपणाचें अथवा मूर्खपणाचें हवें तर ह्मणावें.

आमच्या शास्त्रकारांचा दानाचा उच्च आदर्श सध्याच्या काळच्या सुधारलेल्या राष्ट्रांतल्या दानाच्या आदर्शाहून कोणत्याही प्रकारें कमी नाहीं हें विचारकरणारास सहज दिसून येईल. शास्त्रकार येथेंच थांबले नाहींत. दानाला पात्र कोण, अपात्र कोण याचीही त्यांनीं मीमांसा केली आहे. विद्या किंवा तप साधण्यासाठीं झटणारीं, सदाचरणी, माणसें यांचा पहिला नंबर. कारण, अशीं माणसें समाजाचें हित करणारीं असतात. त्याच्या खालोखाल दानाला पात्र ह्मणजे रोगी, लंगडे, लुले, वगैरे होत हे आपल्या मागील जन्मीच्या कृतकर्माचीं फळें भोगीत असतात, तेव्हां त्यांना मदत करणें ह्मणजे ईश्वरी नियमाच्या विरुद्ध नाण्यासारखें आहे असा आक्षेप घेण्यांत येत असतो. पण या आक्षेपांत तथ्य नाहीं. कर्मभोग कोणाला सुटत नाहींच. आह्मी येवढेंच करतों कीं रोग्याला आपलीं कर्मफळें भोगण्याची रोगादिकारणांमुळें जी अक्षमता आली असते ती दूर करतो. या पलीकडे आह्मी कांहीं करीत नाहीं. अशा लोकांना दान दिल्यानें दात्याच्या मनावरही एक प्रकारचा उच्च संस्कार अजिबात घडत असतो. प्रकृति व आपण एक आहों, प्रकृतीचाच एक अंश आपण आहों, प्रकृतीच्या इतर अंशाचीं-इतर मनुष्यादि प्राण्यांचीं-सुखदुःखें तीं आपलींच आहेत अशी सहानुभूतीची कल्पना मनांत जागृत होण्याला व त्यापासून मनाची शुद्धि होण्याला पंगू वगैरे लोकांना केलेल्या दानाचा फार उपयोग होतो. सारांश, अशा प्रकारें हें दान समाजाला हितपरिणामी होत असतें. अलीकडे समाजहिताच्या दृष्टीनें कोणत्याही गोष्टीची चांगली वाईट पारख लावणारे जे समाजशास्त्रज्ञ आहेत त्यांच्या दृष्टीनें आमच्या दानतत्वाचा विचार केला तरी तें शुद्ध शास्त्रीयतत्वाच्या अढळ पायावर बसविलेलें आढळून येईल. प्रत्यक्ष व्यवहार पाहिला तरी तेथेंही हेंच दृष्टीस पडतें. पूर्वीं विद्वान, तपोधन व सच्छील ब्राह्मणांस दानें देत आतां स्कॉलरशिपा ठेवून, लायब्ररया काढून, वाचनमंदिरें उभारून, तेंच कार्य कार्नेगीसारखे दाते करीत आहेत. पूर्वीं बौद्ध राजांनीं माणसाकारितां दवाखाने घातलेच, पण पशुपक्षी व इतर प्राणी यांच्या रोगनिवारणार्थही दवाखाने घातल्याचीं उदाहरणें आहेत. अजून सुद्धां आमच्यांत पांजरपोळासारख्या भूतदयाविशिष्ट संस्था आहेत. सारांश, दानाचा आमचा प्राचीन उच्च आदर्श आमचेपाशीं अद्याप आहे. मात्र तो मलिन झाला आहे, आणि ह्मणून त्या दानाचें फळ आमच्या पदरांत पडावें तसें पडत नाहीं. आमचें हल्लींचें बहुतेक दान काम्यक असतें, निष्काम नसते. आणि आमच्या अपेक्षेप्रमाणें दानाचें फळ मिळालें नाहीं ह्मणजे आह्मी लागलीच निराश होतों. पण हें दुकानदारीचें दान हा आमचा खरा आदर्श नाहीं. आमचें आदर्शदान ह्मणजे सात्विक दान होय, आणि तें ज्या मानानें देशांत ज्यास्त प्रसृत होईल त्यामानानें देशांत खरी नर व नारी रत्नें निर्माण झालींच पाहिजेत पण सध्यां आह्मी या आदर्शापासून किती भ्रष्ट-किती दूर-झालों आहों याची आमची आह्मांलाच चांगलीशी कल्पना नाहीं. त्यामुळेंच आमची आजला ही दशा आहे.

## अबकारी रिपोर्ट

देशी दारू आणि गांजा यांच्यामध्यें एक प्रकारची चढाओढ लागली आहे असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आमच्या प्रांताच्या अबकारी रिपोर्टावरून दिसतें. देशी दारूची गति सध्याच्या काळीं अव्याहत आहेच. पण कोठें एखाद दुसरा कोपरा मदिरा बाईला प्रवेश करण्यास दुर्गम वाटला तेथें गांजेबावानें ठाणें देऊन अबकारीखात्याचें उणें दिसूं दिलें नाहीं. मनुष्य एकदां व्यसनाधीन झाला ह्मणजे त्याच्या विवेकाची राखरांगोळी होते आणि ठराविक व्यसन सुलभ नसलें तर त्यासारखें दुसरें व्यसन लावून घेण्यास त्याचें मन सहज तयार होतें. यासाठीं प्रजाजन व्यसनाधीन होणार नाहींत अशी खबरदारी घेणें हें राज्यकर्त्यांचें कर्तव्य समजलें जातें, आणि यासाठींच चांगले अधिकारी असतात ते द्रव्यहानि झालेली राहतील, पण प्रजेच्या नीतिमत्तेची हानि झालेली त्यांच्यानें पाहवत नाहीं; या साठीं १९१०-११ सालच्या अबकारी रिपोर्टांत गांजाचा खप कमी झाला ह्मणून उत्पन्नाच्या दृष्टीनें अधिकाऱ्यांनीं जें असमाधान वाटत आहे तें आमच्यामतें बरोबर नाहीं मादक पदार्थाचें सेवन कमी झाल्यामुळें सरकारचें उत्पन्न कमी झालें तर प्रजेची नीतिमत्ता तितकी वाढल्याबद्दल अधिकाऱ्यांनीं उलट संतोषच प्रदर्शित करावयास पाहिजे.

## कापसाच्या लागवडींत सुधारणा.

हिंदुस्थानच्या एकंदर शेतीखात्याचे डायरेक्टर जनरल मि० काव्हेन्टरी यांनीं कापसाच्या लागवडींत सुधारणा करण्याविषयीं सरकारचे प्रयत्न कसकसे सुरू आहेत या विषयींची माहिती नुकतीच प्रसिद्ध केली आहे तिजवरून असें कळतें कीं सदर प्रयत्नाला मद्रास इलाख्यांत बरेंच चांगलें यश येऊं लागलें आहे. तिकडे कारूनगानी नांवाची कापसाची उच्च प्रतीची जात लावून पाहिली. या कापसाला भावही चांगला आला. दुसरी कांबोडिया नांवाची जातही गुणानें अमेरिकन कापसाच्या बरोबरीची असून लिव्हरपूलच्या बाजारांत तिला मागणी आहे. शिवाय दरेक बिघ्यास देशी कापसाच्या पिकाचें जें प्रमाण होतें त्याच्या चौपट कांबोडिया कापूस पिकला. यामुळें मद्रासकडच्या शेतकऱ्यांची श्रद्धा त्या कापसावर बसली आहे आमच्या वऱ्हाड प्रांतांत उत्तम जातीच शुद्ध सरकी लागवडीस मिळावी ह्मणून शेतकऱ्यांसाठीं जागोजाग आडतीचीं दुकानें घालण्याचा सरकारचा विचार आहे. या दुकानामार्फत बारा हजार बिघ्यांच्या पेरणीला पुरेल इतकी सरकी पुरविण्यांत येईल. हीं अडतीचीं दुकानें सरकार आपल्या मालकीचीं काढणार नसून शेतकरी वर्गांकडूनच पण स्वतःच्या देखरेखीखालीं काढणार आहे असें कळतें. मि. काव्हेन्ट्री यांनीं दिलेल्या माहितीवरून कापसाच्या लागवडींतली सुधारणा सद्यःफलदायी होण्याचा फार संभव दिसतो, व फायदा प्रत्यक्ष दिसत असूनही ती सुधारणा उचलावयाची नाहीं इतका मट्ठ किंवा दुराग्रही आमचा शेतकरीवर्ग नसल्यामुळें हिंदुस्थानच्या कापसाच्या भाग्योदयाचा काळ समीप आला आहे असें पाहून समाधान वाटतें.

## लष्करा हुद्याच्या जागा.

गतवर्षीं जर्मनीचे बादशहाचे ज्येष्ठ चिरंजीव हिंदुस्थानांत आले होते त्यावेळीं त्यांच्या बरोबर आलेल्या एका जर्मन प्रोफेसरानें नुकतेंच आपल्या एका भाषणांत हिंदुस्थानाविषयीं बोलतांना असें आश्चर्य प्रदर्शित केलें कीं फक्त सत्तर हजार गोरें सैन्य हिंदुस्थानच्या तीस कोट लोकांचा बंदोबस्त कसा काय राखतें! हिंदुस्थानच्या लोकांची शांत प्रकृति, त्यांची धार्मिकता, त्यांची अहिंसावृत्ति इ० विशेष गुणांची ज्याला माहिती नाहीं त्याला हें आश्चर्य वाटणें साहाजिक आहे. विशेषतः युरोपांतल्या युरोपांत प्रत्यक्ष स्वजातीय व स्वधर्मी लोकावर राज्य करावयाचें असून हिंदुस्थानांतल्या चौपट सैन्य सर्वदा सज्यात ठेवल्यावांचून ज्यांचें चालत नाहीं, त्यांना तर हिंदुस्थानचा हा प्रकार केवळ ईश्वरी करणीसारखा अद्भुत वाटतो व कित्येक याबद्दलचें सगळें श्रेय इंग्रजी राज्यकर्त्यांना देतात. आज कित्येक शतकांत इंग्रजांसारखे राज्यकर्ते हिंदुस्थानाला लाभले नाहींत ही गोष्ट खरी आहे आणि असे उदार व ज्ञानदाते प्रभु ईश्वराच्या कृपेनें मिळाल्याबद्दल हिंदुस्थान स्वतःला धन्य समजतो तेंही योग्यच आहे. तथापि खेदाची गोष्ट येवढीच आहे कीं इतके चांगले प्रभु व इतकी शांत व न्यायप्रियप्रजा यांचा योग्य परमेश्वरानें घडविला असतां लष्करांतल्या व पोलीस खात्यांतल्या मोठाल्या हुद्यच्या जागा हिंदुस्थानच्या लोकांना न देण्याइतका प्रजेविषयींचा गैरविश्वास इंग्रज राज्यकर्त्यांचे ठायीं कां असावा? आह्मांला वाटतें कीं यातलें इंगित येवढेंच आहे कीं ज्यांच्या हातीं हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें येतात ते बहुतेक अधिकारी हिंदुस्थानाविषयीं माहितगार नसतात. लोकांचा व त्यांचा संबंध कचित् न येतो त्यामुळें लोकांचीं अंतःकरणें त्यानीं ओळखलेलीं नसतात, आणि त्यामुळें त्यांना वाटतें कीं हिंदुस्थानांतलें ब्रिटीश राज्य गोऱ्या सैन्याच्या बंदुकीच्या बळावर निर्विघ्नपणें चाललें आहे व चालवितां येईल. ही चुकीची समजूतच वरील गैर विश्वासाच्या मुळाशीं आहे. आणि ही भ्रामक समजूत दूर झाल्याशिवाय लष्करी हुद्याच्या जागा देशी लोकांना मिळणें शक्य नाहीं.

## लॉर्ड मिंटो यांची प्रशंसनीय सूचना.

सुदैवानें हिंदुस्थानांत अत्यंत बिकट आणि आणीबाणीच्या व अशांतीच्या प्रसंगीं राज्यसूत्रें चालविणारे लॉर्ड मिंटोसारखे मुत्सद्दी आज विलायतेंत असें जोरानें सांगत आहेत कीं हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली अशांतीची

लाट ही हिंदी लोकांच्या न्याय्य व वाजवी महत्त्वाकांक्षा इंग्रजसरकारनें आज पर्यंत पुरविल्या नाहींत यामुळें निर्माण झाली व त्या महत्त्वाकांक्षा पुरविण्यास सुरुवात होतांच ती शांत होऊं लागली आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं दोनतीन वर्षांपूर्वी ज्या उदारपणाच्या सुधारणा घडवून आणिल्या, त्यांत लॉर्ड मिंटो साहेबांची मोठीच मदत होती ही गोष्ट सर्वश्रुत आहेच. पण नुसत्या मुलकी बाबतींत लोकांवर हळूं हळूं विश्वास टाकावयाचा, आणि लष्कराचीं दारें तशींच बंद ठेवावयाचीं अशानें लोकांची आपणावर राज्यकर्ते विश्वास टाकीत आहेत अशी खात्री होणें शक्य नाहीं. येवढ्या साठीं लष्करांतल्या व खात्यांतल्या हुद्याच्या जागा देशी लोकांना खुल्या ठेवा असें त्यांचें सांगणें आहे. लॉर्ड मिंटो यांची दुसरी अशी एक सूचना आहे कीं देशी शिपायांच्या पलटणींवर हल्लीं गोरे अधिकारी असतात, ते काढून त्या सबंध पलटणी देशी अधिकाऱ्याच्या ताब्यांत द्याव्या, ह्मणजे देशी लोकांवर आपण किती विश्वास टाकतों हें त्यांना कळून आपल्यावरील जबाबदारी ही ते ओळखूं लागतील. लॉर्ड मिंटो यांची प्रशंसनीय सूचना हिंदुस्थानची कांग्रेस आज पंचवीस वर्षें करीत आली आहे, पण तिकडे आजवर कोणीं लक्ष दिलें नाहीं. राष्ट्रसभेच्या बाकीच्या मागण्या जशा लॉर्ड मिंटो साहेबांच्या कारकीर्दीत थोड्या फार अंशांनीं देण्यांत आल्या, त्याप्रमाणें या लष्करी जागा देण्याचेही बाबतींत ह्यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या मुत्सद्यांचे ह्मणण्याचा सरकार लवकर विचार करील व ब्रिटिश सरकारकडून लवकर ह्मणा, उशीरा ह्मणा, पण न्याय मिळतोच मिळतो असा ग्रह हिंदी प्रजेच्या मनांत स्थापित करील अशी आह्मांस आशा आहे.

---

## गळिताचीं धान्यें.

गेल्या सातआठ वर्षांत हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या गळिताच्या धान्याचा निकास दुपटीहून अधिक वाढला आहे. सन १९०४-०५ सालीं २५। लक्ष टन वजनाचीं हीं धान्यें परदेशीं गेलीं होतीं. तींच १९१०-११ मध्यें जवळ जवळ ६० लक्ष टन गेलीं! इतका वाढवा झाला आहे तरी हिंदुस्थानांतून गळिताचीं धान्यें विलायतेंत येतच नाहींत अशी तेथील मतलबी व्यापाऱ्यांची ओरड आहेच! वस्तुत इतकीं धान्यें तरी इकडून तिकडे कां जावींत? हा एवढा कच्चा माल इकडून जाऊन तिकडे त्यांचें वारनिसें, रंग, औषधें, साबण, मेणबत्त्या वगैरे जिन्नस तयार होतात, आणि ते करण्यांत विलायती कारखानदाराची चंगळ होऊन देशी मजूर मात्र उपाशी मरतात. पण असें कां व्हावें? इकडून जाणारीं गळिताचीं धान्यें ह्मणजे तीळ, जवस, भुईमूग, सरकी, एरंड्या, व अफू हे जिन्नस दाबून त्यांचें तेल काढणारीं यंत्रें व कारागिर इकडे आणवून इकडेच तेलाचे मोठाले कारखाने काढले तर तीन चतुर्थांश नफा तरी आमच्या लोकांच्या पदरांत खास पडेल. येथें नुसतां पैशाचाच प्रश्न नाहीं तर हा सगळा कच्चा माल विलायतेला गेला ह्मणजे आमच्या कारखानदारांचा नफा बुडतो, मजुरांची मजुरी जाते; शिवाय या जिनसांची पेंड गुरांना खाण्याला मिळावयाची ती न मिळाल्यामूळें दूधदुभतें कमी होतें; जमिनीला यांच्या पेंडीचें कसदार खत न मिळाल्यामुळें तिच्या सुपीकपणाला धक्का पोंचतो; व या शिवाय कच्चा माल नेण्यांत व पक्का माल विलायतेहून आणण्यांत दलाल, व्यापारी, गलबताचे मालक, वगैरे लोकांचा नफा आणि नासधुसीमुळें होणारें नुकसान हीं सगळीं आमच्या अंगावर येऊन पडतात. अफु, एरंडी, मोहो, भुईमुग, जवस, सरकी इत्यादि पासून तेल काढण्याचे कारखाने इकडे चालू केल्यास त्यांपासून खाण्यासारखें उत्तम तूप, व जमिनीला उत्तम खत मिळून शिवाय साबण, वारनिशें, मेणबत्या, रंग इ० पदार्थांचे कारखानेही इकडे चांगले चालतील. आमच्या लोकांचें लक्ष इकडे हळूं हळूं लागूं लागलें आहे व सरकीच्या तेलासारख्या गिरण्या येथल्या येथें निघत आहेत हें पाहून आह्मांस संतोष वाटतो तो यासाठींच. अजून लोकांच्या डोळ्यांवरचें अज्ञानाचें जाड पटल दूर झालेलें नाहीं, तथापि ज्ञानाच्या किरणांचा नंतुप्रवेश तरी झाला हीं भाग्याची गोष्ट ह्मटली पाहिजे.

---

## राज्यक्रान्ती नंतर

हिंदुस्थानचे माजी स्टेटसेक्रेटरी लॉर्ड **मॉर्ले यांनीं एकदां** असें ह्मटलें होतें कीं शीतकटिबंधांतल्या लोकांचा लोकरी कोट जसा उष्ण कटिबंधांतल्या घामोघाम होणाऱ्या कामकऱ्याला उपयोगाचा नाहीं, तशी प्रजासत्ताक राज्य व्यवस्था ही थंड प्रदेशांतल्याच राष्ट्रांना उपयोगाची आहे, प्राच्य राष्ट्रांना ती हितावह नाहीं व त्यांना ती व्यवस्था सुरळीतपणें ठेवतांही येणार नाहीं. वयोमानाबरोबर मनुष्याच्या अंगीं थोडासा दुराग्रह व अहंपणा येत असतो तो क्षम्य मानिला तरी लॉर्ड मॉर्ले साहेबांच्या वरील विधानांत असत्याचा व अदूरदृष्टीचा पुष्कळच अंश आहे ही गोष्ट चीनच्या परवाच्या राज्यक्रान्तीनंतरच्या इतिहासानें सिद्ध केली आहे. चीनदेश आज सहस्त्रावधि वर्षें राजसत्तेखालीं होता. जसा एक मुखी रुद्राक्ष असतो तशी चीनची राज्यसत्ता एकमुखी होती. राजा करील तें प्रमाण होते. अशा राज्यसत्तेखालीं वाढलेल्या राष्ट्रानें राज्यसत्ता झुगारून देण्याचें चिन्ह दाखविल्याबरोबर आतां चिनांत प्रळयकाळ येऊन ठेपला अशी ओरड करणारीं युरोपियन पत्रें आतां तेथें मुकाट्यानें सगळी व्यवस्था सुयंत्रित लागत आहे हें पाहून आपलीं तोंडें लपवून बसलीं आहेत! चीनमध्यें राज्यक्रांति होतांच मुंबईच्या टाइम्सचे खास बातमीदार तेथें जाऊन थडकले, आणि त्यांनीं जें पत्र तेथल्या स्थितीसंबंधाचें लिहिलें त्यावरून चीनचें राज्यशांतीचें राज्य होतें तें आतां सैतानाचें होणार असें भय वाटण्यासारखें हिडिस चित्र त्या पत्रांत होतें. पण खरा प्रकार किती उलट आहे पहा! या राज्यक्रांतीच्या मुळाशीं राजघराण्याचा द्वेश हा नसून राष्ट्राच्या प्रगतीविषयींची उत्कंठा, श्रेष्ठ प्रतीची देशसेवा करण्याची हौस, व्यवस्थितपणा, शांततेची आवड, व स्वार्थत्यागाविषयींची तत्परता इ० बहुमोल गुणांचा तिला पाठिंबा आहे हें आतांपर्यंतच्या अनुभवावरून व्यक्त झालें आहे. आतां टाइम्सपत्रांत चीनसंबंधाचीं पत्रें येणें बंद झालें आहे.

---

## बुद्ध आणि श्रीशंकराचार्य

गेल्या वैशाख शु १५ चा दिवस ह्मणजे गौतमबुद्धाला बुद्धत्व प्राप्त झाल्याबद्दल उत्सवाचा, व त्याबरोबरच बौद्धधर्माचा नायनाट करून उपनिषत् प्रणीत अद्वैत वेदांतमताचा प्रचार करणाऱ्या श्री आद्यशंकराचार्यांच्या पुण्यतिथीचाही होता ही घटना अपूर्व होती! गौतमबुद्धाला होऊन अडीच हजारांवर वर्षें होऊन गेलीं, तथापि त्याचें चरित्र व धर्ममतें यांच्यावर इतिहासाचा प्रकाश पडावा तसा अद्याप पडला नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे. कारण जो थोडा बहुत प्रकाश पडत चालला आहे तो नवीन अद्भुत तत्त्वें उजेडांत आणित आहे. पूर्वीं एके काळीं पाश्चात्य पंडितांची अशी समजूत झाली होती कीं बुद्ध हा ऐतिहासिक नसून कोणी तरी काल्पनिक पुरुष असावा; पुढें त्याचें ऐतिहासिकत्व सिद्ध झालें तरी तो नास्तिक, शून्यवादी, पाखंडीमताचा होता ही समजूत दृढ होऊन बसली, आणि अद्यापही बहुतांशीं हीच समजूत अद्याप दृढ आहे! तसेंच श्री शंकराचार्यांचीं मतें व बुद्धाचीं मतें हीं दोन ध्रुवांसारखीं परस्पर अगदीं विरूद्ध असल्यामुळें आचार्यांनीं बुद्धाच्या मताचें खंडन करून व हिंदुराजाकडून बौद्धांचा छळ करून त्यांना हिंदुस्थानाबाहेर घालवून दिलें असेंही विद्वान् लोक अद्याप समजतात. वस्तुतः हा सारा भ्रम आहे. बुद्ध आणि शंकराचार्य यांचीं मतें बहुतेक सारखींच होतीं. आचार्यांनीं खंडन केलें तें बुद्धाच्या मतांचें नसून त्याच्या नांवाखालीं त्याच्या पश्चात् हजारों वर्षांनीं पिकल्या जाणाऱ्या अन्य संप्रदायांच्या मतांचें होतें. बौद्धांनीं हिंदूचा किंवा हिंदूंनीं बौद्धांचा छळ केला या विधानाला विशेषसा आधार नाहीं. बुद्ध हा नास्तिक किंवा शुन्यवादी नव्हता, आणि त्यानें आपली ब्राह्मणधर्माशीं कधीं फारकतही करून घेतली नव्हती. बुद्ध आणि त्याचा धर्म या संबंधानें लोकांच्या समजूतींत येवढी क्रांति घडवून आणणारा पुरावा पालीग्रंथांतून आहे. पण त्या भाशेचें अज्ञान, शोधक बुद्धीचा अभाव, वगैरे अनेक कारणांनीं तो आतांपर्यंत पुढें आला नव्हता. आतां पाली भाषेच्या अध्ययनाकडे सुशिक्षितांची प्रवृत्ति होऊं लागल्यापासून आमचा खरा इतिहास बाहेर येऊं लागला आहे. बुद्ध आणि शंकराचार्य हे परस्पर विरूद्ध मताचे असते. तर बुद्धाला आमचे हिंदुलोकांनीं दशावतारांत स्थान दिलें नसतें. बुद्धाची दशावतारांत गणना हें आजपर्यंत मोठें कोडें होतें तें आतां सुटेल अशी आशा वाटूं लागली आहे. या संबंधांत ता० १ मे च्या 'ज्ञानप्रकाश' पत्रांत 'बुद्ध व त्याचा धर्म' या विषयावर जो लेख आला आहे तो जिज्ञासूंनीं वाचावा अशी आह्मी शिफारस करतों.

---

## हिंदुस्थान आणि ख्रिस्ती धर्म.

विलायतेंत राजाश्रित धर्म ह्मणजे ख्रिस्ती धर्मापैकीं प्राटेस्टंटपंथ होय. या पंथाचे जे कोणी लोक असतील त्यांच्यावर त्या धर्माचे बिशप, आर्चबिशप वगैरेंच्या पगाराचा बोजा पडावा हें न्यायाचें आहे. पण इतर ह्मणजे रोमनक्याथोलिक लोकांवर तो कां टाकावा? असा प्रश्न तिकडे उपस्थित होऊन मागें ग्लाडस्टन साहेबांनीं आयर्लंडला या खर्चाच्या भारांतून सोडविलें होतें. तोच मुद्दा पुढें करून आतां मि० मॅकना यांनीं वेल्स प्रांतासंबंधाचें बिल पार्लमेंटापुढें आणिलें आहे. या बिलाचें पहिलें वाचन नुकतेंच झालें. दुसरेंही लवकरच होऊन अखेर तें पास होईल असा रंग आहे. या बिलाचें तत्त्व ब्रिटिश राज्यांतल्या इतर भागांनाही लागूं करता येईल. हिंदुस्थानांत जेथें तीस कोट प्रजेपैकीं फक्त ४० लक्ष ख्रिस्ती आहेत, ते ही सारे प्राटेस्टंट मताचें नाहींत, तेथें ख्रिस्तीधर्मखातें ठेवण्यांच अगोदर कारण नाहीं. असलें तरी निदान त्याचा खर्च ख्रिस्ती नसलेल्या २९॥ कोट लोकांवर कां टाकण्यांत यावा त्याचें कारण कळत नाहीं. हा खर्च वर्षास सुमारें दोन कोट रुपये होत असतो हा ख्रिस्ती नसलेल्या हिंदु, मुसलमान, पारशी वगैरे लोकांकडून घेण्यांत खरोखर अन्याय होत आहे. हा अन्याय नाहींसा करण्याची खटपट मागें कांग्रेसचे जनक मि० ह्यूम व 'पायोनियर' पत्राचे माजी संपादक मि. सेनेट यांनीं २०।२५ वर्षांपूर्वीं केला होता, पण त्यावेळीं तो निष्फळ झाला. वेल्ससंबंधानें या प्रश्नाची चर्चा पार्लमेंटमध्यें सुरू आहे तोंच हिंदुस्थानाविषयींही कोणी प्रश्न पुढें आणील तर त्याला यश येण्याचा संभव आहे.

## अमेरिकेचें औदार्य.

स्पेनपासून फिलिपाईन बेटें घेतल्यापासून अमेरिकेनें त्या बेटांतल्या लोकांची सारखी उन्नति करीत आणिली आहे. त्या बेटांतल्या लोकांना अमेरिकेनें स्वराज्याचे पुष्कळ अधिकार दिले आहेत. परंतु ते लोक तेवढ्या अधिकारांनीं संतुष्ट नाहींत. तीन वर्षांपूर्वीं त्या लोकांनीं अमेरिकेची अशी प्रार्थना केली होती कीं आह्मांला स्वराज्याचे पूर्ण हक्क द्यावे. ही त्या लोकांची प्रार्थना अमेरिका ऐकून त्यांची इच्छा सफळ करील असा रंग दिसत आहे. फिलिपिनो लोकांना स्वराज्याचे हक्क देण्याबद्दलचें बिल मि० विल्यम जोन्स नांवाच्या सभासदानें अमेरिकन कांग्रेस पुढें आणिलें आहे. ता० ४ जुलै १८१३ पासून पांच वर्षेंपर्यंत त्या लोकांना स्वराज्याचे अधिकार देऊन ते त्या अधिकाराचा उपयोग कशा रीतीनें करतात त्याचा अनुभव पाहावा', आणि जर फिलिपिनो लोकांनीं स्वराज्य चालविण्याची आपली पात्रता स्थापित केली तर ते अधिकार त्यांना कायमचे देऊन टाकावे असा या बिलाचा उद्देश आहे. हें बिल पास झाल्यास त्याच्या योगानें अमेरिकेची औदार्याबद्दल त्रिखंड कीर्ति होईल. कारण कीं आयतें हातांत आलेलें राज्य सोडून तेथील लोकांना स्वतंत्र करण्याइतकी उदारता अमेरिकेशिवाय अद्याप दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रानें दाखविल्याचें पृथ्वीच्या इतिहासांत उदाहरण नाहीं.

## संस्तुती

[ राजश्री बार साहेबांविषयी आदरबुद्धि ]

आमचे डिस्ट्रीक्ट आणि सेशन जज्ज रा० रा० बार साहेब यांची बदली पूर्व वऱ्हाडांत झाली आहे आणि रा० प्रीडो साहेब येत्या जून महिन्यांत विलायतेहून परत आल्यावर आकोल्यास रुजू होतील व मे० बार साहेब उमरावतीस जातील. रा० बार साहेबांच्या सन्मानार्थ गेल्या मंगळवारीं रात्रौ येथील टौन हालाच्या बगींच्यांत पान सुपारीचा येथील वकील मंडळींच्या तर्फे समारंभ झाला. तें स्थळ दीपोत्सवानें फार रमणीय व शोभिवंत झालें होतें. युरोपियन अधिकारी, प्रतिष्ठित व्यापारी मंडळी व इतर सुखवस्तु लोक या समारंभाला जमले होते. सुखसंवाद करण्यांमध्यें प्रेमळ विचारांचें संमेलन करण्यांमध्यें आणि कुशल प्रश्नांनीं सुरूं केलेल्या नानाविध विषयांचा खल करण्यामध्यें सर्व मंडळी अगदीं तल्लीन होती, आणि रात्रींचे ९॥ वाजल्यापासून २॥ घंटे काळ आनंदाच्या व करमणुकीच्या गोष्टींमध्यें अगदीं न कळत निघून गेला. बारिस्टर व वकील मंडळी तर्फे रावसाहेब केशव गोविंद दामले यांनीं रा० बार साहेबांच्या सद्गुणाचे व प्रेमळ व गोड स्वभावाचें वर्णन करितांना न्यायाच्या कामांत ते किती निस्पृह व दक्ष आहेत हें सांगून येथील नवीन स्थापिलेल्या बार आसोशिएशनचे ते अध्यक्ष आहेत हें मोठ्या अभिमानानें व गौरवानें सांगितलें. वरील संभाषणास उत्तर देतांना रा० बार यांनीं मोठ्या विनयानें व प्रेमळ रीतीनें उपदेश केला कीं वकिलीच्या धंद्यांचा दर्जा फार मोठा आहे व या धंद्याची सर्व शोभा व्यक्तिमात्राचा प्रामाणिकपणा, सरळपणा व तसेंच विद्याव्यासंग व दृढ अभ्यास यांच्यावर अवलंबून आहे. विलायतेस जसे बारिस्टर सालिसिटर असे दोन वर्ग आहेत त्याच धर्तीवर इकडे योजना नाहीं तथापि नवीन वकिलांनीं सालिसिटरांच्या पद्धीवर दाव्यांचे कागदपत्र तयार करण्याकडे विशेष भर द्यावा ह्मणजे त्यांचें काम जुन्या वकीलमंडळींस विशेष उपयुक्त होऊन उभयतांचा उद्योग चांगल्या प्रकारें लाभकारक होईल. फलाहार झाल्यानंतर आतषबाजी वगैरे पाहून मंडळी घरोघर परत गेली आणि सर्वांच्या तोंडून असे उद्गार निघत होते कीं राजश्री बार यांच्या सारख्या सुस्वभावी गृहस्थांचें शील व वर्तन हिंदी व युरोपियन हा भेदभाव नाहींसा होऊन परस्पर संबंध दोघांसही श्रेयस्कर व सुखकर करण्यास कारणीभूत होतात या दृष्टीनें असें प्रसंग वारंवार येवोत असें आह्मी मनापासून चिंतितों.

## जैन--परिषद्

दिगम्बरी पंथाच्या जैन मंडळींचा एक महोत्सव गेल्या वैशाख शुद्ध ३ पासून पौर्णिमेपर्यंत खामगावास चालला होता. खामगांवचा हा एवढा महोत्सव अगदीं अपूर्व होता आणि तो मोठ्या राजेशाही थाटावर रा. रा. शामलाल ओंकारदास साहू यांच्या थोर व उदार आश्रयामुळें पूर्णपणें सिद्धीस गेला. हजारो लोकांचे थवचेथवे जमत असत. लायब्ररी जवळील मैदान माणसांनीं अगदीं फुललें होतें आणि सर्वत्र भजनाचा गजर, लोकांची धर्मश्रद्धा व सार्वजनिक कार्यामधील औत्सुक्य हीं स्पष्टपणें दिसून येत होतीं. बाहेरगांवाहून लांबलांबचे पाहुणे जमले आणि त्यांचें आदरातिथ्य चांगल्या प्रकारें झालें. या महोत्सवाच्या योगानें तेथें एक विद्यापरिषद् ही भरविण्यांत आली होती. या परिषदेच्या तीन बैठकी झाल्या. अध्यक्षस्थान कलकत्याचे प्रसिद्ध नागरिक रा. रा. फूलचंद पदमचंद यानीं सुशोभित केलें होतें. त्यांच्या संभाषणाचा सर्व भर विद्याविषयक गोष्टीकडे असून धार्मिक उन्नती, सामाजिक सुधारणा समाजाच्या निरनिराळ्या घटका व यांचें एकीकरण व उद्योगधंद्याची अभिवृद्धी इत्यादि विषयांचें विवेचन सुंदरपणें करण्यांत आलें होतें.

जैन धर्माच्या विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणाला फी व बुकें यांच्या द्वारें मदत करण्यासाठीं वार्षिक वर्गणी ११०० रुपये प्रमाणें फंड उभारण्यांत आला आहे ही विशेष संतोषाची गोष्ट होय. या फंडाचे सेक्रेटरी रा० रा० जयकुमार चवरे हायकोर्ट वकील, आकोला यांस नेमिलें असून हे गृहस्थ मोठ्या परिश्रमानें या फंडाची सुव्यवस्था ठेवितील आणि विद्यार्थ्यांस ही मदत देण्याविषयीं तत्पर राहतील हे त्यांच्या निःयाच्या परिचयनें कोणीही कबूल करील. हा धर्मादाय फार स्तुत्य प्रकारचा असून इतर धर्मपंथच्या लोकांनीं अनुकरणीय आहे.

आरा येथें 'सिद्धान्तभुवन' नांवाचें पुस्तकालय आहे आणि त्याची उभारणी कलकत्त्याकडील बाबू देवकुमार यांच्या मृत्युपत्रांतील मोठ्या देणगीवर झालेली आहे. सालीना ७ हजार रुपये उत्पन्नाची जिनगी या लायब्ररीकडे स्वतंत्रपणें तोडून देण्यांत आली आहे. या संस्थेच्या उपयुक्ततेकडे व महतीकडे लक्ष देऊन ५०० रुपये वर्गणी या परिशदे मार्फत पोंचविण्यांत येणार आहे. एकंदरीनें ही परिषद् व धार्मिक महोत्सव हे फार नामी झाले आणि ही गोष्ट आमच्या धनिक व उदार जैनबंधूस भूषणावह आहे.

# वऱ्हाडवृत्त.

हवामान— उन्हाळा फार तीव्र व प्रखर होत चालला असून जमीन सुपीक करण्याकडे या उन्हाळ्याचा मोठा लाभ होत आहे. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

रा० रा० रुस्तुमजी फर्दूनजी एक्साइझ कमिशनर यांची स्वारी दोनतीन दिवस येथें होती आणि सरकारी कामांची पाहणी करून पंचमढीला रवाना झाली. साहेब बहादुरांच्या या मुलाखतीनें पुष्कळांस मोठा आनंद झाला.

घोतरडी येथील कारभारी पाटील रा० रा० रावजी वल्लद झांगोजी यांचा खून भर दोनप्रहरीं गांवांतील रस्त्यावर ता० १ जानेवारी रोजीं ६ इसमांनीं केल्यावरून त्यांस फाशीची शिक्षा सांगण्यांत आली. यावर हायकोर्टांत अपील चाललें पण त्यांत नामदार स्टानिअन साहेब व नामदार हालिफाक्स यांचे अभिप्राय परस्पर विरोधी असल्या कारणामुळें त्याची सुनावणी मुख्य जुडिशिअल कमिशनर रा० रा० ड्रेक ब्राकमन याच्यापुढें पुनः होणार आहे.

सूचना—पेज नं० ९ यांतील नो० नं० २२६ सक्सेशन सर्टिफिकेट नं० ११ व ता० २७ ही चुकीची असून तेथें स. सर्टिफिकेट नं ९ व ता० २६-४-१२ असें समजावें.

## नोटीस

वि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० ८ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज—

अर्जदार

नूरमहंमद साहेबनूर कच्छी रा० वरुड ता० आकोट जिल्हा आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज आमचें कोर्टांत तारीख १०-४-१२ इ० रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख १।७।१९१२ इ० आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० २-५-१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज्ज आकोला.

नो० नं० २३५

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेट सावकार यांस कळविण्यांत येतें का चि. गं. भा. सत्यभमा जवजे ज्यानकीराम पंत रा. मोजे साकळी इचे जवळून कोणीही कोणत्याही प्रकारची जिनगी संबंधी विकत व गहाण वगैरे घेऊं नये घेतल्यास रितीप्रमाणें तजविज केली जाईल कळावें ता. २७ ४.१२

सही

रामकृष्ण सीताराम कुळकर्णी

मौजे सावळी द० खु०

नो. नं. २३६

## जाहिर नोटिस

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं माझा मुखत्यार नारायण लक्ष्मण अस लकार राहणार आकोट हा तारीख २३ माहे एप्रील सन १९१२ रोजीं आमचे नोकरीवरुन दूर होउन त्याचे तीन सालचे पगाराबद्दल ७५० व त्याचे आमचे पाशीं होते ते ६१८≡ मिळून रुपये ८११०≡ अक्षरी आठसे अकरा रुपये तीन आणे त्याने आमचेपासून रोख घेऊन पावती लिहून दिली आहे त्यावरुन त्याचे कुलमुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे. तारीख २३-४ १२ पासून सदर्हू इसमाचे मुखत्यारपत्र रद्द झाले सबब आता त्याजपाशीं कोणीही आमचे बद्दल कोणताच देवघेवीचा व्यवहार करूं नये. केल्यास तो सर्व रद्द समजला जाईल कळावें तारीख २९ माहे एप्रील सन १९१२ इ.

सही

दुर्गाबई जवजे कुंदनलाल सारस्वतब्राह्मण रा. आडगांव जहागीर नि. खुद

नों. नं. २३७

## नोटीस

नोटीस वेशमी सीताराम वा। सूर्यभान व २ सूर्यभान पाटील राहणार साण्खेड ता. आकोला यांसः—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं. नं. १ ची बहीण व नं. २ ची मुलगी इला मी गंधर्वानीं मागण्याकरितां चार पंच घेऊन तुमचे येथें ह्मणजे सायखेड मुक्कामी आलो व तुमची आणि आमची आपसांत गंधर्वाविषयीं बोलचाल झाली आणि तुह्मी ह्मणाले कीं तुह्मास मोहोतराच्या दोन बायका आहे तर त्याचे आणि इचे ह्मणजे तानीचे बनणार नाहीं ह्मणून तुह्मी सांगितलें त्यामध्यें बोलतां बोलतां असे ह्मणालें कीं तुह्मी, तानी इच्या नांवानें कांहीं इस्टेट करून द्या ह्मणजे आह्मी तानी इला गंधर्वानीं देतो ते मी कबूल करून माझ्या गांवी वापस आलो त्या नंतर तुह्मी आठ दिवसांनीं पाहुणें घेऊन आले त्यावेळीं मी चार पंचासमक्ष तानीच्या नांवचा इस्टेटीचा कागद लिहून देऊन रजिष्टर कचेरींत नोंदुन दिला त्या वेळेस तुमचे आमचें २००० हजार रुपयाविषयीं कांहींच बोलचाल झाली नव्हती व तुह्मी तो कागद घेऊन आपले गांवी परत गेलें मग मी आठदिवसांनीं तुमचे येथे गंधर्व पक्के करण्याकरितां आलो आणि रुपया देऊन कुंकू लावले आणि ह्मणालें कीं आजपासून पांच दिवसानीं गंधर्वाचा दिवस ह्मणजे रवीवार मुकरर केला मग मी माझे गांवी परत आलो. व गंधर्वाच्या सामानाची व कपडेलत्याची, डागडागिन्याची व्यवस्था केली. मग तुमचे आह्मास गंधर्वाचे एक दिवस अगाऊ असें पत्र आलें कीं तुह्मी २००० हजार रुपये पाठवून द्याल तर तुमचा आमचा सोयरेपणा रुपये न द्याल तर गंधर्व लागूं देणार नाहीं असे तुह्मी पत्रानें कळविले आणि ते पत्र पाहताच मी तुमचे येथें आलो आणि तुह्मास विचारले तर तुह्मी ह्मणाले कीं गंधर्व लागूं देत नाहीं. त्यावेळेस आह्मी ह्मणालो कीं गंधर्व लागून चुकले असे ह्मटल्यावर आह्मी तुह्मास आमच्या नुकसानीबद्दल खर्च द्या. तेही तुह्मी कबूल केले नाहीं. तर आतां या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यपासून चार दिवसाचे आंत माझी नुकसानीबद्दल खर्च रुपये ५०० भरून द्यावा. नाहींतर तानी इच्याशीं गंधर्व लाऊन द्यावे असे न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें ता० १ ५.१२

सही

बापु वा। भगवान पाटील राहणार माहागांव नि० हातचा आंगठा

नो० नं० २३८

## Notice

Notice under section 44 ( 2 ) of the Berar Municipal Law 1886 is hereby given to the public that:—

The Municipal Committee Khamgaon have at their Special Meeting held on the 24th April 1912 passed a resolution proposing the following rules under section 42 o the Berar Municipal Law 1886 for the assessment and collection of the scavenging tax within the limits of the Khamgaon Municipality, in supercession of the rules published under Hyderabad Residency Orders Notification No, 45 dated 9-3-1898.

Any inhabitant objecting to the proposal should submit his application if any in writing within 30 days from the date of the publication of the notice.

Rules.

I. For the purpose of these rules. buildings and lands excepting those actually used for agricultural purposes shall be devided into two classes—

Class I. Those to which a private latrine is attached and served through the Municipal Agency.

Class II Those to which no such private latrine is attached.

II The tax shall be levied at the following rates.

| | Class I R. A. P. | Class II R. A. P. |
|---|---|---|
| On building and lands the estimated annual rental of whice is R. 6/— and below........... | 1-0-0 (perannum ) | Exempt. |
| On buildings and lands the estimated annual rental of which is over R 6/- but dose not exceed Rs. 24/-.............. | 1-8-0 (perannum) | 0-8-0 (per—annum) |
| On buildings and lands estimated annual rental of which is over Rs. 24/-.............. | 0-1-0 (perrupee) | 0-0-6 (per—rupee) |
| With the maximum charge of.............. | 24-0-0 | 10-0-0 |

Exception——Buildígs which are solely used as granaries (malkothas) or shops, which have no privies attached thereto, will be taxed at one third the rate fixed for class I, provided the annual tax to be recovered from each of such building is not less than eight annas: fractions of a pie arrived at in the calculation of the tax for the quarter will be omitted.

III The Committee may decline to undertake the cleaning of latrines attached to factories, work shops, hospitals, markets, Government offices, and buildings situated in the civil station, and the tax on such buildings shall be levied at class II rates. The Committee may, under special agreement in each case, undertake to clean the latrines attach to such buildings in which case this tax will not be levied, but a special rate agreed upon between the Municipal Committee and the ocenpier shall be charged.

IV An ocenpier of buildings or lands who wishes to make his own arrangements for cleaning his private latrine must first obtain the written permission of the committee to do so. In such cases the tax shall be levied at class II rates.

V Temples, mosques, churches, and other places of public worships shall be exempted from the tax if they fall in class II.

VI. Sets of quarters or apartments in a building in which one or more latrines are provided for the common use of the occupants shall be included in class I, and the tax shall be recovered from the separate occupants according to the rental paid by each. A building includeds a house or a block of houses with out—houses and godowns, having a common entrance and accupied by one family, including servants. and the tax on such building shall be calculated according to the rental value of the house or portion of the accupied by the family.

VII. The tax shall be payable in advance in quarterly instalments falling due on the 1 st. April 1 st. July, 1 st. October and 1 st January respectively.

VIII. Builnings or lands which are accupied for any portion of the quarter shall be charged the full rates for the entire quarter. If they remain unoccupied for the entire quarter, no tax shall be eived

IX. Occupants desiring to have their latrine cleared both morning and evening shall be charged 8 annas for the quarter in addition to the ordinary tax.

X. The valuation and assessment of the buildings and lands shall be made once a year by the Committee or such members as the Committee may appoint in that behaif, and shall in the latter case be subject to the contermation of the Committee.

Khamgaon the 29 th April 1912 } ( Synd ) K. J. DeshmuKh. Vice Chairman Municipal Committee Khamgaon.

No N. 225

## नोटीस

त्रि० सबजज साहेब बहादूर अकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० ११ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज —

अर्जदार

सोनाबाई जवजे रामसुक मारवाडी रा० पापळ

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज आमचें कोर्टांत तारीख २७-४-१२ इ० रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख १।७।१९१२ इ० आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० २-५-१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज आकोला.

नो० नं० २२६

## नोटीस

नोटीस बेशमी गोविंदा वा सदू आखरे रा. खामगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं. तुमचे बहीणीचे माझ्याशीं लग्न लागून आज २२-२३ वर्षें झालीं व तेव्हां पासून आज २०-२१ वर्षेंपावेतों कांहीं तंटा बखेडा झाला नाहीं परंतु आज दोन वर्षें झाली तुमचे मुलीचें लग्न असल्यामुळें तुह्मी तिला घेऊन गेले तेव्हां पासून तुह्मी तिला पाठविलें नाहीं. तिला घेण्यास माझा वडील भाऊ नामें किसन चारवेळां व मीही २-३ वेळां घेण्यास आलों असतां तुह्मी तिला पाठविलें नाहीं. ज्या वेळेस तुह्मी तिला घेऊन गेले त्या वेळेस तिचे आगांवर तोड्याचा जोड १०२ तोळें व पायातील जोड कड्याचा ४१ तोळें व हातातील कोपरवाळ्या जोड ३८ तोळें व हातातील पोलटे २ जोड ११ तोळें व पायातील जोडवें चांदीचे १० तोळे असे व सोन्याचे डागीनें कानांतील बाळ्या ४ वजन तोळा १ व नाकातील नथ वजन तोळा १ वगैरेक मार्गे सांत असे एकंदर डागीने तिचे आंगावर होतें तर मी असें ऐकीतो कीं ते तुह्मी मोडून खाले. परंतु आतां नोटीसपावल्यापासून ८ दिवसांचे आंत तिला डागीन्यासह आणून घालावें मी वागविण्यास तयार आहे अगर तुमचे कडून निरोप आल्यास आमचेकडून घेण्यास येईल. जर करीतां नोटीशीप्रमाणें न झाले तर मी आपलेवर फिर्याद करून डागीन्यासह व नोटीशीचे खर्चासह भरून घेईल कळावें तारीख २७-४-१२ इ.

सीताराम नारायण काळे तेल्हारा

ता. आकोट जि. आकोला

नो. नं. २२७ द० खु०

## नोटीस

वि. गं. भा. सत्यभामा जवजे ज्यानकीराम पंत कुळकर्णी मौजे कजवे साकळी ता. चिखली जि बुलडाणा इसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा नवरा व मी सख्ये चुलत बंधु होतो तुमचा नवरा निपुत्रिक मरण पावला त्यावेळेस तुमचे वय सोळा वर्षांचे होतें. तुह्मास फक्त तुमचे हयातीपर्यंत त्या जिनगीचा उपभोग घेण्याचा हक्क आहे जिनगीचा कोणत्याही तऱ्हेनें अफरातफर करण्याच्या कायद्यानें तुह्मास अधिकार नाहीं. मयताचे जिनगी पैकीं कांहीं जिनगी विनाकारण तुह्मी आपले भावाचें बरे होण्यास त्याना विकले आहेस ही विकलेली जिनगी योग्य किमतीस विकली गेली नाहीं याप्रमाणें तुह्मी दुसऱ्याचे मतानें वागून जिनगीची अफरातफर चालविली आहे. त्यांस आपण आंत्री व सव येथील कांहीं व इतर खेड्यांतील शेतें विकली आहेत तुह्मास विकण्याचा अधिकार नसतां तुह्मी विकली याजबद्दल तुह्मावर दावा करणें भाग पडत आहे तर आतां ही नोटीस पावल्यापासून तुह्मी स्थावर आणखी जंगम जिनगीची अफरातफर करूं नये केल्यास दावा रितीप्रमाणें करावा लागेल कळावें तारिख २७-४-१२ इ. सही

रामकृष्ण सीताराम कुळकर्णी

मौजे साकळी बु० तालुका

चिखली द० खु०

नो. नं. २२८

## नोटीस

हरीसा वल्लद भगु व नारायणसा सीतलसा गोरवाड रा० मलकापूर

यांसः—

मी खालीं सही करणार इजकडून तुह्मास शेत सर्वे नंबर ९८-११६ मौजे आंबोडा येथील याजबद्दल तुह्मास या पूर्वी ता० १८।८।११ व तारीख २९।८।११ अश्या दोन नोटीसा या पूर्वी दिल्या आहेत. त्यांत सर्व खुलासा केला आहे. असे असून ता० ३१।११।११ इसवी रोजीं पंचासह तुह्मी मौजे मजकुरी येऊन दिलेल्या नोटीशीप्रमाणें आजपर्यंत माझें झालेले नुकसान वजा देतो. बाकी निघत असलेल्या रकमेपैकीं तुह्मी आज रोजीं मला रक्कम रुपये ४०० व मागें दिलेले रुपये ३०० शें ज्याबद्दल आह्मी तुह्मास सवदा चिठ्ठी ता० ३०।३।११ इ० रोजीं दिली आहे. ती चिठ्ठी व रक्कम रुपये ४०० शें असें द्यावे ह्मणजे आह्मी तुमचे नांवचें खरेदीखत करून आणून दिल्या नंतर पिकसुद्धां शेतें ताब्यांत देते वेळीं नुकसानीची रक्कम वजा जातां बाकी रक्कम पिकासुद्धां शेताचा ताबा देतेवेळीं देणें असें घालून धोक्यानें रक्कम रुपये ४०० व रक्कम रुपये ३०० ची सवदाचिठ्ठी ता० ३।११।११ ॥ रोजीं घेऊन गेलें आहे. त्या प्रमाणें अद्याप खरेदीखत देखील आणून शेतें पिकांसुद्धां ताब्यांत दिलें नाहीं. करितां माझे पिकांचे व रकमेचे व्याजाबद्दल व इतर दुसरें अति नुकसान झाले आहे. ते सांगता येत नाहीं. तरी तुह्मी ८ दिवसांचें आंत खरेदीखत माझे नांवाचें करून आणून देऊन पिकाची व रकमेची व इतर झालेली नुकसानी वजा करून बाकी जे कांहीं रक्कम निघाल्यास ठरल्याप्रमाणें शेत ताब्यांत देऊन रक्कम घेऊन जावे. तसें न केल्यास तुमच्यावर कायदेशीर फिर्याद करून सर्व नुकसान खर्च वगैरे भरून घेतला जाईल कळावें. ता० २९।४।१२

सही

बिसमिल्लाबी मर्द शेखअबदुला रा०

आंबोडा निशानी बांगडी.

नो० नं० २२९

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते सीताराम वा सूर्यभान पाटील राहणार सायखेड याच्या बहीणीशी ह्मणजे [ तानी ] इच्याशी गंधर्वाबद्दल कुंकु व रुपया देऊन गंधर्व पक्के केलें आणि तिच्या भावानें अडथळा आणून गंधर्व लागूं दिले नाहीं तर या जाहिर नोटीशीनें कळवितो कीं [ तानी ] इच्याशीं गंधर्व कोणी लावूं नये कोणी गंधर्व लावल्यास त्याचे जवळून माझ्या नुकसानी बदल खर्च भरून घेतला जाईल कळावें ता. १।५।१२ इ.

सही

बापु वा भगवान पाटील रा०

महागांव जि० आंगठा असे

नो. नं. २३०

## नोटीस

नोटीस बेशमी बालु व सखाराम वल्द तुकाराम गोळामोर सवरतकार रा० ढोरवरगांव तालुका मलकापूर यांस:--

मी खालीं सही करणार अज्ञानाचा पालनकर्ता ह्मणून नोटीस देतो ऐसा जे कीं तुमचा सावत्र भाऊ तोताराम हा प्लगानें एकदम मरण पावला त्यांस दोन मुली वडील सेवंती हा माझी सून आहे व धाकटा जनी आहे. तुह्मी व तुमचा भाऊ हे अलग रहात असल्यामुळें व जिनगी निरनिराळी असल्यामुळें जनी इचें पालन केले नाहीं वरून मला पालन करणें भाग पडेल त्याप्रमाणें ती मजवळच असल्यामूळें तीचे बापाचें इस्टेटी संबंधानें चौकशी करणें भाग पडल्या वरून मैताची जीनगी तुमचे जवळ असल्याचे तुमचेच-कडून समजले. ते मैतांची जिनगी येणें प्रमाणें:-

१ शेत, २ बैलाची जोडा एक, ३ दमनी एक, ४ कडब्याचा गुड पेंढ्या २०००, ५ कुटाराचे कणगे २, ६ देव तीन खंड्या ज्वारी, ७ ज्वारी दहा मण, ८ बाजरी मण ८, उडीद मण ७, १० तुरीची दाळ मण २, ११ घरें घ्यावयाचें दोन, १२ शिवाय भांडीकुंडीं सामान वगैरे

येणें प्रमाणें मैताची जिनगी तुमचेजवळ असल्याचे तुह्मी पंचासमक्ष कळविलें आहे. व या शिवाय ही दुसरा जिनगी तुमचे जवळ असावी असे कळते ती अज्ञानास मिळू नये असा कपटभाव धरून कळविली नाहीं. व वर लिहिलेली जिनगींही अज्ञानास देत नाहीं. तरी वगल जिनगी तुमचे जवळ आहे तिची यादी करून पंचासमक्ष आठ दिवसांचे आंत आह्मास द्यावी. व आमची पावती घ्यावी अगर तुह्मी आपलेच ताब्यांत ठेऊन पंचाचे सहीनिशी लेख करून घ्यावा अगर तुह्मास जो इसम पसंत पडेल त्यास व्यवस्था करण्यास नेमून त्याचे ताब्यात द्यावी. व जीची आह्मास माहीती दिली नाहीं ती जिनगी कोणाजवळ आहे. अगर दुसरे कोणाजवळ दिली आहे अगर सरकारांत कळविली आहे कीं काय? याचाही खुलासा आठ दिवसांचे आंत करावा. असें न केल्यास तुह्मी तुमचा सदरहु अज्ञानाचे जिनगीशीं संबंध नसतां व तुह्मी अज्ञानास वागवीत नसतां तुह्मास मुळींच हक्क पोंचत नाहीं असें असतां तुह्मी जिनगीची अफरातफर केली आहे व करित आहां अश्या-बद्दल व देत नाहीं ह्मणून विश्वासघाता-बद्दल तुमचेवर योग्य कोर्टांत या नोटीशीच्या कोर्टाचे खर्चाचे बोजासह फिर्याद करावी लागेल कळावे. ता० २२।४।१२ इ०

सही

अर्जी बापाचे नांव तोताराम पाटील अज्ञान पालन करणार तुकाराम वल्द जानजो रा० कंडारी.

नो० नं० २३१

दिण्यांत येते कीं, मी दगडी मर्द बलुलाल अगरवाले रा. हिवरखेड यांचे घराची खरेदी घेण्याचा सौदा रुपये ४०० मध्यें ठरून ते रुपये सदहू घर तुमचे जवळ तावे गहाण असल्यामुळें तुह्मास देऊन खरीदीखत लिहून नोंदून घेण्याचे ठरले. त्याप्रमाणें मी तुह्मापैकी कन्हयालाल याजपाशीं परभारे तारीख ९-४-१२ रोजीं दिवसा १० वाजण्याचे सुमाराम जानजी वल्द रुपाजी मारवाडी शिंपी याचे दुकानीं याचे कडून परभारें तुमचे ओट्यांत रुपये ४०० चारशे दिले व तुह्मी असे सांगितले कीं आतां तुह्मी खरेदी खत नोंदून आपल्या वर सदहू ४०० रुपयाची पावती देईन त्याप्रमाणें मी रिणको दगडी इजकडून दस्तऐवज नोंदून आगणराम लावला खरेदीचा मसुदा कन्हैयालाल यानीच लिहिणार इसमास तेल्हारें मुक्कामीं सांगितला. त्या खरेदीखतांत भरण्या पैकीं रुपये २०० रोख व २०० रुपये नोंदणार अमलदारा समक्ष असे ४०० लिहिले आहेत. हें मला खरेदीचा दस्तऐवज रजिस्टर होऊन आल्यावर मी नारायण वल्द हरी याजकडून वाचून पाहिला असतां वर प्रमाणें भरण्याची लबाडी दिसून आली खरेदीखतांत भरणा ४०० रुपये कन्हैयालाल याचे हवाल्याबद्दल लिहिण्याचे ठरले असून त्याप्रमाणें कन्हैयालाल यानीं न करितां वर लिहिल्या प्रमाणें भरणा घातला ही त्यांनीं लबाडी केल्याचे मला नंतर समजले त्यावरून तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास दिलेले ४०० रुपयाची पावती. ही नोटीस पावताच आठ दिवसांत द्यावी तसे न केल्यास तुमचेवर कायद्या प्रमाणें काम चालविले जाईल व कोर्टखर्चासह व नोटीसीचे खर्चासह सर्व नुकसान भरून घेतले जाईल कळावे तारीख २९-४-१२

सही

चुनीलाल केसोजी मारवाडी शिंपी हल्लीं मु० आकोला नि० खु०

द० नारायण वा हरी माळी राहणार हिवरखेड हल्लीं मु० आकोला

नो० नं० २३२

## नोटीस

वि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्ट:—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० ११ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज—

अर्जदार

चिंधाई जवजे गंगराम रजपुत राहणार आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज आमचे कोर्टांत तारीख २७-४-१२ इ० रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख १।६।१९१२ इ० आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० २-५-१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज्ज आकोला.

नो० नं० २३३

## नोटीस

मी खालीं सही करणार मंगणीराम खेतसीदास तावरी मारवाडी राहणार मुरल्यातळा पोष्ट पोहोकरण-जिल्हा जोधपूर व मारोती वल्द कर्णाजी रा. टोंगांव उभयतास नोटीस देतें कीं, मी तुह्मास तारीख ३१-१-१९१२ इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें आहे. परंतु तुह्मी आमचे काम बरोबर करीत नाहीं सबब ता. २९-४-१९१२ पासून तुमचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे आजपासून आमचे दुकानासंबंधानें कोणतेही देवघेवीचा वगैरे काम तुह्मी केल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर आहे. कळावें तारीख. २९-४-१२ इ.

सही

मोतीलाल गुमानीराम मालक शिवनारायण मोतीलाल शिवनारायण अ. पा. आई तुळसाबाई जवजे मोतीलाल रा. शेगांव नि. चांगडी अर्जे

नो. नं. २३४

## नोटीस

रा. सितारामे परशराम साहु दुकान हिवरखेड ता० आकोट या नावचे दुकान चे मालक परशराम कन्हयालाल सिताराम मारवाडी रा० हिवरखेड तालुके आकोट यास खालीं सही करणार ...जकडून नोटीस


ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसींचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... विन अटीच्या.

पॉलिसी .... .... ... ... .... .... विन तक्रारी.

पॉलिसी .... .... ... .... .... .... विन बुडणारी.

हिंदुस्थनचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला 'प्रांतवऱ्हाड' नो. नं. १३

# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 2 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, hih wife and family may be in distress. Life Assurance is a means by whice his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family withou the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं ... छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६] आकोला—सोमवार तारीख १३ माहे मे सन १९१२ ई० [ अंक १९



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{3}{4}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट.
नो० नं० २

### चांदीचीं भांडीं.

**खरें सचोटीचें दुकान.**

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात, माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालांच खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयाति

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्मा
नं ३ चित्तीखाना आगरा.


### नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीचे द्वारें जाहीर करण्यांत येतें आहे कीं, जनाब चीफ कमिशनर साहेब बहादूर मध्यप्रांत यांच्या जुडशियल डिपार्टमेंट नोटिफिकेशन नंबर १६०३ तारीख १९ सप्तेंबर १९११ यांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांनीं निकाल केलेल्या मिसलांची व्यवस्था रक्षण व नाश या संबंधानें नोटिफिकेशन नंबर २९६३ ता० २६ मार्च सन १९०६ मध्यें जे नियम प्रसिद्ध केले गेले आहेत त्या नियमानुसार ता० २६ मार्च १९०६ चे पूर्वीचे सर्व नियम रद्द समजले जाऊन पूर्वींच्या जुन्या मिसलांची व्यवस्था केली जाईल करितां सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ज्यांनीं ज्यांनीं जुन्या मिसलामध्यें महत्वाचे कागद दाखल केले असतील ते परत घेण्या करितां ता० १ मे सन १९१२ चे आंत आमचे कोर्टांत अर्ज दाखल करून आपले कागद परत घेऊन जावे असें न केल्यास सदर्हू कागदांचा नवीन नियमाप्रमाणें नाश केला जाईल. कळावें.

अकोला

ता० १७ जानेवारी १९१२ इ.

A. D. Barr.
डिस्ट्रिक्ट व सेशनजज्ज
नो० नं० ४३ पश्चिम वऱ्हाड


### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

**जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.**

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळ्या | ” | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | ” | ? |
| खोकल्याच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | ” | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १९ |
| त्रिभूवन किर्ती | ” | २ |
| श्वास कुठार | ” | २ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | २ |
| संमिर पन्नग | ” | ५ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | | १९ |
| हिंगाष्टक चुर्ण | बाटली | ०= |
| डोळ्यांचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ।- |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ॥ |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ॥≡ |
| मध्यम | ” | ।-॥ |
| लहान | ” | ०≡ |
| उसाचा शिर्का | ” | ।≡ |
| मद्य बाटली. | | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ०=॥ |
| पिंनसावर तेल | ” | ॥ |
| ग्लिसराईन बाटला. | | ०≡ |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ०=॥ |
| शंखद्राव. | तोळा | ॥ |
| कुंचल्यादि वटी | ” | ॥ |
| हिंगणबेटाचे तेल | ” | ०= |
| नारायण चुर्ण | ” | ०= |
| इच्छाभेदी जुलाब दवा | | ०= |
| ग्रहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.

ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला


### जाहिर नोटीस

शेट सावकार व इतर सर्वत्र लोकां यांस खालीं सही करणार यांजकडून कळवितो कीं मयत पांडू वल्द कमळाजी रंगारी राहणार सवउद याचा मी दत्तक पुत्र असून मयताचे इस्टेटीचा मालक आहे मी अज्ञान असतांना माझी आई आ. सराबाई इजशीं कांहीं लोकांनीं इस्टेटी संबंधानें अगर कोणतेही प्रकारचा लवाडीचा व्यवहार केला असल्यास तो मला कबूल नसून खोटा समजावा, व आतां मी सज्ञान झालों आहे, मी सज्ञान झाल्यापासून माझे सल्लयाशिवाय कोणी इस्टेटीसंबंधानें अगर इतर कोणतेही प्रकारचे व्यवहार केल्यास ते सर्व बातल समजले जातील. तारीख २९ माहे एप्रिल सन १९१२ इ.

सही
कोंडु पांडुरंग रंगारी रा. सावउद
हल्ली मुक्काम डोणगांव द. खु.
नो. नं. २३९

### नोटीस

लक्ष्मण पांडुरंग होले रा० कोळसर ता० मुर्तिजापूर यांस—

तुम्ही आपले वकील रा. रा. जयकुमार देविदास चवरे आकोला यांचे मार्फत जी नोटीस केली तिचे उत्तर येणेंप्रमाणें:—

आमचा पक्षकार श्री किसन चैनिराम मारवाडी राहणार दापोरा ता० मुर्तिजापूर यास वऱ्हाड समाचार आकोला ता० ६-४-१२ इसवीचे अंकांतून दिलेली नोटीस ता० ३०-४-१२ इ. रोजीं मिळाली आणि त्यांत असें लिहिलें कीं अज्ञान मुलगा शामराव याजपासून योग्य भरणावगैरे न देतां पोकळ दस्तऐवज रुपये ५०० चा लिहून घेतला हे लिहिणें अगदीं बरोबर नाहीं. शामराव वल्द लक्ष्मण यानें श्री किसन चैनिराम याजपासून रुजूं वहीवरून रुपये ६०-२०-८०-८० व गोल्यावरून १००-५०-५०० एकूण रुपये ८९० व याशिवाय खातें बाकी अशी रक्कम घेणें आहेत व त्याचा भरणा त्याजला पूर्णपणें दिला आहे, शामराव हा अज्ञान नसोन सज्ञान आहे व त्यानें श्री. किसन चैनीराम याचे खेरीज दुसरेही सावकारापासून रुपये घेऊन त्याला दस्तऐवज लिहून दिले आहेत तुम्हास आमची रक्कम देणें असल्यास सर्व रक्कम व्याजासह चुकवून देऊन आमचेजवळ असलेले दस्तऐवज घ्यावेत व खाते व रुजूंसंबंधी रुपये देऊन पावती घ्यावी, कळावें ही नोटीस तारीख ७ माहे ५ सन १९१२

सही [ मारवाडी ]
श्री किसन चैनीराम मारवाडी रा० दापोरा द० खु०
नो० नं० २४०

वऱ्हाडसमाचार.

वैशाख वद्य १२ शके १८३४ परिधावी

## दिवे

आमच्या देशांतले विद्वान् लोक पहावे तर नेहमीं राजकीय कांग्रेस, सामाजिक परिषदा किंवा द्विचनलवाद, अद्वैतवाद, इ० गहन विषयांच्या चर्चेंत मग्न ! जणूं काय या विषयांच्या चर्चेवरच आमची उन्नति सर्वथा अवलंबून राहिलेली आहे ! य कथित् गोष्टींसंबंधानेंही आमच्या लोकांतलें अज्ञान घालविण्याचा यत्न करणें त्यांच्या दृष्टीनें महत्पाप असें ते समजतात. केसरीसारखीं पत्रें कधीं घरांतल्या चुली किंवा दिवे चिमण्या यासारखे विषय हातीं घेऊन त्यांच्या संबंधानें लोकांना शास्त्रीय ज्ञान देण्याचा व लोकांचें जीवन अधिक सुखप्रद करण्याचा यत्नच करीत नाहींत. वस्तुत. आमचे दिवे हा विषय शहाण्यांनीं हातीं घेण्यासारखा आहे. पूर्वीच्या आमच्या समया, पणत्या, किंवा मेणबत्त्यांनीं शामदानें, हंड्या वगैरे जाऊन त्या जागीं राकेलच्या चिमण्या टेबलल्याप, किटसन, ग्यासचे दिवे व आतां मुंबईसारख्या शहरांतून विजेचे दिवे आले आहेत. हें स्थित्यंतर फारच मोठें झालें आहे. पण त्या मानानें आमच्या लोकांत शास्त्रीयज्ञानाचा प्रसार झाला नसल्यामुळें हें स्थित्यंतर अनर्थावह झालें आहे हें गतवर्षींच्या साळुंके येथील व दुसऱ्या कित्येक अनुभवावरून कोणालाही दिसून येईल. हें स्थित्यंतर आम्ही खुषीनें करून घेतलेलें नाहीं. तें परिस्थितीनें आमच्यावर लादलें आहे. गोडें तेल महाग झाल्यामुळें राकेल तेलाचा खप वाढला. एका ठिकाणीं स्थाईक राहणें सुटल्यामुळें जड समयासारख्या वस्तु बाळगण्यापेक्षां हलकीशी चिमणी बाळगणें आम्हांला सोयीचें वाटूं लागलें. मशाली धरणारे मिळनासे झाल्यामुळें किंवा ते भलभलती मजुरी मागूं लागलें व गोडें तेल महाग झालें यामुळें किटसनला बढती मिळाली आहे. या वस्तु आम्ही वापरूं लागलों खरें, पण त्या वापरण्याची खरी रीत कोठें आम्हांस ठाऊक आहे ? राकेल तेलाची चिमणी वापरणें झालें तर ती वरच्या कांचेच्या नळीसुद्धां वापरली पाहिजे. पण आमच्यांतल्या गरीबगुरीबांच्या घरीं किंवा रस्त्यानें रात्रीचे ओरडत फिरणाऱ्या दुकानदाराकडे पहा. त्यांच्या चिमण्यांना वर कांच मुळींच नसते. यामुळें जळणाऱ्या राकेलांतून निघणारें काजळ हवेंत व जवळपासच्या पदार्थांत मिसळून ते पदार्थ दूषित होतात, आणि या पदार्थांच्या द्वारें तें आमच्या पोटांत जाऊन प्रकृतीवर त्याचा परिणाम न कळत घडतो. शाळेंतला अभ्यास रात्रीं टेबलापाशीं करीत बसणारे विद्यार्थी ज्यास्त प्रकाश हवा म्हणून समईच्या ऐवजीं कांचेचा स्टयांड घेतात पण किती प्रकाश डोळ्यांना घेताचा असतो, व तो कशा प्रकारें घेतला पाहिजे हें कोठें त्यांना कळत असतें ? ते अगदीं लखलखीत प्रकाशांत वाचण्याची संवय लावून घेतात, यामुळें पुढें कांहीं दिवसांनीं समईच्या मंद प्रकाशांत त्यांना आंधळ्यासारखें होतें. प्रकाश प्रत्यक्ष डोळ्यांवर न घेतां मागच्या बाजूनें पुस्तकांवर घ्यावा हें शाळेंत किंवा घरीं त्यांना कोणी सांगत नाहींत ! कित्येकजण तर ज्युएल ल्यांपसारख्या अतिशय तीव्र व उष्ण प्रकाशाच्या दिव्यापाशीं बसून आपल्या डोळ्यांना व डोक्याला कायमचा अपाय करून घेतात ! हें शरीराच्या अपायाविषयीं झालें. पण या चिमण्यांच्या पायीं आमची द्रव्यहानि किती होते ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. कांचेच्या चिमण्या पुसाव्या कशा, दिवा लावावा कसा, चिमणी तापली व दिवा भडकूं लागला म्हणजे काय करावें, वगैरे शेकडों गोष्टी आम्हांस ठाऊक नसल्यानें आम्ही पैशाच्या संबंधांत रोज नागविले जात आहों. अशिक्षित माणसाच्या हातून निष्काळजीपणामुळें किंवा अज्ञानामुळें किती चिमण्या नेहमीं फुटतात व किती आगी लागतात, याची गणना कोणाला करतां येईल काय ? चांगले बर्नर कोणते वाईट कोणते याची परीक्षा कितीजणांना असते ? दिवे वेळच्या वेळीं न पुसल्यामुळें किटणे बसून ते निरुपयोगी-किंबहुना धोका देणारे होतात असा अनुभव असतां दिवा विकत घेतांना बर्नरच्या चांगुलपणाबद्दल चिकित्सा करणारे कितीसे निघतील ? जुने बर्नर महिनापंधरा दिवसांनीं साबणाच्या पाण्यांत घालून उकळल्यानें जमलेलीं किटणें निघून जाऊन बर्नर चांगलें काम देऊं लागतात ही गोष्ट किती जणांना ठाऊक आहे ? या गोष्टी ज्यांना ठाऊक नाहींत असे लोक शेंकडा ९० सापडतील. हे बर्नर टाकाऊ झाला नसतांना टाकाऊ झाला असें समजून नवा बर्नर बाजारांतून आणितात, आणि कित्येक तर सबंध चिमणीच नवीन विकत घेतात ! अशा अज्ञानाच्या पायीं आमच्या लोकांचे किती पैसे निष्कारण विलायतेला जात असतील याची गणना करतां येत नाहीं. दिसायला या गोष्टी किती क्षुद्र आहेत ! पण संसार अशा अनंत क्षुद्र गोष्टींनींच भरलेला असतो. तुम्ही बालविवाह किंवा विधवा विवाह, जहाल आणि मवाळ, आधीं राजकीय सुधारणा कीं आधीं सामाजिक सुधारणा इ० मोठमोठ्या प्रश्नांवर वितंडवाद घालून रणें माजवितां; पण सर्व सुधारणांच्या आधीं गृहस्थितीची सुधारणा करावयास हवी, अज्ञानाशीं झगडून त्याला पार हाकलून लावावयास पाहिजे बारीक सारीक गोष्टींकडे ही शास्त्रीय दृष्टीनें पाहून आपल्या चुकी सुधरावयास पाहिजेत, हें तुमच्या लक्षांत अद्याप कसें येत नाहीं ? या सुधारणेची केवढी अवश्यकता आहे हें दाखविण्यासाठीं आज दिव्याचें एक उदाहरण घेतलें येवढेंच. पण दिव्यासारख्या शेंकडों गोष्टी सुधारणेची वाट पाहत बसल्या आहेत. त्यांच्याकडे आम्ही कधीं लक्ष देणार ?

## लॉर्ड मॅकडॉनेल.

—०*०—

सर अँटनी ( आतां लॉर्ड ) मॅकडॉनेल हे हिंदुस्थानचे एक हितचिंतक मित्र असून ते फार न्यायी, समतोल वृत्तीचे आणि सहानुभूतीनें वागणारे आहेत असा त्यांचा लौकिक आहे. हे कित्येक वर्षें मध्यप्रांताचे चीफ कमिशनर व संयुक्त प्रांताचे ले० गव्हर्नर होते व अजूनही कदाचित् ते गव्हर्नर नेमून येण्याचा संभव आहे. यांनीं ले० गव्हर्नर असतां नागरी भाषेचा प्रचार सरकारी कचेऱ्यांतून सुरू केला. यांचा हिंदी भाषेला मोठा पाठिंबा होता. नागपूरच्या कांग्रेसच्या वेळीं त्यांनीं कांग्रेसपक्षाला पुष्कळ मदतही केली होती. असा सहानुभूतिप्रेरित मनाचा अधिकारी मध्यप्रांताला कायदेकौंसिल देण्याच्या विरुद्ध असावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. लाटसाहेबांना मध्यप्रांताचा अधिकार सोडून जवळ जवळ वीस वर्षें झालीं तेवढ्यांत मध्यप्रांत व वऱ्हाड यांचें प्रगतीच्या मार्गांत किती पुढें पाऊल पडलें आहे व लोकांच्या आकांक्षा किती वाढल्या आहेत याची बरोबर कल्पना यास न करतां येणें हे स्वाभाविक आहे. त्यांना या प्रांतांची खरी सद्यःस्थिति कळेल तर ते कौंसिल देण्याच्या सूचनेस विरोध करणार नाहींत अशी आमची खात्री आहे.

## मद्रासचे हरून-अल-रशीद.

—०*—०

अरबी भाषेंतल्या सुरस व चमत्कारिक गोष्टींच्या पुस्तकांत बगदादचा खलीफ हरून-अल-रसीद याची गोष्ट आहे. हा खलीफ आपल्या प्रजेची खरी स्थिति कळावी म्हणून वेष पालटून हिंडत असे. मद्रासचे माजी गव्हर्नर लॉर्ड कारमायकेल यांनीं त्या खलीफाचा कित्ता पुढें ठेवून राज्यकारभार चालविण्याचा निश्चय केला आहे असें त्यांच्याविषयीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कित्येक गोष्टींवरून दिसतें. यांनीं तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून प्रवास करणाऱ्या देशी लोकांचे रेलवेच्या नोकरांकडून कसे हाल करण्यांत येतात हें पाहण्यासाठीं फाटका तुटका पोषाख करून तिसऱ्या वर्गानें मुद्दाम प्रवास केला; तसेंच बाजारांत लोकांच्या आरोग्याला अपायकारक असा माल येतो कीं काय वगैरे पाहण्याचें काम पोलिस अधिकाऱ्यांचें आहे. तें ते कितपत करतात हें पाहण्यासाठीं बाजारांतही अशाच रीतीनें खेप घातली, वगैरे गोष्टी बाहेर आल्या आहेत. या गोष्टी कितपत खऱ्या आहेत हे कळण्यास मार्ग नाहीं. पण खोट्या असल्या तरी अशा कंड्या पिकविण्यापासून प्रत्यक्ष खात्यांतले नोकर आपापल्या कर्तव्यांत दक्ष राहतील व या खलीफाची दृष्टि आपल्याकडे चोरून लागली आहे काय हें सावधगिरीनें पाहत राहतील हा कांहीं लहानसान फायदा नाहीं.

## ना० मि० गोखले.

वरिष्ठ कायदेकौंसिलांत देशी सभासदांचे अग्रेसर व हिंदुस्थानचे एक प्रमुख लोकनायक अशी दुहेरी जबाबदारी अंगावर घेऊन हिंदुस्थानच्या हितासाठीं अविश्रांत झटणारे ना० मि० गोखले यांची प्रकृति अतिपरिश्रममुळें नादुरुस्त झाली व तिच्यासाठीं डाक्तरच्या सल्ल्यावरून हवा पालटण्यासाठीं गेल्याचे मागील शनिवारीं ते विलायतेस निघून गेले, या संबंधानें लिहितांना पुण्याचे ‘ मराठा ’ कर्ते यांनीं आपल्या शीलाला स्मरून कुत्सितपणाची टीका केली आहे. पण ज्यांना नामदार साहेबांनीं केलेली कामगिरी ठाऊक आहे ते असल्या टीकेकडे तिरस्कारयुक्त नजरेनें पाहून दुर्लक्ष करतील. नामदारसाहेब जरी प्रकृतिसुधारणेसाठीं तिकडे गेले आहेत तरी आपल्या प्राथमिक शिक्षणासंबंधानें तिकडे चळवळ केल्यावांचून ते खात्रीनें राहणार नाहींत. होतां होईल तों आपल्या बिलाचा उद्देश सरकारी अधिकाऱ्यांच्या हातून पार पडेल अशी तजवीज करावयाची, आणि तें नच जमल्यास वर्ष दोनवर्षांनीं तें बिल पुनः कौंसिलापुढें आणावयाचें, व मध्यंतरीं या विषयांसंबंधानें इकडे व विलायतेंत अधिक जागृति करावयाची असा त्यांचा संकल्प आहे. नामदारसाहेबांच्या बिलाला प्रांतिक सरकारांनीं एक मतानें विरोध केल्यामुळें तो विरोध हाणून पाडून आपला उद्देश साधण्यास तितकेंच जोराचे यत्न होणें इष्ट आहे.

## कौन्सिलचे समासद कसे पाहिजेत ?

ना० गोखले यांची कौन्सिलांतली कामगिरी पाहून युरोपियन अधिकारीसुद्धां चकित झाले आहेत. आपलें तन, मन, धन, काल, महत्त्वाकांक्षा, सर्व कांहीं देशहिताला अर्पण करणारे दहापांच गोखले आमच्या देशाला लाभतील तर सध्याच्या हार्डिंज, क्रयू, मॉंटेग, वगैरे मुत्सद्यांच्या काळांत हिंदुस्थानाला भाग्याचे दिवस लवकरच येतील पण आमचे कौन्सिलचे मेंबर म्हणजे बहुधा खोऱ्यानें पैसा ओढणारे वकील ब्यारिस्टर असतात. या लोकांना आपला द्रव्यलोभ वर्षानुवर्षे आवरून धरणें फार कठीण जातें. अर्थातच अर्धें लक्ष कोर्टांतल्या कामाकडे व अर्धें कौन्सिलच्या कामाकडे अशी वाटणी होते. या लोकनायकांना कौन्सिलांत ज्यांच्याशीं शास्त्रवाद व युक्तिवाद करावयाचा असतो ते सगळे आपापल्या कामांत निष्णांत, मुरलेले व सगळें लक्ष सरकारी कामांत घालणारे अधिकारी असतात. त्यांना मदत करणारे सेक्रेटरी ही आपापल्या कामांत पूर्ण वाकबगार असतात. अशा प्रतिपक्षाशीं पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून अनैक्यपत्र मिळविण्याला वितां जंगी तयारी पाहिजे ! पण ती करण्यास आमच्या मेंबरांना फुरसतच मिळत नाहीं. या साठीं कौन्सिलांत आमच्या

लोकांची छाप बसावयास पाहिजे असेल तर स्वार्थत्याग करून आपलें सगळे लक्ष कौन्सिलच्या कामांत घालणारे लोक पुढें आले पाहिजेत, असें ना० गोखले यांनीं जातां जातां मुंबईच्या आपल्या भाषणांत सांगितलें. कौन्सिलराच्या जागेसाठीं उमेदवार ह्मणून पुढें येणारांनीं ना० गोखले यांचे हे शद्ब हृत्पटलावर कोरून ठेवावे अशी आमची विनंति आहे.

## दि० ब० आर० रघुनाथराव.

गेल्या सहा महिन्यांच्या अवधींत मद्रास इलाख्यांतले दोन थोर पुरुष निर्घृण काळानें ओढून नेलें! ना० व्ही० कृष्णस्वामी आय्यर हे वयानें तरुण व ना० दिवाणबहादुर आर० रघुनाथराव हे वयोवृद्ध [मरण समयीं यांचें वय ८९ वर्षांचें होतें] तरी ही अर्जुन भीष्माची जोडी देशाच्या हितार्थ सारखीच उपयुक्त होती. दि० ब० रघुनाथरावांनीं ब्रिटिश अमलाखालीं व देशी संस्थानांत मोठालीं हुद्यांचीं कामें अतिशय दक्षतेनें आणि हुशारीनें करून मुत्सद्दीपणाविषयींचा, आपल्या कुलाचा, व देशाचा लौकिक उत्तम रीतीनें राखला, इंदूरसारख्या मोठ्या संस्थानाच्या दिवाणाचें काम आणि तेंही के० तुकोजीरावासारख्या पाणीदार तेजस्वी, आणि स्वतः मुत्सद्दीपणाबद्दल गाजलेल्या संस्थानिकाचे कारकीर्दींत करून त्यांना पुनः नाइंटीथसेंचुरीसारख्या मासिकपुस्तकांत सर लिपेल ग्रिफिनसारख्या खंबीर लेखकाशीं तोंडीसतोंड करण्यास व महामहोपाध्यायांबरोबर श्रुति, स्मृति व पुराणें यांच्या अर्थाबद्दल भवति न भवति करण्यास वेळ मिळत असे. पेनशन घेऊन हरिहरि ह्मणत बसण्याच्या वेळींसुद्धां दिवाणबहादूर राजकीय, सामाजिक, औद्योगिक, व आरोग्याविषयक गोष्टींसंबंधानें आपलीं मतें वर्तमानपत्रांच्या द्वारें निर्भीडपणें मांडण्यास चुकले नाहींत. इतकेंच नाहीं तर मृत्यूचा पाश गळ्याला पडेतोंपर्यंत त्यांचें कार्यव्यासत्व सुटलें नाहीं ही गोष्ट अतिशय कौतुक करण्यासारखी आहे. सामाजिक सुधारणेचे ते कट्टे पुरस्कर्ते होते, व एका काळीं सामाजिकपरिषदेचे जनरल सेक्रेटरी ह्मणून त्यांनीं न्या० रानडे यांच्या बरोबरीनें त्यांनीं काम केलें होतें. पण सामाजिक सुधारणा प्राचीन ऋषिप्रणीत शास्त्रग्रंथांच्या वचनांच्या आधारें घडवयास पाहिजे असें त्यांचें मत असे. इतक्या वर्षांच्या अनुभवानें हें मत वस्तुतः पालटावयास पाहिजे होतें, पण तसें घडलें नाहीं, व त्यामुळें समाजसुधारणेला प्रत्यक्ष मदत त्यांच्या हातून फारशी झाली नाहीं ही खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. हे जन्मापासून तामिल देशांत वाढलेले असतांही मराठी भाषेविषयींचें त्यांचें प्रेम व तिच्याचवरला त्यांचा व्यासंग हीं अमर्याद असत. मद्रास युनिव्हर्सिटींत ऐच्छिक भाषा ह्मणून मराठी ठेविली गेली या गोष्टीला पुष्कळ अंशीं कारण त्यांचें वजन व अधिकार हीं झालीं होतीं. त्यांच्या अंगीं तेजस्विता विशेष होती, व इंदूरच्या दिवाणगिरीचा राजीनामा देऊन निघतांना त्यांनीं ती दोनदां प्रकट केल्याविषयींच्या कथा लोक सांगतात. असा तेजस्वी, निस्पृह, हुषार, बुद्धिमान कर्तव्यदक्ष दीर्घोद्योगी आणि व्यासंगी पुरुष सध्याच्या काळीं अत्यंत दुर्मिळ होय. ह्मणूनच त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि कधीं न भरून येणारी आहे असें प्रत्येकास वाटत आहे.

## 'वेळींच सावध व्हा'

वऱ्हाडांतली पुष्कळशी शेती कुणब्यांच्या हातांतून मारवाड्यांच्या हातांत गेली आहे. ती कशा प्रकारें गेली व मारवाड्यांच्या हातांत तरी चिरकाल राहावी ह्मणून त्यांनीं कसें सावध राहिलें पाहिजे याविषयीं नागपूरच्या मारवाडी पत्रानें आपल्या जातिबंधूंना इषारा दिला आहे. हें पत्र ह्मणतें कीं मारवाडी प्रथम वऱ्हाडांत लोटा घेऊन आले तेव्हां वऱ्हाडांत कित्येक चांगले संपन्न पाटील व शेतकरी होते. पण कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून त्यांचीं शेतें मारवाड्यांच्या घरांत गेलीं. कुणब्यांनीं कापूस पिकविण्यांत कमाई चांगली होते असें पाहून कपाशीची लागवड सपाटून वाढविली त्यामुळें धान्याचें पीक बुडालें, गुरांना वैरण मिळेनाशी झाली, व शेतीचें नुकसान झालें. मारवाड्यांच्या घरांत शेती गेली. तीच चूक आतां मारवाडी करूं लागले आहेत. कापसाची लागवड वाढवून थोड्या वेळांत पुष्कळ पैसे मिळविण्याची दुर्बुद्धि त्यांना होत आहे, अखेरीस ते ही कुणब्यांसारखे बुडतील व जसे आले तसे रिकामा लोटा घेऊन मारवाडांत परत जावें लागेल अशी भीती सदरपत्रकर्त्याला येऊन पडली आहे, ह्मणून वरील इषारा त्यानें दिला आहे. शेतांत एक हिस्सा कपास, एक हिस्सा ज्वारी व एक हिस्सा अळशी, गहूं, हरभरा, तूर वगैरे धान्ये लावावीं अशी त्याची सूचना आहे. शेती करणारांनीं या सूचनेचा अवश्य विचार करावा.

## लढाईची खबरबात.

इटली व तुर्कस्थान यांच्यांतली लढाई अद्याप चालूच आहे. इटलीनें ऱ्होडस बेट नुकतेंच हस्तगत केलें. यामुळें तुर्कस्थानला आतां तहाचें बोलणें लावणें भाग पडेल अशी कित्येकांची समजूत झालेली दिसते. पण तसा कांहींएक प्रकार नाहीं असें तुर्कस्थाननें जाहिर केलें आहे. लोकांची सहानुभूति तुर्कांकडे विशेष आहे. तुर्कांशीं लढाई करण्यांत इटलीनें चूक केली असें आतां युरोपियन राष्ट्रांना सुद्धां वाटूं लागलें आहे. इटलीला यासाठीं लष्करांत नवी भरती करावी लागत आहे व खर्चाच्या पायीं तो देश मेटाकुटीला याला आहे. इटलीच्यानें आतां फार दिवस टिकाव धरवणार नाहीं हें उघड दिसत आहे. अशा स्थितींत तुर्कस्थाननें सुचविलेल्या अटी मान्य करून तह करण्यांतच इटलीचें शहाणपण आहे. त्रिपोलीवरचें आपलें स्वामित्र कायम ठेवून त्या देशांत व्यापारसंबंधीं वगैरे विशेष हक्क इटलीला देण्यास तुर्कस्थानचे सुलतान तयार झाले आहे. दुराग्रहानें लढाई चालवून तिजोरीचा नाहक फडशा पाडण्यापेक्षां हे मिळणारे हक्क पदरांत पाडून घेण्यांतच इटलीचा खरोखर अधिक लाभ आहे. पण इटलीला या शर्ती मान्य नाहींत आतां ही लढाई बंद होण्यास एकच मार्ग आहे आणि तो मार्ग ह्मणजे इतर राष्ट्रांचीं मध्यस्थी होय. पण तूर्त तरी हा मार्ग बंद आहे.

## फितविण्याचा यत्न.

सध्या चालू असलेल्या लढाईत अरब लोक अनेक प्रसंगीं कसे जिवावर उदार होऊन लढले, आणि वरून विमानांतून बांबचा व समोरून तोफा आणि बंदुका यांच्या गोळ्यांचा वर्षाव होत असतां त्यांनीं आपली समशेर रणभूमीवर कशी गाजविली आहे तें वाचकांस श्रुतच आहे. लढाईची सविस्तर हकीकत अलीकडे इंग्रजी वर्तमानपत्रांतन येऊं लागली आहे तिजवरून असें दिसतें कीं या अरबलोकांमध्यें फितूर उत्पन्न करण्याचे प्रयत्न इटलीनें करून पाहिले. त्रिपोली हा देश तुमचा असून तुह्मांला नागवून तो हस्तगत करणाऱ्या तुर्कांना तुह्मी कां मदत करतां? असें शिकविणाराला अरबांनीं खासें उत्तर दिलें. ते ह्मणाले, "तुह्मी ह्मणतां तें सगळें खरं;' पण आह्मी लढत आहों तें कांहीं केवळ आमच्या देशाकरितांच नाहीं, तर धर्माकरितांही आहे. आमचा देश तुर्कांनीं घेतला तरी तो इस्लामी राज्यांतच राहील. पण जर कां तो तुमच्यासारख्या युरोपियन राष्ट्राच्या हातीं आह्मी जाऊं दिला तर मशिदी मोडून ख्रिस्ताचचें होण्यास व अर्धचंद्र जाऊन त्या जागीं क्रूस येण्यास फार विलंब लागणार नाहीं. मग आह्मी नुसत्या आमच्या देशालाच नव्हे तर धर्मालाही पारखे होऊं. त्यापेक्षां तुर्कस्थानाच्या अमलाखालीं असणें आह्मास बरें वाटतें." अरबांचें हें बाणेदार उत्तर विचार करण्यासारखें आहे.

## डा० सर रामकृष्णपंत भांडारकर.

डा० सर रामकृष्णपंत भांडारकर यांचा कोणताही लेख विशेषतः भाषण घ्या, त्यांत त्यांचा सरळपणा, स्पष्टवक्तेपणा आणि कळकळ हे गुण दिसावयाचेच मुंबईच्या आर्यन ब्रदरहुडनें त्यांच्या सन्मानार्थ केलेल्या पानसुपारीचे प्रसंगीं डाक्टर साहेबांनीं केलेलें भाषणांत हे गुण प्रधान आहेत. सामाजिक सुधारणेच्या प्रगती संबंधाचें त्यांचें निदान अगदीं यथार्थ आहे. सध्या आमच्या समाजात एकीकरणाची एक व इतर ज्ञातींहून भिन्न होण्याची दुसरी अशा दोन्ही तऱ्हेच्या शक्ति दृश्यमान आहेत. सर्व हिंदुंचा एक समाज व्हावा अशी पुष्कळांची इच्छा आहे पण तिच्या बरोबरच प्रत्येक पोटसमाज आपल्या ज्ञातीची वेगळी परिषदही भरवीत आहे. कांहीं असो, अगदीं मृतवत् पडण्यापेक्षां अशा रीतीनें कां होईना पण समाज आपलें चैतन्य राखीत आहे आणि चैतन्यरक्षण हें प्रगतीचें एक लक्षणच आहे दुसरी गोष्ट त्यांनीं सांगितली ती जरी व्यक्तिविषयक असली तरी बोधप्रद आहे. ते ह्मणाले कीं पदव्या घेणारांनीं तीन गोष्टींकडे पाहिलें पाहिजे. पदवीची योग्यता' तिची वास्तविक किंमत समजण्याची पात्रता व ती प्राप्त होण्याचा मार्ग. पदवी मिळविण्यासाठीं धडपडणें वाईट आहे. पण ती अनायासे प्राप्त झाली असतां तिचा स्वीकार करणें हें वाईट नाहीं. न्या. रानडे, तेलंग, व टाटा हे आणखी दोनतीन वर्षें वाचले असते ह्मणजे त्यांना ही सन्मानाची पदवी मिळाली असती. आपल्या हातून त्याचा सन्मान झाला नाहीं याबद्दल अधिकारी मंडळीला आतां खेद होत आहे. जगांत खऱ्या कामगिरीचें चीज कधीं कधीं होत नसेल. पण आपण स्वतः आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावलें व कांहीं अलौकीक गुण दाखविला तर त्याचें चीज झाल्यावांचून सहसा राहत नाहीं सर साहेबांच्या या भाषणांत पुष्कळ नैतिक व व्यावहारिक तथ्य भरलें आहे यांत शंका नाहीं.

## अमेरिकेंतले दुसरे हिंदी प्रोफेसर.

हिंदुस्थानच्या लोकांनीं एखाद्या विषयांत कितीही उच्चप्रतीची पात्रता दाखविली तरी त्यांना त्यांच्या स्वतःच्या देशांतसुद्धां विद्यालयाच्या वरिष्ट प्रोफेसरच्या जागा न मिळतां एखादा फाटका तुटका युरोपियन पदवीधर उडी मारून त्याच्यावर जाऊन बसतो. परंतु अमेरिकेकडे पहा. तेथें गुणाला खरी किंमत आहे, रंगाला नाहीं. थोडे दिवसांपूर्वीं तेथील इलियन युनिव्हर्सिटीनें मि. सुधींद्रबोस नांवाच्या बंगाली पदवीधरास प्राच्य राजनीति व सुधारणा या विषयाचे प्रोफेसर नेमिल्याची बातमी आली होती. आतां स्टानफोर्ड नांवाच्या दुसऱ्या एका अमेरिकन युनिव्हर्सिटीनें मि० हरदयाळ नांवाच्या हिंदी विद्वानास संस्कृत साहित्य व हिंदी दर्शन या विषयांचे अध्यापक नेमिलें असल्याचें कळतें. आमच्या इकडे संस्कृत भाषा शिकविण्यासाठीं एखादा युरोपियन आणिल्याशिवाय संस्कृताच्या अध्यापकाची खुर्ची शोभिवंत झालीसें सरकारास वाटत नाहीं. मग या युरोपियन प्रोफेसराला पंचतंत्रांतला एखादा श्लोक लावण्यासाठीं एखादा शास्त्री घरीं शिकविण्यास ठेवावा लागला तरी चिंता नाहीं, अशी स्थिति एकेकाळीं होती. मि. जगदीशचंद्र बोस व डा० पी. सी. राय यांनीं शास्त्रीय शोध लावून त्रिखंडीं कीर्ति गाजविली, तेव्हां कोठें त्यांना वरिष्ठ एज्युकेशनल सर्विसमध्यें जागा मिळाली! सारांश, अंगांत गुण असूनही हिंदी लोकांच्या त्या गुणांचें

जीच या देशांत होत नाहीं. तेंच अमेरिकेपासच्या देशांत हातें हिंदी लोकांना अमेरिकेकडे अढा असल्याचें हेंच कारण आहे.

---

## रशियाचें नवें कारस्थान.

रशियानें मंगोलिया प्रांतांत एक नवें कारस्थान सुरू केलें आहे. मंगोलियाला कर्जाऊ रकमा देऊन त्याच्या मोबदल्यांत त्या देशांत व्यापार व खनन वगैरे संबंधचे विशेष हक्क मिळविण्याची रशियाची सटपट जारीनें सुरू आहे याचा परिणाम काय होणार तें सांगण्यास म्हणजे भविष्यवादीच पाहिजे असें नाहीं. इजिप्तमध्यें जें झालें तेंच भाविकत्य पुढें मागें मंगोलियाचें व्हावयाचें. कर्जाची रकम वाढत जाईल, तशी रशियाची मैत्री मंगोलियाला नकोशी होत जाईल. पण रशियाची मिठी म्हणजे अस्वलाची मिठा ! ती काय सुटणार आहे? सध्या मंगोलियावर मालकी चीनची आहे, तरी रशिया मंगोलियाचा पक्ष घेऊन मंगोलियाला स्वातंत्र्य मिळालें पाहिजे असें म्हणत आहे. चीनच्या हातून मंगोलियाची सुटका झाली कीं तो देश रशियन अस्वलानें गिळलाच म्हणून समजावें. चीनच्या अधिकाऱ्यांना सध्या आपल्या देशांतच शांतता स्थापित करण्याचें व प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचा पाया दृढ करण्याचें जंगी काम करावयाचें असल्यामुळें त्यांना या बाहेरच्या भानगडींकडे लक्ष देण्यास सूर्त वेळ नाहीं त्याचा फायदा रशिया अशा रीतीनें घेऊं पहात आहे.

## जपानी स्त्रियांचो महत्त्वाकांक्षा.

जपान हा एक पौर्वात्य देश असल्यामुळें कित्येक शतकें पर्यंत तेथील स्त्रियांची आपल्या कर्तव्याबद्दलची कल्पना आमच्या पौराणिक स्त्रियांच्या सारखीच होती. स्त्रियांचें कर्मक्षेत्र म्हणजे गृह, दैवत म्हणजे पति, आणि महत्तम महत्त्वाकांक्षा म्हणजे पतीची अखंड एकनिष्ठ सेवा. यापलीकडे बाह्य जगाशीं आपला संबंध नाहीं व आपली कर्तव्यमर्यादा यापलीकडे जाणें चांगलें नाहीं असें त्या समजत, पण स्त्रीशिक्षणाचा प्रसार व पाश्चात्यांचा संसर्ग यांनीं त्यांची दृष्टि विकास पावल्यापासून आतां नुसत्या गृहिणीपदानें त्यांचें समाधान होईनासें झालें आहे, आपणांस नागरिकत्वाचे व राजकीय हक्क असावेत असें त्यांना वाटूं लागलें आहे. राजकीय विषयासंबंधाच्या सभांना जाणें किंवा राजकीय विषयांची चर्चा करणें या दोन्ही गोष्टी जपानी स्त्रियांना तेथील कायद्यानें मना केल्या आहेत. हा त्रासदायक कायदा बदलून स्त्रियांवर ठेविलेले प्रतिबंध काढून घेण्याविषयींचें बिल नुकतेंच जपानच्या राजसभेपुढें आलें होतें, आणि त्यावेळीं झालेली चर्चाही मोठी गमतीची होती. या विषयाचा विचार करून रिपोर्ट करण्यासाठीं नेमिलेल्या कमिटीचें असें मत पडलें कीं स्त्रियांना सभांना जाण्याची मोकळीक दिली कीं गृहकृत्याकडे त्यांचें दुर्लक्ष होईल व पतिपत्नींमध्यें राजकीय प्रश्नाबद्दल मतभेद झाला कीं त्यांचा दुष्परिणाम घरांत दिसून येईल. यावर विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांनीं सांगितलें कीं असला प्रकार व्हावयाला जपानी स्त्रिया म्हणजे काहीं ढालगज युरोपियन मडमा नाहींत! दुसऱ्या एकानें सांगितलें कीं हा निर्बंध घालण्यात आला त्यावेळीं स्त्रिया म्हणजे 'अनृत साहसं माया' इ. दुर्गुणांच्या मूर्ती होत अशी रानटीपणाची कल्पना लोकांत होती आतांनीत पुष्कळच फरक पडला आहे. तेव्हां बिल पास करावें. पण जपान जरी इतर बाबतींत पुष्कळ सुधारला आहे तरी स्त्रियांविषयींच्या कल्पनांच्या बाबतींत दोनचार शतकें पश्चात्य राष्ट्रांच्या मागें आहे. शेवटीं बहुमतानें बिल नामंजूर झालें आणि जपानी स्त्रियांना आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची वाट पहात तरी बसलें पाहिजे, किंवा इंग्लंडांतल्या मताभिलाषी स्त्रियांप्रमाणें कायद्याच्या चांगलवाईटाला न भितां कायद्यालाच भिवडावून मोडण्याच्या उद्योगाला तरी लागलें पाहिजे हें उघड आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

---

...मान—उष्णतेचें मान बरेच वाढलें आहे. अत्र वारंवार येतात त्यामुळें उष्मा फार होतो. गावातील पाणी बिघडल्यामुळें कॉलरा सुरू झाला आहे. इकडे म्युनिसिपालिटीचें विशेष लक्ष देईल अशी आशा आहे. बाकी रोगराई विशेष नाहीं.

रा. रा. ए. जी. स्कॉट असि. पो. सुपरिंटेंडेंट उमरावती यास एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. पांडुरंग बापुदेव भगत तहशीलदार केळापूर यांनी तीन महिने रजा घेतल्यामुळें रा. रा. यशवंत गणेश खैसाळकर सु. लॉ रेकॉर्डस उमरावती यास त्यांच्या जागीं तहशिलदार नेमण्यात आलें आहे.

### विविध विषयांचीं टांचणें.

१ सामान्यतः मुलांचे अंगीं पुढील गुण असतात—१ चंचलता, जिज्ञासा, सौंदर्यप्रियता, चित्र काढण्याचा शौक, गानप्रियता, दुसऱ्याची नक्कल करण्याचें स्वाभाविक ज्ञान, वस्तूंचे मूळचे आकार बदलून त्यांना नवे आकार देण्याची इच्छा. हे सगळे गुण असे आहेत कीं त्यांचा विकास शिक्षणाच्या योगानें योग्य प्रकारें झाल्यास त्यापासून त्यांचें जीवन सुखमय व्हावें. पण चूक होते ती सगळी शिक्षण देण्यात होते.

२ भक्त कवि सूरदास या हिंदी कवीचें नांव ऐकलें नाहीं असा मनुष्य विरळाच सांपडेल. हा अंध होता यावरून सामान्यतः कोणाही अंध पुरुषाविषयीं बहुमान पुरःसर बोलणें झाल्यास त्याला 'सूरदास' म्हणण्याची चाल पडली आहे. याचा बाप अकबर बादशहाचे दरबारीं भाट होता असें म्हणतात. पृथ्वीराज चव्हाणाचे वेळचा सुप्रसिद्ध भाट चांदबरदाई हाही सूरदासाचा एक पूर्वज होता. याच्या अंगीं अप्रतिम कवित्वशक्ति होती. कित्येक रसिक टीकाकार तर कवित्वाचे बाबतींत सूरदासाचा नंबर तुलसीदासाच्याही वर लावतात. यांचे मुख्य ग्रंथ म्हटले म्हणजे सुरसागर, सुरसारावली व साहित्यलहरी हे होत. सूरदास एकेश्वरवादी, निष्ठावंत वैष्णव होता.

३ वैदिक युगापेक्षां ब्राह्मण कालांत आळस व विलास यांची वाढ झाली होती. अर्थात त्याच्या बरोबर तज्जन्य व्याधिही आल्या; आणि त्यांमुळें या काळांत शल्यविद्या (सर्जरी), पशुचिकित्सा, व्रणचिकित्सा गर्भिणीचिकित्सा वगैरे आयुर्वेदाच्या नव्या नव्या शाखा अस्तित्वांत आल्या. त्या काळचें पथ्य म्हणजे जवाचें पाणी. हेंच पथ्य सर्व रोगांवर असे. याच काळांत जलचिकित्सा अथवा हायड्रोपाथी प्रथम निर्माण झाली. बद्धकोष्ठावर बस्तीचा व मूत्र रोधावर शलाकाप्रयोग हे उपाय याच वेळीं निघाले. रोग्यांना पोटांत औषध देऊन शिवाय वरून काढ्यानें स्नान घालीत असत. पित्तरसाच्या योगानें अन्नाचें पाचन होतें हें ज्ञान त्या काळच्या वैद्यांना होतें. किंबहुना हा शोध या ब्राह्मण काळातच लागला हटलें तरी चालेल.

४ चहा हा चीन देशातून विलायतेस जाऊन तेथून आता हिंदुस्थानांत आला अशी परंपरा सांगतात. पण ती चुकीची आहे. ही वनस्पति मूळची हिंदुस्थानची असून इ० स० ६४३ मध्यें बौद्धभिक्षु आपल्या बरोबर चीन देशांत घेऊन गेले. बोधिधर्मनांवाच्या बौद्धभिक्षुनें तो तिकडे नेला अशी दंतकथा जपानांत अजून आहे. शास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं आसाम हीं चहाची मूळची जन्मभूमि असली पाहिजे. त्या प्रांतांत रानचहाचीं रोपें अद्याप रानोमाळ दिसतात हीं रोपें कधीं कधीं २० फूट उंचीचीं सुद्धां असतात सध्यां हिंदुस्थानांत एकंदर ५९१६ लक्ष बिघे जमिनींत चहाची लागवड होते. आसामांत दर एकरीं चहाचें पीक ४०० पौंड येतें. एकंदर हिंदुस्थानांत २४ कोट पौंड चहा उत्पन्न होतो त्यांतला १६ कोट पौन्ड नुसता आसामांत होतो. आसामांत चहाच्या लागवडीवर ८ लक्ष मजूर पोटें भरीत आहेत. चहापान हें क्षयावर उत्तम औषध आहे अशी कांहीं लोकांची समजूत होती; पण अनुभव उलट आला. चहा प्याल्यानंतर त्यावर कांहीं पौष्टिक पदार्थांचें सेवन केल्यास चहापासून अपाय होत नाहीं. चहांतलें टयानिन द्रव्य हृद्रोगव हिस्टेरिया सारखे वातरोग वाढतात. ज्या ठिकाणचें पाणी दूषित असेल त्या ठिकाणचे लोकांनीं अगोदर चहा पिऊन त्यावर तें पाणी प्याल्यास पाण्याचे विकार बाधा करूं शकत नाहींत.

---

NOTICE

The following extract from Government of India, Home Department, Resolution No 2831-42, dated the 8th December 1899, is published for genral information.

E. A. DE BRETT,
Chief Secretary to the Chief Commissioner,
Central Provinces.

NAGPUR:
The 3rd May 1912.

RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infrequently happens that natives of India, students or others, who have proceeded to England, desire to obtain passports to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore entitled to a passport. Appeals or assistance are also frequently addressed to His Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2 In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor—General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India with an authoritative certificate of identity, in the form appended to this Resolution, signed by the head of the district (in a Presidency Town, the Commissioner of Police) in the case of residents of British India and by the Political Officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police) or Political Officer, as the case may be:—

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant
2. Father's name and caste ____________
3. Residence ____________
4. Age of applicant ____________
5. Nationality of applicant* ____________
6. Social and pecuniary status of father (or guardian) ____________
7. Date of probable departure of applicant from India ____________
8. Object of applicant's visit to England (Europe) ____________

Signature of District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police), or Political Officer, or Head of School or College.

Date ____________

N. 249

* i.e., whether a British subject by birth or by naturalization (or a subject of a Native State).

† Counter-signature of the District or Political Officer should be obtained on certificates signed by heads of schools or colleges.

(1238—1)

## नोटीस

नोटीस बेशमी मंजी मर्द बापु माळी खंडारे राहणार जळगांव ता० जळगांव जि० बुलढाणा इसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुझा नवरा नामे बपु मयत होण्यास अजमास चारपाच वर्षे झाले, त्यांत बापु याजला बायका २ आहेत. व दोघी बायकांना मुली २ आहेत त्याच मुली मयताचे जिंदगीच्या मालकिणी ठरल्या आहेत. कोर्टानें वारस ठरविले आहे. व तू तुझी स्वतःची मुलगी नामें जनी ही माझे मुलास दिली आहे ती मुलगी माझी सून आहे. जनी मर्द संपत माळी ही एकद्वितिऑश जिंदगीची वारस ठरलमुळें मजला त्या इस्टेटची व्यवस्था ठरणें जरूर आहे. कारण मुलाचे व मुलीचे कल्याण व्हावे, अशी तुझी व माझी ही इच्छा आहे तूं अज्ञान पालक आहेस, सबब तूं इस्टेटीची व्यवस्था नीट रीतीनें ठेवावी. मयत बपुची जिंदगी खालीं लिहिलेप्रमाणें —

मौजे वडगांव नजीक पाटन ता० जळगांव येथील शेती व घर धाब्याचे ही त्याच गावचे आहे

वरील अज्ञानाची जिंदगी तूं अफरा तफर करणें लावली आहेस, हे तूं नीट करीत नाहींस.

तशा नवरा नामे बपु हा जिवत असेपर्यंत त्याजला कोणत्याही प्रकारचे कर्ज नव्हते, बापचे मरणानंतर तूं कर्ज केलें आहे असे ऐकले आहे. व लोकांचेजवळ अज्ञानाचे जिंदगीपैकीं कांहीं जिंदगी तू लोकांचेजवळ गहाण खरेदी दिली आहे हे चांगले केले नाहीं तूं विधवा असलेमुळें तुजला फक्त अन्नवस्त्राचीच मालकी आहे असे असून तू केले हे नीट केले नाहीं करितां खरेदीबद्दल बापुचे मरणानंतर जे जे कर्ज केलें असेल त्याजबद्दल तूंच जबाबदार आहेस वर लिहिलेल्या अज्ञान जनी मर्द संपत राऊत यांचे इस्टेटीपैकीं कांहीं अगर सर्व इस्टेट तं कोणाजवळ गहाण अगर खरेदी दिल्यास व याजबद्दल मागें झालेले लेख व पुढेंही होणारे लेख रद्द समजले जातील.

वर लिहिलेली अज्ञानाची जिंदगी मागें अगर पुढें हा कोणी गहाण अगर खरेदी घेतल्यास रद्द समजले जाईल.

वर लिहिलेप्रमाणें तुझेकडून वर्तन न झाल्यास अगर इस्टेटीची अफरातफर केल्यास योग्य कोर्टांत फिर्याद करून सर्व इस्टेटीची व्यवस्था सरकारमार्फत राहील असेबद्दलें तजवीज करील.

नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत जबाब यावा न दिल्यास वर लिहिले प्रमाणें अज्ञानाचे जिंदगीची व्यवस्था करण्यांत येईल. ही नोटीस दिली सही ता० १-५-१९१२ इ.

सही

मारुती वा० जाणु माळी राऊत राहणार वडगांव नजीक पाटन ता० जळगाव जि० खु०

नो० नं० २४१

---

## नोटीस

बेशमी-आत्तासखा वा० शेरखा मुसलमान रा. मलकापूर तां. मलकापूर जि. बुलढाणें यांस.—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी मुलगी नामे मैनाबी इजशीं तुमचा विवाह होऊन आज ८ वर्षे झालीं ४५ वर्षेपर्यंत मुरळींत चालत आज ३ वर्षांपासून तुम्ही तिला टाकून दिलें तेव्हांपासून ती माझे घरीं आहे. मजी गरीबी अवस्थामुळें तिच्या पोषणार्थ मी सावकाराचे ४ रुपये माहे प्याप्रमाणें मजला ३ वर्षांचे १५० रुपये कर्ज झालें आहे तर नोटीस पावतांच ८ दिवसाचे आंत मजला १५० रुपये देऊन तिजला घेऊन जावे. मी पाठविण्यास तयार आहे तिजला नेत नसल्यास फारकती द्यावी आठ दिवसांत तुमचे कडून काहींच न कळल्यास मी हीच नोटीस फारकत समजून तिजला दुसरा नवरा करून देईन मग तुमचा तिचेवर कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं कळावें ता. ४-५-१२

सही

महमद पना वा० शेखइमाम रा. बोराखेडा ता. मलकापूर पो. मोताळा जि. आंगठा

नो. नं. २४२

---

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रघुवरसिंग चतरसिंग हजारी रा० नागद ता० कनड जि० खानदेश पो० राजनगांव

यांसः-

खालीं सही करणार नामदेव माधोजी कुचके राहणार हात तालुका बाळापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही तुमचे मालकीचे मौज हात तालुका बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ११९ एकर गुंठे २१०५ आकार रुपये ४० हे शेत सालीम झाडाझुडासुद्धा रुपये ३३०० ऐवजी आम्हास खरेदी देण्याविषयीं करार करून तारीख ९।२।१२ इसवी रोजीं आमचे-पासून रुपये २०० इसाराबद्दल नगदी घेऊन तुम्ही आम्हास पावती करून दिली व शेताचा कबजा हि दिला त्यावरून आम्ही शेताची किस्तकारीहि केली तुम्ही पंधरा दिवसांनीं रुपये ३१०० घेऊन आम्हास खरेदीखत करून देतां असें कबूल केलें असे असतां आज त्या गोष्टीस अजमास तीन महिने होत आले तथापि तुम्ही आपली रक्कम घेऊन जात नाहीं व आम्हास खरेदीखत करून देत नाहीं. त्यास या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आम्हास खरीदीखत लिहून नोंदून द्यावें व आपली राहिलेली रक्कम रुपये ३१०० आमचे पासून चुकती घ्यावी तसें न केल्यास कायद्याप्रमाणें खरेदीखताबद्दल आम्हास दिवाणी कोर्टांत दावा करावा लागेल त्याचा खर्च तुमचेवर पडेल. असे करण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून तुम्हास आगाऊ नोटीसीनें कळविले आहे. या नोटीशीचा खर्च द्यावा लागेल कळावे तारीख ४-५-१२ इसवी

सही

नामदेव माधोजी कुचके द. खु.

नो नं. २४३

---

## जाहिरात

मी खालीं सही करणार जाहिर नोटीशीनें सर्वत्र लोकांस कळवितो कीं कसबे अडगांव ता० आकोट येथें तुळसीराम बागडी या नांवाचे सराफी दुकान आहे त्यांत मी आणि माझा भाऊ शीवप्रताप असे आम्ही दोघे शराकतदार आहो. त्या दुकानसंबंधी गोविंदलाल एका बाजूला असून व एका बाजूला आम्ही दोघे भाऊ आहो. आणि दुकानचे स्थावर, जंगम इस्टेटीबद्दल आमचा आपसांत तटा चालूं आहे. गोविंदलाल हा भोळसरपणाचा मनुष्य असून कांहीं वाईट चालीच्या लोकांचे संगतीनें राहून दुकानचे इस्टेटीची अफरातफर करून राहिला आहे म्हणून जाहीर करण्यांत येतें कीं सदर्हू गोविंदलालशीं कोणत्याही इसमानीं कोणत्याही प्रकारच्या आमच्या संमती खेरीज कोणताच व्यवहार करूं नये जर कोणी करील तर आणि त्याबद्दल आमचे दुकानची कांहीं नुकसानी झाली तर त्याज बद्दल ते लोक जबाबदार धरले जातील कळावें ता० ३०।४।१२ दस्तुर नरहर हांबार्जी रा० आकोला.

सही

नंदलाल बलुभद्रान बागडी मारवाडी राहणार अंत्री मलकापूर ता० बाळापुर दस्तुर खुद.

नो० नं० २४४

---

## नोटीस

रा. हेमराज कचेरदास मारवाडी रा. धनज बुद्रुख ता० मर्तीजापूर तुम्ही दिलेली नोटीस ता० २७-४-१२ रोजीं पावली

१ तुम्ही मजला सन १९ १ चे जुलाई महिन्यात नोकर ठेविले. तेव्हां तुम्ही मजला २० वर्षांचा करार करून ठेविले होते या मुदतीचे दरम्यान मजला तुम्ही सोडल्यास पुढील भोगणें राहिलेले मुदतीचा पगार भरून देईन असे कबूल करून मजला कुलमुकत्यारपत्र ता० २०-७-१९-१ रोजीं दिलें.

मी नोकर राहिलो तेव्हांपासून कोणत्याही प्रकारचे कागदपत्र माझजवळ व माझे ताब्यात ठेवण्याचा प्रथमपासून तुमची परवानगी नसल्यामुळें कोणत्याच प्रकारचे कागदपत्र मजजवळ नाहींत. मजला संवत १९६८ चे कार्तीक शुद्ध १ रोजीं कांहीं कारण नसतां कामावरून दूर केले त्यामुळ कार्तिक शुद्ध १० चे सुमारास तुम्हास सर्व समजून दिले आहे अंदाज माझे ९ वर्षांचे नुकसान झालें ते तुम्हास भरून द्यावे लागेल. कळावें ता० ४-५-१२

सही

मारुती रामकृष्ण रा० धनज बु० द० खु०

नो० नं० २४५

---

## नोटीस

बेशमी तीर्थरूप शामराव वलद सखाराम देशमुख राहणार वरणगांव ता० बाळापूर जि० आकोला यांना.—

सा० विनंतीपूर्वक कळविण्यांत येते कीं, आपण माझे जन्मदाते पिते आहा म्हणून आपणास कळवितो कीं, मला माझे आईचे पित्यानें [ अर्थात् माझे आजवानी ] आपले स्थावर जंगम मालाचे बक्षीसपत्र करून दिलें होतें. व कांहीं दिवसांनीं त्यांनीं दुसरी बायको केली म्हणून त्यांनीं तें बक्षीसपत्र मजजवळून खरेदी करून घेतलें त्या खरेदीबद्दल रुपये ६०० त्यांनीं कोर्टांत भरुन दिले ते रुपये मी पुन्हां त्यांच्याच जवळ ठेविले व दुसरे दिवशी रुपये मागण्यास गेलो असतां त्यांनीं असें सांगितलें कीं तुझे बापाचें शेत मजजवळ १०० रुपयास गहाण आहे. त्याला अंदाज ११ वर्षे झाली. त्याबद्दल मी दामदुप्पट करून २०० रुपये व तुझे मावशीनें मल खरेदी दिलेले शेत मी तुझ्या बापास १ वर्ष करितां बटाईनें दिलें होतें. त्या शेतातील मालाबद्दल रुपये ४०० व गहाणाबद्दल रुपये २०० असे एकूण रुपये ६०० मी जमा करून घेतले आहेत. तर आतां ते रुपये तूं आपल्या बापास मागावे. हे रुपये ६०० व माझे आजवानी माझे बायकोला दिलेली देणगी सोन्याची सरी किं० १०० असें मिळून माझे ७०० रुपये व तुमचे ६०० रुपये घालून असे १३०० रुपयास आपण दोन शेतें तहशीलदारा समोर आपले नांवे करून घेतले. त्यापैकीं शेत सर्वे नंबर ९८ कार्याचे शेत माझे नांवानीं करावयाचे होतें तें आपण आपल्याच नांवानीं करून घेतलें. तुमी माझे वडील असल्यामुळें मी मुका त्यानें बसलो. व मला माझे लग्नांत आंदण मिळालेल्या गाई दोन व त्याचो वासरें आठ पैकीं तीन गाई व पाच गोन्हे असे आठ वासरें होतीं पैकीं तुम्ही एक गोन्हा ५० रुपयास विकला ते रुपये ५० व गाई दोन, वासरे तीन गाई व गाईकेंडे गोन्हे चार असें सात वासरें, व जे शेत माझे नांवानीं करावयाचे होतें त्याचा दरसाल लागवड ९५० रुपये येते. ते शेत आपण चार वर्षे वाहिलें त्याबद्दल रुपये ६०० व गोन्ह्याचे ५० रुपये एकूण रुपये ६५०, व मी ज्या गांवात राहतो तेथील पेरात शेत सर्वे नं० ९८ यांतील सन १९१० चे पीकाची जवारी ४॥ खंडी आहे तर त्यातील मी आपणास २ खंडी घेऊन बाकीची जवारी २॥ खंडी आपण घेऊन जावी व माझे वरील शेत माझे ताब्यांत द्यावें व राहिलेलें एकंदर ९ गुरे माझे स्वाधीन करावी. व वरील शेताचे लागवडीचे बद्दल व गोन्ह्याबद्दलचे रुपये ६५० एकूण रुपये ६५० मी मागेन त्यावेळेस द्यावे. न दिल्यास मी रीतसर तजवीज करीन कळावें हीं विनंती. ता० ४।५।१२ ई० सही

आपला बळवंत शामराव देशमुख रा० वरणगांवकर हल्लीं मुक्काम वरणगांव द० खु०

नो० नं० २४६

## इराणी बल

(जोर) मोटारगाडी अटकवितां येते साखळदंड तोडितां येतो

**इनाम रुपये ५०० ! इनाम रुपये ५०० !**

प्राचीन इराणच्या रुस्तम व अस्पाद यार वगैरे बहादुर पहिलवानांची शक्ती ज्या योगानें जगविख्यात झाली तीं औषधें आम्ही हजारों मेळवरुन आणलेली आहेत. गंधक सोडा दोन वस्तूंचे कुशलतेनें समिश्रण केलें ह्मणजे ज्याप्रमाणें फुलपावर दारू (Gun Powder) बनते त्याप्रमाणें सालमिश्री, द्राक्षें, बदाम, पिस्ते, डाळिंब, सफरचंद वगैरे अत्यंत शक्तीवर्धक पदार्थांचें सत्व आम्ही शास्त्रीयरीत्या यंत्रानें बनविलेलें आहे. या पांच सात मेव्याच्या कुशल समिश्रणानें विद्युतशक्ती व जोर इतका उत्पन्न होतो कीं कसाही कमताकद मनुष्य असला तरी त्यास तीन दिवसांत शक्ती येऊं लागते दहा बारा दिवस हे खाल्यावर चेहऱ्यावर लाली चढूं लागते व गेलेली ताकद पुन्हां येते. याच्या योगानें धातुपुष्टीही होते. वृद्ध तरुण, स्त्री पुरुष या सर्वांस ही फायदा देणारी व मजेदार वस्तू आहे. दोन महिने आमच्या सांगण्याप्रमाणें जर याचें सेवन झालें तर मनुष्य मोटारगाडी अडवूं शकेल व साखळदंड तोडूं शकेल खात्री पटविण्याकरितां हा जगविख्यात फळांचा मेवा आम्ही समक्ष तीन दिवस फुकट खावयास देऊं या आमच्या मेव्यांत तांबे, पारा रुप्याचा भाग वगैरे रासायनिक द्रव्यें आहेत असें जो कोणी सिद्ध करील त्यास ५०० रुपये बक्षीस देऊं किंमत एक तोळ्याची २॥ रुपये हे पंधरा दिवस पुरते.

**बादशाही गोळी:—**

१ गोळी खाल्यानें टिकाव व ताकद माहीती पडते:— किंमत १॥ रु. एक डझनची

**इराणी मर्दानी पट्टी.**

या एकाच्या पट्टीच्या योगानें मुंबईत हजारों माणसांचा फायदा झाला आहे. ज्या माणसाच्या शरीरांत ताकद नाहीं. त्या माणसानें ही पट्टी सहा सात दिवस बांधली ह्मणजे यास जवान मनुष्याप्रमाणें ताकद येते. यापासून आग होत नाहीं किंवा फोड येत नाहीं जर कोणास या औषधाबद्दल भरंवसा नसेल तर आम्ही कान्ट्रक्ट करून हें औषध पैसा घेतल्याशिवाय त्यास देऊं गुण आल्यावर पट्टीची किंमत व बक्षिस निराळें घेऊं किं. १० पट्टीचा रु. ५ व पांच पट्टीची किं० रु. २

**खानदानी हकीम-सैय्यद जाफर हुसेन तबरेजी (इराण)**

जाफरी दवाखाना जे जे. इस्पितळचे समोर जितेकरच्या नव्या बिल्डिंगच्या शेजारी पहिला माळा, मुंबई जाफरी दवाखान्यांत. नो० नं० १९७



**बिहार आनन्दका सागर रंगीन तसवीरें सहित चारों भाग तथा पांचों अंग सचित्र कोख शास्त्र.**

अवकी हमसे मंगाओ धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रिया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगारि, वर्तासोआमूशण, वस्त्रतआदवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकक्रिया, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुदे भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुर्दा विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

**पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडो अलीगड.**

नो० नं० १९



### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

**पत्ता एम. एम. आणि सन्स पुलाजवळ आकोला**


### नोटीस

वि० सबजज रु. ब बहादूर आकोला यांचे कोर्टी:—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १३ सन १९१२ सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज—

अर्जदार

१ समशेरखा वल्द बनेखा.
२ दराबखा वल्द बनेखा.
३ नसीरखा वल्द बनेखा.
४ गवदबी मर्द बनखा.
५ रहिमबी मर्द फौजदारखा सर्व जात मुसमान.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यांनीं सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज आमचें कोर्टांत दिला असून त्याची चौकशीची तारीख ८।७।१९१२ इ० आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० ११-५-१२ इसवी.

सही
JANKIPRASAD.
सबजज आकोला.

नो० नं० २४७


## आमच्या औतां पासून

दुप्पट फायदा करून घ्या

[१] किर्लोस्करांच्या सुधारलेल्या लोखंडी नांगरानें लांकडी नांगरापेक्षां तितक्याच वेळांत दुप्पट काम होतें

(२) किर्लोस्करांच्या पेटेंट कडबा कापण्याचें यंत्रानें निमे वैरण वांचते

(३) किर्लोस्करांच्या मोठ्या लोखंडी चाकानें तितक्याच वेळांत दोन बैल चार बैलांचें काम करितात.

लोखंडी नांगर नंबर ९ किंमत रु. ३९
लोखंडी नांगर नंबर १० किंमत रु. ३७
लोखंडी नांगर नंबर १२ किं. रु. १०५
पेटेंट कडबा कापण्याचें यंत्र किं. रु १०५
मोटेचें लोखंडी चाक किंमत रु. ८८

विशेष माहितीसाठीं आमचा नवा क्याटलाग नंबर "व" मागवा.

**किर्लोस्करबंधु.**
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० २४८



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६५]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन अटींच्या.
पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.
पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३



## Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a give um, but it is essential to know how such Funds are invested if is miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employin portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he ma save money yet, if he dies early before he had time to save much, hi wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family withou the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआप्पाप्रमाणें छापून प्रसिद्ध केलें.

Registered No N.4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६] आकोला—सोमवार तारीख २० माहे मे सन १९१२ ई० [ अंक २०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचं सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक
आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट.
नो० नं० २

### चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात मोल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक
श्री राधावल्लभाजयाति

---

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापारमें किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काममें कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपयेमें भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेजकर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.

---

### नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीचे द्वारें जाहीर करण्यांत येत आहे कीं, जनाब चीफ कमिशनर साहेब बहादूर मध्यप्रांत यांच्या जुडिशियल डिपार्टमेंट नोटिफिकेशन नंबर १६०३ तारीख १९ सप्टेंबर १९११ यांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें दिवाणी कोर्टांनीं निकाल केलेल्या मिसलांची व्यवस्था रक्षण व नाश या संबंधानें नोटिफिकेशन नंबर [३९६३ ता० २६ मार्च सन १९०६ मध्यें जे नियम प्रसिद्ध केले गेले आहेत त्या नियमानुसार ता० २६ मार्च १९०६ चे पूर्वींचे सर्व नियम रद्द समजले जाऊन पूर्वींच्या जुन्या मिसलांची व्यवस्था केली जाईल करितां सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ज्यांनीं ज्यांनीं जुन्या मिसलामध्यें महत्वाचे कागद दाखल केले असतील ते परत घेण्या करितां ता० १ मे सन १९१२ चे आंत आमचे कोर्टांत अर्ज दाखल करून आपले कागद परत घेऊन जावें असें न केल्यास सदर्हू कागदांचा नवीन नियमाप्रमाणें नाश केला जाईल. कळावें.

अकोला

ता० १७ जानेवारी १९१२ इ.

A. D. BARR.
डिस्ट्रिक्ट व सेशनजज्ज
नो० नं० ४४ पश्चिम वऱ्हाड

---

### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

### जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेंखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळ्या | ” | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | ” | २ |
| खोकल्याच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | ” | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १५ |
| त्रिभूवन किर्ती | ” | २ |
| श्वास कुठार | ” | २ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | २ |
| समिर पन्नग | ” | ५ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बांटली | ८= |
| डोळ्यांचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | + |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ॥ |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ॥=; |
| मध्यम | ” | ।-॥ |
| लहान | ” | ८= |
| उसाचा शिर्का | ” | ।= |
| मध बाटली. | | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ८=॥ |
| पिनसावर तेल | ” | ॥ |
| ग्लिसराईन बाटली. | | ८= |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ८=॥ |
| शंखद्राव. | तोळा | ॥ |
| कुंचल्यादि वटी | ” | ॥ |
| हिंगणबेटाचे तेलें | ” | ८= |
| नारायण चुर्ण | ” | ८= |
| इच्छाभेदी जुलाब डझन | | ८= |
| गृहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ८= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.

ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला.

### नोटीस

नोटीस बेशमी—ईश्वरदास मंगळदास मारवाडी रा. व्याळ ता० बाळापूर व विठोबा वा। जेराम पाटील कुणबी रा. खंडाळे तालुके बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझेपासून मौजे व्याळ प्र. ता. बाळापूर जि. आकोला येथील शेत सर्वे नं. २७८ एकर २२ आकार रुपये ३२ खातें सुकदेवचे नांवे असून एक द्वितीअंश हिस्सा पूर्वेकडील आंब्याचे झाडासुद्धां व सर्वे नंबर ३६६ एकर २८१८ आकार रुपये ५॥ खातें रामजीचे नांवे असून यांतील एक शष्टमांश हिस्सा पश्चिमेकडील व तिसरें शेत सर्वे नं. २८४ एकर १४८३४ आकार रुपये ११ खातें सूर्यभानचे नांवें असून एक बारमांश हिस्सा मध्य भागचा सदर्हू शेतांतील हिस्से तुह्मी माझेपासून कर्जाचे फेडी करितां तरीख २५ माहे एप्रिल सन १९१२ इसवी रोजीं पांच वर्षाचे पट्यानें लिहून घेतले त्यांत वरील शेत सर्वे नं. ३६६ एकर २८१८ आकार रुपये ५॥ खातें रामजीचे नांवें असून यांतील एक शष्टमांश हिस्सा जप्त होऊन हरास झाला तें तुह्मी मला सांगितलें नाहीं व दगलबाजीनें माझे पासून पट्टा लिहून घेतला व मला फसविलें एवढ्या करितां वरील तीन्ही शेतांतील हिश्याचा पट्टा आज तारखेपासून रद्द समजावा तुमचे माझेकडे पट्टेखतांत लिहिले प्रमाणें ३३१॥ रुपये निघत आहेत. ते मी देण्यास तयार आहे. तुह्मी शेतांमध्यें मुळीच वहीती वगैरे करूं नये केल्यास तुमचेवर कायद्याप्रमाणें काम चालवूं तरी नोटीस पावतांच १५ दिवसाचे आंत तुमचे रुपये ३३१॥ घेऊन जावे व पावती द्यावी. व माझेपासून लिहून घेतलेला पट्टा माझे हवाली करावा न केल्यास आह्मी योग्य तजवीज करूं तसेंच तुह्मी शेतांत येऊन आमच्या वहितीस हरकत कराल तर तुमच्यावर फौजदारी काम चालविलें जाईल. तुमची लबाडी दिसून आल्यावरून शेताचा कबजाहि आह्मी तुह्मास दिलेला नाहीं व साल मजकूरा सर्व किस्तकारी आह्मीच केली आहे. तुमची कोणतेही तऱ्हेनें आह्मी नुकसानी केलेली नाहीं. या उपर तुह्मी शेतांत जाल तर आह्मी तुह्मास पैसा देवाल नाहीं. कळावें तारीख १४ मे सन १९१२ इ.

सही
बाबाराव बा। आकाजी अ. पा. करणार झाबूबाई मर्द आकाजी
नि. हातचा आंगठा

नो. नं. २९०

वऱ्हाडसमाचार.

ज्येष्ट शुद्ध ४ शके १८३४ परिधावी

## बाबू विपिनचंद्र पाल.

बाबू विपिनचंद्रपाल यांच्या लोक शिक्षणाविषयींच्या कल्पना त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनेसारख्याच गंमतीच्या आहेत. विलायतेहून परत आल्याबरोबर मुंबईस त्यांना येथील राजकीय वातावरणाचा जो मासला चाखण्यास मिळाला तेवढ्यानें त्यांचे डोळे उघडून त्यांनीं राजकीय विषयावर बोलण्याचें किंवा लिहिण्याचें सोडून देऊन रीतिवर बंगाली भाषेंत व्याख्यानें देण्याचा शहाणपणाचा मार्ग स्वीकारला होता. पण राजकीय विषयावर आणि तेंही कांहीं अद्वितीय प्रकारचें लिहिल्यावांचून आपली प्रतिष्ठा कायम राहावयाची नाहीं अशी समजूत होऊनच कीं काय त्यांनीं पुनः एकदा राजकीय विषयाच्या चर्चेंत भीत भीत पाउल टाकण्याचा यत्न केला आहे. या खेपेस त्याच्या लेखाचा विषय सक्तीचें शिक्षण हा आहे. त्यांचा आजपर्यंतचा लौकिक स्वराज्य आणि हिंदुस्थानचें अंतिमध्येय या बद्दलच्या भलभलत्या अव्यावहारिक कल्पना तरुणाच्या डोक्यांत भरविल्याबद्दलचा आहे त्याच बाबूंनीं सक्तीच्या शिक्षणाच्या ना० मि० गोखले यांच्या कल्पनेला अव्यावहारिक म्हणावें, आणि ही कल्पना मृगजळासारखी आहे, तिच्या मागें लागण्यात अर्थ नाहीं असा टाहो फोडावा हें चमत्कारिक दिसतें पण बाबूंच्या लेखांत चमत्कृतिजनक कांहीं नसलें तर त्या लेखाला कोण विचारणार? प्रथम मि. पाल हे साक्षरता व शिक्षण यांच्यांत भेद दाखवितात. आणि असें प्रतिपादन करतात कीं सध्याचे काळीं लोकांना शिक्षणाची जरूरी आहे, साक्षरतेची अथवा लिहितांवाचतां येण्याची नाहीं; आणि बौद्ध काळचें उदाहरण देऊन ते असें सिद्ध करूं पाहतात कीं इतक्या प्राचीनकाळीं सुद्धां लोकात शिक्षणप्रसार करण्याचा यत्न आमचे लोक करीत असत; पण आतां पहावें तर जिकडे तिकडे सामसूम आहे! ज्या शिक्षणाचा मनावर योग्य संस्कार होईल तें शिक्षण होय व नुसतें लिहितां वाचतां किंवा हिशेब ठेवतां येणें ही साक्षरता झाली. हा भेद लक्षांत ठेवला तर कोणत्याही काळीं लोकांच्या मनावर संस्कार उत्पन्न करणाऱ्या शिक्षणाची महती विशेष व त्यापासून होणारें देशकार्य ही मोठेंच असणार हें सांगावयास नकोच पण हें मनावर संस्कार करणारें उर्फ उच्च शिक्षण साक्षरतेशिवाय येईल काय? खालच्या पायरीला पाय न लावतां एकदम उच्च शिक्षणाच्या पायरीवर उडी मारण्याची युक्ती बाबू विपिनचंद्र यांस कदाचित् ठाऊक असेल, पण त्यांनीं तिचें रहस्य आपल्या देशबांधवांना सांगण्याची अत्यंत उच्च प्रतीची देशसेवा आजपर्यंत कां केली नाहीं तें कळत नाहीं. आजपर्यंत ना० गोखले यांच्या शिक्षणबिलासंबंधानें नाना प्रकारच्या लोकांनीं नाना तऱ्हेचे आक्षेप घेतले आहेत. पण लोकांना लिहिण्यावाचण्यास शिकविणाऱ्या शिक्षणाची सध्याचे काळीं हिंदुस्थानात जरूरी नाहीं असा मजेदार कोटिक्रम करून ना. गोखल्यांना निरुत्तर करण्याचा यत्न आजपर्यंत कोणी केला नव्हता. मि. पाल यांनीं यावेळीं आपली अलौकिक बुद्धि खर्च करून या नव्या प्रमाणानें प्रांतिक अधिकाऱ्यांच्या व एकंदर आंग्लो इंडियन मताला जी पुष्टि दिली तिजबद्दल ते मि० पाल यांचे सदैव ऋणी राहतील.

त्यांचें दुसरें विधान म्हणजे शिक्षणप्रसार करण्याचा यत्नच हल्लीं होत नाहीं हें किती खोटें आहे! सरकारी अधिकाऱ्यांचे रिपोर्ट, व शहरोशहरीं दिसणाऱ्या खाजगी शाळा या विधानाचें खंडन करण्यास तयार आहेत. सरकार आपल्याकडून प्रयत्न करीत आहे व लोकही करीत आहेत. पण गरजेच्या मानानें हे प्रयत्न अगदींच निःसत्त्व असल्यामुळें कांहीं जोराचे प्रयत्न केले पाहिजेत व त्याला सक्तीच्या शिक्षणाचा कायदा फार उपयोगी पडेल असें ना. मि. गोखले म्हणतात. लोकांना लिहायला वाचायला येण्याची जरूरी नाहीं असेंही इकडे म्हणावयाचें, आणि त्याचवेळीं शाळा व कॉलेजें यांची संख्या झपाट्यानें वाढविण्याची कांहींच खटपट अलीकडे होत नाहीं म्हणून अश्रु गाळावयाचे, यांचा मेळ कसा बसवावयाचा हें मि० विपिनचंद्र पाल किंवा त्यांचे चहाते व भक्त यांनाच माहित!

## प्राचीन शास्त्रें आणि अर्वाचीन व्यवहार.

काशीच्या सेंट्रल हिंदु कॉलेजचे प्रोफेसर व १० न्या० तेलंग यांचे चिरंजीव रा. पंढरीनाथ का. तेलंग यांनीं वरील विषयावर लेख लिहितांना जो स्पष्टवक्तेपणा धारण केला आहे व मनाची समता ठेविली आहे ती त्यांच्या शीलास व विद्वत्तेस शोभणारी आहे. त्यांचे उद्गार सर्वांनीं मनन करण्यासारखे आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं आमच्या राष्ट्रानें गेल्या शेंपन्नास वर्षांत बरीच प्रगती केली आहे. अजून आमचें राष्ट्र प्रौढावस्थेला पोंचलेलें नाहीं ही गोष्ट खरी, पण अगदीं बोळ्यानें दुध पाजण्याचें आमचें शैशवही आतां राहिलें नाहीं. जुन्या काळच्या शास्त्रांत सांगितलें असेल तेवढ्यावरच समाधान मानून बसावयाचें आमचें वय राहिलेलें नाहीं. आमच्या उन्नतीला पोषक असा शास्त्रांचा गर्भित उद्देश आपण घेऊन त्याच्या अनुसंधानानें हल्लींचे व्यवहार केले पाहिजेत. नुसता शद्वार्थ घेऊन चालावयाचें नाहीं. आपण शास्त्रें कधींच धाब्यावर बसविलीं आहेत! इतकेंच नाहीं तर अनार्यांचे व्यवहार उचलले आहेत असें असून तेच आम्ही मोठ्या शिष्टतेनें शास्त्रवचनांकडे बोट दाखवितों आणि सनातन धर्माचें खरें रहस्य प्रत्यक्ष आचरणांत दाखविणाऱ्या सुधारणेची टवाळकी करण्यांत मोठेपणा मानतों याला काय म्हणावें! सनातन धर्माच्या भक्कम पायावर उभे राहून आर्यविद्येचें पुनरुज्जीवन करा, आणि त्या विद्यांचें रहस्य समजून त्याचा उपयोग अर्वाचीन व्यवहारांत व आचारांत करून दाखवा नुसतें शद्बावडंबर घालण्यांत आणि पोकळ शास्त्राभिमान दाखविण्यांत काय अर्थ आहे?

## आफ्रिकेंतले हिंदी रहिवासी.

गतवर्षी बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या राज्यारोहणसमयीं अशी आनंदाची बातमी प्रसिद्ध करण्यांत आली होती कीं ट्रान्सवालांतल्या हिंदी रहिवाशांच्या तक्रारींची दाद लावण्यांत आली आहे आणि समाधानकारक रीतीनें तें प्रकरण निकालास लागल्यासारखें आहे. या बातमीनें सर्वांच्या मनांत नवीन आशांकुर उत्पन्न होऊन अविरोध चळवळ करणारांनीं आपल्या दुःखांचा एकदाचा शेवट झाला असें गोड समाधान क्षणभर मानून घेतलें. पण पुढें लवकरच युनियन पार्लमेंटपुढें इमिग्रेशन बिल आलें, आणि नाताळांतली डोईपट्टी ही कायम आहेच! या बिलांत हिंदी लोकांत असंतोष उत्पन्न करणारीं अनेक कलमें आहेत. या बिलाविरुद्ध हिंदी लोकांचा एक आक्षेप असा आहे कीं या नव्या बिलांत शिक्षणाची जी मर्यादा घातली आहे ती गैर आहे. इतर कित्येक वसाहतींमध्यें जेथें ही घालण्यांत आली आहे तेथें तिचा परिणाम हिंदी लोकांना मज्जाव करणें हाच झालेला आहे व तोच दक्षिण आफ्रिकेंतही होणार आहे. त्याचप्रमाणें इमिग्रेशन आफिसराच्या हातांत अमर्याद सत्ता ठेविली आहे व त्याच्या हुकुमावर अपील नाहीं हा एक सुलतानीचाच प्रकार म्हणावयाचा! सारांश ब्रिटिश आफ्रिकेंतली ही चळवळ शांत होण्याचीं चिन्हें कांहीं दिसत नाहींत उलट ही चळवळ अशीच जोरांत चालू ठेवली तर आजपर्यंत केलेली चळवळ सफळ होणार. हताश होऊन आतां ती सोडून दिली तर उलट दुर्दशा प्राप्त व्हावयाची. पण ही चळवळ आफ्रिकेंतले गरीब हिंदी कशाचे जोरावर चालविणार आहेत? त्यांना हिंदुस्थानांतल्या त्यांच्या इतर बंधूकडूनच साह्य व्हावयास पाहिजे आहे; आणि हें साह्य मिळविण्यासाठीं मि० पॉलॉक हे सध्या हिंदुस्थानांत प्रांतोप्रांतीं हिंडत आहेत. तें अपेक्षित द्रव्यसाह्य यथाशक्ति देणें हें हिंदुस्थानच्या प्रत्येक रहिवाशाचें कर्तव्य आहे.

## एक पाऊल पुढें!

आयर्लंडला स्वराज्य देणारें होमरूल बिलाचें कॉमन्स सभेंत दुसऱ्यांदा वाचन झालें. यावेळीं त्या बिलावर झालेली चर्चा पहिल्या खेपेपेक्षा बरीच सौम्य स्वरूपाची होती. आतां लवकरच तें लॉर्डस सभेकडे जाईल यांत शंका नाहीं. हे लॉर्डस त्या बिलाची कशी काय विल्हेवाट लावतात तें आतां पाहणें आहे. मध्यंतरीं स्कॉटलंडला होमरूल देण्याचें आपलें अभिवचन मि० ॲस्क्विथ हे देऊन चुकले आहेत. स्काटलंडचे लोकही त्यासाठीं हपापलेले आहेतच, पण इंग्लंडमध्यें पार्लमेंटांतले आपले मेंबर कायम ठेवून होमरूल मिळवावयाचें असा त्यांचा विचार आहे. एकदां स्वराज्याचें तत्त्व मान्य झाल्यानंतर परिस्थितीचें मान पाहून तें ब्रिटिश राज्याच्या प्रत्येक अवयवाला लागू करण्याची वेळ क्रमाक्रमानें येत जाणारच. यांत अस्वाभाविक किंवा अयोग्य असें कांहीं नाहीं. स्काटलंडला देऊं, पण आयर्लंडला देणार नाहीं असा हट्ट आतां कोणाचा धरतां यावयाचा नाहीं. पात्रतापात्रतेचा विचार पाहून लवकर म्हणा उशीरा म्हणा तें सर्वांना देण्यांतच ब्रिटिशराष्ट्राला भूषण वाटेल. स्कॉटलंड, आयर्लंड, यांना तें मिळाल्यानंतर पुढची स्वराज्य मागण्याची पाळी कोणाची येते हें आजच सांगतां येणार नाहीं, पण ती कोणाची जरी असली तरी जी ब्रिटिश न्यायप्रियता स्कॉटलंड व आयर्लंड यांचेवर कृपादृष्टि करील ती पुढें निष्ठुर होईल असें म्हणण्यास तूर्त तरी कांहीं कारण नाहीं.

## अमेरिकेंतील रेलवेचा शेतीला उपयोग.

अमेरिकेंतील शेतकीखात्याच्या रिपोर्टांवरून कळतें कीं तिकडे शेतकीच्या उन्नतीसाठीं रेलवे कंपन्यासुद्धां आपापल्या परीनें उत्कृष्ट साह्य करीत आहेत. प्रत्येक कंपनी स्वतःच्या खर्चानें एक इंजिन, एक मालाचा डबा व दोन दुसरे डबे केवळ या कामाकडे देत असते. शेतांत कोठें व कशी सुधारणा करावी हें शेतकऱ्यांना समजावून देण्याकरितां ठेविलेल्या फिरत्या व्याख्यात्यांना प्रत्येक कंपनी या गाडींतून फुकट प्रवास करूं देते. ही गाडी कोणत दिवशीं कोठें थांबेल व तेथें कोणत्या विषयासंबंधानें व्याख्याते माहिती सांगणार आहेत हें तेथील लोकांना जाहिरातींच्या द्वारें अगोदर सूचित करून ठेविलेलें असतें. त्याप्रमाणें तेथील शेतकरी ठरलेल्यावेळीं नियत जागीं जमतात व व्याख्याता तीस चाळीस मिनटांत त्यांना नवीन देण्याजोगी माहिती देतो, आपल्याबरोबर आणलेलीं यंत्रें किंवा पदार्थ दाखवितो, शेतकऱ्यांच्या शंकांचें समाधान करतो आणि पुढें चालता होतो. गेल्या सालीं अशा रीतीनें ९२ गाड्यांतून ४०११० मैल प्रवास व्याख्यात्यांनीं केला. दुसरी गोष्ट—या रेलवे कंपन्या रोजचे ठिकठिकाणचे बाजारभाव ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांना कळविण्याचे कामीं मदत करतात. तिसरी गोष्ट जेथें धान्यवगैरेंचा तोटा पडतो अशा ठिकाणीं शेतकऱ्यानें माल पाठविला, आणि मागाहून त्याला कळलें कीं त्या ठिकाणापेक्षांही तिसऱ्याच एका ठिकाणीं त्या धान्याची विशेष जरूरी आहे तर मालाची चढउतार करण्याचा खर्च शेतकऱ्यावर पडूं नये म्हणून रेलवे कंपन्या तारयंत्राच्या द्वारें त्या स्टेशनला कळवून सदर माल पूर्वीच्या ठिकाणीं न उतरवितां निर्दिष्ट स्थळीं पोंचवितात!' सारांश, शेतकऱ्यांची बेरडी सोय

होईल तेवढी पाहण्यांत व त्यांना मदत करण्यांत रेलवे कंपन्यांना आपण आपलें कर्तव्य करीत आहों असें समाधान वाटतें. तेंच आमचेइकडे पहा. गुजराथेंत भयंकर दुष्काळ पडून वैरणीवांचून गुरें पटापट मरत आहेत. वैरण इतर प्रांतांतून द्यावयासाठीं तयार आहे, पण ती नेण्यास कंपन्यांजवळ पुरेसे डबे नाहींत ह्मणून ओरड चालली आहे! शेतकरी वर्ग गरीब ह्मणून तिच्या वर्गानें प्रवास करतो; पण त्याच्या हालाकडे कंपन्या लक्षही देत नाहींत. मग त्याच्या सोयीसाठीं विशेष सवलती देणें तर दूरच! आणि या कंपन्या नीट चालाव्य, बुडूं नयेत, ह्मणून त्यांना व्याजाची हमी शेतकऱ्यांच्या पैशांतून सरकार देत असतें.

## हिंदी खलाशी

सध्यां जिकडे पाहावें तिकडे काळा-रंग गोऱ्यांना दृष्टिशूळ उत्पन्न करतांना दिसतो. पी. अँड ओ. नांवाची जी बोटींची कंपनी आहे तिनें बरेच हिंदी खलाशांना कामावर लाविलेलें आहे, पण गोऱ्या खलाशांच्यानें हें पाहवत नाहीं व त्या गोऱ्या खलाशांच्या संघांनीं काळ्यांना कामावरून दूर करा असें टुमणें कंपनीमागे आज बरीच वर्षे लावलें आहे. पण कंपनीनें त्यांचें ऐकलें नाहीं. शेवटीं त्यांनीं संप करण्याचा धाक घालून पाहिला, पण त्यालाही कंपनीनें दाद दिली नाहीं. इतकेंच नाहीं तर हिंदी खलाशांचें वर्तन व हुशारी यांबद्दल योग्य सर्टिफिकीट देऊन त्यांना काढण्यास आह्मी तयार नाहीं असें ठासून सांगितलें आहे. कंपनीनें जो हा नेट धरला आहे त्याबद्दल सगळ्या हिंदुस्थानाकडून कंपनीचें अभिनंदन होणें जरूर आहे. कंपनीच्या नोकरींत हे हिंदी खलाशी आज सत्तर वर्षे आहेत. या अवधींत त्यांनीं फार हुशारीनें व इमानानें कामें केलीं आहेत व कित्येक जिवावरल्या प्रसंगीं प्रशंसनीय शौर्य व स्वामिभक्ति त्यांनीं दाखविली आहे. अशांना कारणावांचून कामावरून दूर केल्यास इनामी माणसें मिळणें मुष्कील होईल; सबब ही गोष्ट करतां येत नाहीं असा रोकड जबाब देण्याचें धैर्य पी. अँड. ओ. कंपनीनें केल्याबद्दल ती कंपनी प्रत्येक हिंदी रहिवाशाच्या आदरास पात्र होईल यांत शंका नाहीं.

## स्तुत्य प्रयत्न.

मुंबईच्या 'इंदुप्रकाशा'वरून कळतें कीं सिंधप्रांतांत नवीन पेरलेल्या अमेरिकन कापसाचें सगळें पीक विकत घेण्याकरितां मुंबईचे गिरणीवाले एक संयुक्त भांडवलाची संस्था अथवा सिंडिकेट काढीत आहेत. आतांपर्यंत अशी स्थिति होती कीं सिंधप्रांतांत पिकविलेला लांब धाग्याचा कापूस सबंधचा सबंध विकत घेण्याइतकी मोठ्या भांडवलाची कंपनी इकडे नसल्यामुळें विलायतेंतले कापसाचे कारखानदार विकत घेऊन जात. पण या व्यवस्थेमुळें मुंबईतल्या गिरण्यावाल्यांना चांगला कापूस मिळेनासा झाला. तेव्हां आतां त्यांच्यांत जागृति होऊन एक संयुक्त भांडवलाची कंपनी (सिंडिकेट) स्थापन झाली आहे. हिच्या डायरेक्टरांत ना. भि. फाजलभाई करीमभाई, ना. भि. मनमोहनदास वगैरेसारखीं मोठालीं माणसें असल्यामुळें हिनें मनांत धरलेले उद्देश निर्वेधपणें पार पडतील अशी उमेद आहे. या कंपनीला पाहिलीं तीन वर्षे सरकारकडून ही मदत व्हावयाची आहे. उत्तम अमेरिकन कापसाचें बियाणें आणवून देणें, आणि आपल्या ऑफिसरांच्या देखरेखीखालीं त्याची लागवड करविणें या दोन गोष्टी सरकारनें अंगावर घेतल्या आहेत. सरकारचे याबद्दल आभार मानणें वाजवी आहे.

## महत्त्वाचा तिसरा प्यारिग्राफ.

दिल्ली दरबारच्या वेळीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत घडून येणाऱ्या ज्या सुधारणा सूचित करण्यांत आल्या होत्या व ज्या पुढें गव्हर्नमेंट ऑफ इंडिया बिल या नांवानें पार्लमेंटापुढें मंजुरीकरितां आल्या आहेत, त्यांतलें सगळें मर्म एका प्यारिग्राफांत आहे आणि तो प्यारिग्राफ ह्मणजे बिलाचा तिसरा प्यारिग्राफ होय. हिंदुस्थानच्या लोकांच्या वाढत्या आकांक्षा परिपूर्ण करण्याचें अभिवचन त्यांत असल्यामुळें त्याला महत्त्व आलें आहे. हिंदुस्थानांत अशांततेचें पिशाच्च एकदम गाडून टाकण्याचें अपूर्व सामर्थ्य या प्यारिग्राफाचे अंगीं आहे, आणि ह्मणूनच हिंदुस्थानचें कल्याण चिंतणारांना हा प्यारिग्राफ ह्मणजे राजकीय सनदेइतका मोलवान वाटत आहे. या प्यारिग्राफाच्या अर्थाबद्दल आता कित्येक पत्रें निष्कारण वाद घालीत आहेत, आणि तो लिहितांना घाईमुळें भलताच गैरसमज उत्पन्न होण्यासारखे शब्द त्यांत चुकीनें पडले आहेत, पण हिंदुस्थानच्या लोकांना राजकीय अधिकार देण्याचा उद्देश लिहिणाराचे ठायीं त्यावेळीं नव्हता, असें कांहीं आंग्लोइंडियनपत्रें सांगत आहेत. पण लॉर्ड क्रू किंवा लॉर्ड हार्डिंज हे कच्या कलमाचे नाहींत. तसे कच्च्या अंतःकरणाचेही पण नाहींत हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. जें मनांत होतें तेंच त्यांनीं कागदावर उतरलें व आता शब्दांच्या अर्थाच्या फिरवाफिरवीचा लपंडाव करून दिलेलें अभिवचन मोडण्याची सल्ला बादशहाला देण्याचें पाप त्यांचे हातून कधीं घडणार नाहीं अशी हिंदुस्थानच्या प्रजेची पूर्ण खात्री आहे.

## रंगाचे परिणाम

निरनिराळ्या प्राण्यांच्या मनावर निरनिराळ्या रंगांच्या वस्तूंचे निरनिराळे परिणाम घडतात. माणसांत तर हें परिणाम वैचित्र्य अतिशयच आहे. कोणाला काळा रंग शुभ वाटतो तर कोणाला तोच अत्यंत अशुभ वाटतो. कोणाला गहिरे रंग पसंत असतात, तर कोणाला अगदीं फिके रंग ज्यास्त आवडतात. पण ही रंगाची आवडनिवड इतर प्राण्यांत सुद्धां आहे असें दिसतें. इतर प्राण्यांच्या मानसशास्त्रांत अद्याप कोणी फारसे शोध केले नाहींत. नाहींतर खरोखरच फार महत्त्वाच्या व विचित्र गोष्टी उघडकीला येतील. बैलाला तांबड्या चिंधीची फार चीड असते. पण तोच तांबडा रंग सर्वांना फार प्रिय आहे. हिरवा रंग सर्पाचें मन क्षुब्ध करून सोडणारा आहे. एका सर्पविद्याविशारद पंडितानें अनुभव घेऊन असें प्रसिद्ध केलें आहे कीं फिक्या निळ्या रंगानें त्यांना सुख होतें; पिंवळ्यानें मनाचें समाधान होतें; तपकिरी रंगानें ते चिडतात, काळ्या रंगाविषयीं ते उदासीन असतात, आणि जांभळ्या रंगानें त्यांना आळ्यता प्राप्त होते. 'शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा।' हीच गोष्ट खरी.

## सृष्टि विरुद्ध कृत्रिमता.

शास्त्रज्ञानाची प्रगति काय काय चमत्कार घडवून आणिते तें पाहून मनुष्य आश्चर्यचकित होतें. हिंदुस्थानांत पूर्वी नीळ फार पिकत असे. तिला रसायन कृतिनें निर्माण होणाऱ्या कृत्रिम निळीनें हाणून पाडिलें. कापसापासून कृत्रिम रेशीम होऊं लागलेंच आहे. कृत्रिम ताग करण्याचे प्रयोग नुकतेच झाले, पण त्यांना अद्याप यावें तसें यश आलें नाहीं. कृत्रिम रबर करण्याचे ही प्रयत्न आजपर्यंत थोडे झाले नाहींत. पण सृष्टिनिर्मित रबर जितका स्वस्त मिळूं शकतो तितका कृत्रिम करतां येत नाहीं. अशी आजपर्यंत तक्रार होती. आतां तीही अडचण एका शास्त्रज्ञानें दूर केली आहे. हा कृत्रिम रबर एका शिलिंगाला एक पौंड देण्यास परवडतो. पण याहूनही तो स्वस्त करतां येईल असें त्याचें ह्मणणें आहे. सृष्टिनिर्मित रबराचा भाव हल्लीं पौंडाला पांच शिलिंग आहे! कापराचीही तीच गोष्ट आहे. सृष्टिनिर्मित कापूर स्वस्त देण्याला परवडत नाहीं, पण कृत्रिम कापूर हवा तेवढा स्वस्त मिळतो दगडी कोळशाचें कार्य कृत्रिम उपायांनीं घडवून आणण्याचीही खटपट चालली आहे. या कामासाठीं एक आंग्लो-जर्मन सिंडिकेट स्थापन झाली असून ती कोळशाच्या इतकीच उष्णता देणारा एक पदार्थ नऊ शिलिंगाला एक टन ह्मणजे कोळशाच्या पेक्षांही स्वस्त दरानें देण्यास तयार झाली आहे. अशा रीतीनें सृष्टि देवतेशीं कृत्रिमतेची सारखी स्पर्धा लागून राहिली आहे. शास्त्रज्ञानाची विजयध्वजा आतां कोठपर्यंत फडकत जाईल याचा कांहीं नेम सांगवत नाहीं.

## आमचें आर्यवैद्यक.

आमच्या प्राचीन विद्या व कला यांच्या अंगीं जो उत्कृष्टपणा वसत आहे. तो ओळखून त्यांचें रक्षण व पोषण करण्याचें श्रेय आजपर्यंत आमचें इंग्रज सरकार घेत आलें आहे. त्यांनीं प्राचीन भग्न इमारतींच्या रक्षणासाठीं व दुरुस्तीसाठीं आणि भूमिगत झालेल्या प्राचीन शिलालेखांच्या, ताम्रपटांच्या, नाण्यांच्या वगैरे शोधासाठीं मोठा खर्च करून एक स्वतंत्र खातेंच कायमचें ठेविलें आहे. ह्मणून प्राचीन इतिहास समजण्याचीं हीं साधनें मोडक्या तोडक्या स्थितींत कां होईना, पण अद्याप हयात आहेत. तसेंच संस्कृत भाषेला हिंदुस्थानांतूनच अस्तंगत न होऊं देतां शाळा व कॉलेजें यांतून ती शिकवून तिचा जीर्णोद्धार करण्याचें श्रेयही इंग्रजसरकाराकडेच जातें. अशा तऱ्हेनें विचार केला कीं इंग्रजांचें राज्य आमच्यावर झालें ही मोठी परमेश्वरकृपाच ह्मटली पाहिजे. आणखी एकदोन शतकें जर ही गोष्ट न घडती तर आमच्या वाङ्मयाची, कलांची, व प्राचीन इतिहासाची किती शोचनीय अवस्था झाली असती तें सांगवत नाहीं. परंतु आमच्या आयुर्वेदाचें उर्फ आर्यवैद्यकाचें मात्र दुर्दैव कीं अशा प्रभूच्या राज्यांत बाकीच्या विद्या व कला यांचा जीर्णोद्धार होत असतां त्या वैद्यकी विद्येचें मात्र पाऊल मागें मागें पडावें. वस्तुतः ही विद्या साहित्य किंवा कला यांच्या मानानें हिंदुस्थानच्या लोकांवर अनंत उपकार करणारी असतां या विद्येला सरकारकडून उत्तेजन मिळण्याचें तर दूरच, पण उलट प्रतिबंध मात्र होत असतो. याचें कारण या बाबतींतले सरकारचे मंत्री पाश्चात्य वैद्यकात जितके निष्णात तितकेच आर्यवैद्यकाविषयीं अज्ञानी, किंबहुना मत्सरीही असतात असें तर नसेलना? एरव्हीं आमच्या आर्य वैद्यकाच्या अंगचे गुण सरकारच्या नजरेला कां येऊं नयेत आणि त्यांच्या कडून त्याला उत्तेजन कां मिळूं नयेत तें कळत नाहीं. आमचें वैद्यक आमच्या देशाचें हवामान व प्रकृतिमान यांशीं पूर्णपणें जुळणारे असून शिवाय त्यांतल्या औषधि ह्मणजे बहुधा वनस्पती, व क्षार याच असल्यामुळें व या इकडे जंगलांत व डोंगरांत मुबलक असल्यामुळें त्या स्वस्तही पडतात. ह्मणजे हिंदुस्थानच्या लोकांच्या दारिद्र्याचा विचार केला तर आर्यवैद्यकांतलीं औषधें त्यांना अधिक सोयीचीं आहेत व तीं ताजीं मिळण्याचा संभव असल्यामुळें अधिक गुणकारीही आहेत. इंग्रजी औषधांत क्विनाईन हे तापावरलें औषध बरेंच स्वस्त आहे; तरी त्याचा उपयुक्तपणा लक्षांत घेऊन तें अधिक स्वस्त लोकांना मिळावें यासाठीं सरकार झीज सोसूनही त्याचा प्रसार करण्यास झटत आहे. पण आमच्याकडचें काढें चिराईत व पाश्चात्य क्विनाईन यांची तुलना केली तर क्विनाईनला चिराईताची बरोबरी कधींच करतां यावयाची नाहीं. इंग्रजी डाक्तर ज्या ठिकाणीं ८ आणे खर्च करील त्या ठिकाणीं आमच्या वैद्यकाला एक पैसा सुद्धां खर्च लागावयाचा नाहीं. शिवाय इंग्रजी औषधें सगळीं परदेशांतून येणार; अर्थात् त्यांच्यांत ताजेपणा असणें शक्य नाहीं. आमच्या लोकांचें प्रकृतिमान व येथलें हवामान यांचा विचार केला (व रोगचिकित्सेंत तर या गोष्टींचा विचार करणें अत्यंत अवश्य आहे.) तर या देशांत उत्पन्न होणारीं व या देशच्या वैद्यकीपद्धतीनें सांगितलेलीं औषधेंच लोकांनीं—विशेषतः गरीब लोकांनीं घ्यावयास पाहिजेत, आणि तीं लोकांना जितकीं ज्यास्त उपलब्ध होतील तितकीं करून देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. आतां आमच्या आर्यवैद्यकावर एक मोठा आरोप आहे, आणि तो सर्वांशीं खरा आहे हें कबूल केलें पाहिजे. तो आरोप ह्मणजे हा कीं आर्यवैद्यक आज कित्येक वर्षे मृत झालें आहे. त्याला

त्यांना मिळालेली नाहीं. पण यावर असें ह्मणतां येईल कीं हा दोष कोणाचा? आर्यवैद्यकाचा कीं सरकारचा? आज मोठमोठाले पगार देऊन सरकारनें जसे सर्जन-जनरल सारखे पाश्चात्य डाक्तर आपल्या पदरीं बाळगले आहेत, तसे आमचे जुने वैद्य बाळगले असते व त्यांच्या करवीं आर्यवैद्यकांत शोध करविले असते तर आज या आरोपाला जागा राहिली असती काय? पूर्वीच्या काळीं आमच्या वैद्यकाला इतकें पुढें पाऊल कशाच्या जोरावर टाकतां आलें? राजाश्रयाच्याच ना? तो त्याचा राजाश्रय तुटल्याबरोबर त्याच्या मानेचा कांटा ढिला झाला, व विचारें पंगु होऊन बसलें यांत त्याच्याकडे काय दोष आहे? सरकारनें आमच्या बाकीच्या विद्या व कला यांच्या रक्षणाकडे जसें लक्ष घातलें आहे तसें आर्यवैद्यकाकडे त्यांचे लक्ष जाईल तर हिंदुस्थानच्या कोट्यावधि प्रजेवर सरकारचे अनंत उपकार होतील. आमची खात्री आहे कीं इंग्रजी पद्धतीच्या औषधां ऐवजीं देशी औषधांचा प्रसार करण्याचें सरकारनें मनांत आणिलें तर लोकांत आरोग्याचा फैलाव ज्यास्त व लवकर होऊन शिवाय सरकारच्या तिजोरींत शिलकही पुष्कळ अधिक पडेल. अनेक वर्षें पाश्चात्य औषधें घेऊन घेऊन कंटाळले आहेत अशा कित्येकांनीं मागाहून आयुर्वेदाचीं औषधें घेतलीं असतां त्यांना अप्रतिम गुण आला अशीं हीं अनेक उदाहरणें आहेत. यावरून काय सिद्ध होतें? आमचें आर्यवैद्यक अद्याप सुप्तावस्थेंत आहेत, मृत झालेलें नाहीं, व सरकारनें मनावर घेतल्यास त्याचा जीर्णोद्धार करतां येईल. पण अशी बुद्धि सरकारला होईल तो सुदिन ह्मटला पाहिजे.

## पुनर्जन्म व त्याची अवश्यकता.

गेल्या फेब्रुवारीच्या थिऑसोफिस्ट मासिकपुस्तकांत या विषयावर मिसेस आनीबिझांट यांचा उत्कृष्ट लेख आला आहे. त्या ह्मणतातः—

मनुष्यांची योग्यता, त्यांना मिळणारी संधी व अवस्था यांच्यामध्यें जी भिन्नता दिसते तिचें समाधान फक्त तीनच कारणांनीं करतां येतें. १ विशेष सृष्टिवाद—ह्मणजे मनुष्यप्राणी हा असहाय जीव असून त्याच्या इच्छा सगळ्या दुसऱ्याच्या आधीन आहेत हें मत; किंवा २ मनुष्य हा भूतकाळापासून चालत आलेल्या परंपरेचें फळमात्र आहे हा आनुवंशिकतावाद; किंवा ३ पुनर्जन्मवाद. यांत मनुष्य स्वतःच्या दैवाचा कारागीर होऊं शकतो. यांपैकीं पहिल्या मताचें समर्थन करणारे थोडेच निघतात. या मताप्रमाणें जीवनही एक प्रकारची लॉटरी आहे, माणसाच्या नशिबाप्रमाणें त्याच्या हातीं जें तिकीट लागेल, त्याप्रमाणें त्याची बरी वाईट अवस्था होईल, यांत माणसाच्या प्रयत्नाला जागाच नाहीं. एक बालक उपजतांच मरतें, आणि दुसरें नव्वद वर्षें जगून संसारांतलीं सुखदुःखें अनुभवून इहलोकची यात्रा संपवितें. पहिल्याला सुखदुःखें कांहींच नाहीं, तर दुसऱ्याला तरी तीं कां भोगावीं लागावीं? या मताच्या योगानें मनुष्य आपल्या अवस्थेबद्दल सर्वस्वी ईश्वराला जबाबदार धरतो व तो अन्यायी आहे अशी त्याची भावना होऊन बसते. शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणें बुद्धिमान् पुरुषांचे ठायीं संतति निर्माण करण्याची शक्ति कमी होत चालली आहे. ह्मणून आनुवंशिक मताला अनुकूळ असा मानवी उन्नतीबद्दलचा सिद्धांत काढता येत नाहीं. बापाची बुद्धि मुलांत उतरत नाहीं या ठिकाणीं शास्त्रज्ञांची मति कुंठित होते. हीच गोष्ट नीतीलाही लागू आहे साधूचा पुत्र दुर्वर्तनी आणि याच्या उलट अशी दोन्ही तऱ्हेची स्थिति दृष्टीस पडते. ईश्वराचा न्यायीपणा आणि मनुष्याची शक्तिमत्ता स्थापित करणारा मार्ग ह्मणजे पुनर्जन्मवाद हाच आहे. प्रत्येक मनुष्य प्रथम मनुष्याच्या जीवनांत अंकुररूपानें असतो या अवस्थेंत विद्या, विवेक, वगैरे कांहीं एक नसतात. सुखद किंवा दुःखद अनुभवांच्या द्वारें तो मानसिक किंवा आचारसंबंधीं निपुणतेची सामग्री गोळा करीत असतो. या सामग्रीचाच पुढें स्वभाव बनतो, व त्या स्वभावाप्रमाणें त्याला जन्म प्राप्त होतो. याप्रमाणें उत्तम वृत्ति, अंतःकरण, व उग्र स्वभाव हीं अनेक घोर तम संग्रामांत विजय प्राप्त केल्यानंतर मिळणारीं दृढ परिश्रमाचीं फळें आहेत. आज जो रानटी मनुष्य आहे. तो उन्नतीच्या सोपानानें जातां जातां कालांतरानें साधुपुरुष बनेल. जसें बीज पेरावें तसें फळ मिळेल. धर्माचरण, सत्याचरण यांचीं फळें सुखदाई होतात. उलट अधर्म किंवा असत्य यांच्या आचरणाचीं फळें दुःखपर्यवसायी असतात. जन्मल्यानंतर थोड्याच काळानें देहत्याग करणारा जीव अशा रीतीनें मागच्या जन्माचें ऋण फेडीत फेडीत जातो व अगदीं थोड्या काळानं तर मुक्ति पावून आपल्या उन्नतीला अनुकूल अशा अनुभवांना एकत्रित करण्यासाठीं फिरून लवकरच पुनः जन्म घेतो. त्याला या संसारात पुष्कळ वेळां निराश होण्याचे व ठोकरा खाण्याचे प्रसंग येतात, नाहींत असें नाहीं. कधीं कधीं तर त्याच्या प्राणावरही प्रसंग बेततात; तथापि त्यामुळें तो डगमगत नाहीं. उलट त्याच्या योगानें त्याच्या मनाला दृढता येते, व पुढच्या जन्मीं आपल्या जातीची सेवा करण्याला लागणारे अवश्य गुण त्याला प्राप्त होत जातात. उद्योगाच्या द्वारें मिळविलेले हे गुण त्याला सोडून जात नाहींत. शरीर सुटलें तरी हे गुण त्याचे सोबती असतात. बापाच्या दुर्वर्तनामुळें ज्याच्या शरीरांत विषारी रक्त खेळत आहे असा मनुष्य या दुःखमय जीवनाच्या शिक्षणाच्या द्वारें आपल्या भावी उन्नतीची तयारी करून ठेवूं शकता. अशा रीतीनें सगळ्या अवस्थेंत मनुष्याला भूतावस्थेवरून सध्याच्या ह्मणजे वर्तमान अवस्थेचा पत्ता लागतो व उन्नतीच्या नियमानुसार तो वागला तर भविष्य काळीं आपलें अदृष्ट आपल्या इच्छेनुसार त्याला ठेवतां येतें.

## असला पक्षपात का?

शहरांत राहून कंटाळलेल्या माणसांना सुट्टीच्या दिवसांत बाहेर सहल करण्यास जातां यावें ह्मणून रेलवे कंपन्या पाहिल्या व दुसऱ्या वर्गाचीं जाण्या येण्याचीं 'रिटर्न' टिकिटें अर्ध्या दरानें देत असतात, पण ही सवलत बिचाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना मात्र मिळत नाहीं. वस्तुतः गरीबीमुळें गलिच्छ वस्तींत व कोंडलेल्या हवेंत राहावें लागत असलेल्या या लोकांनाच निदान सुट्टीच्या दिवसांत तरी मोकळ्या स्वच्छ हवेंत हिंडण्या फिरण्याची अवश्यकता ज्यास्त आहे. पण रेलवे कंपन्या त्यांच्या संबंधानें इतक्या निष्ठुर आहेत कीं त्या त्यांना दूषित हवेंतच काळ कंठवयाला लावतात. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा वाली कोणी नाहीं प्रत्यक्ष रेलवे बोर्ड सुद्धां त्यांची दाद घेत नाहीं असें दिसतें. हल्लीं आरोग्य सुधारणेकडे सरकारचें लक्ष विशेष आहे तेव्हां आरोग्य-प्रसारासाठीं तरी ते या गरीब लोकांची दाद लावतील अशी अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं. श्रीमंत लोकांप्रमाणेंच गरिबांनाही विश्रांतीची, मोकळ्या हवेची, आणि स्वतःच्या जिवाची काळजी घेण्याची अवश्यकता आहे ही गोष्ट रेलवे कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचे मनावर बिंबविण्याचें श्रेय कोणी घेईल काय?

## हिंदु युनिव्हर्सिटी व पाश्चात्य पंडित

ना० पंडित मदनमोहन मालवीय यांच्या हिंदु युनिव्हर्सिटीच्या योजनेला या देशांतले व दुसरे कित्येक आंग्लोइंडियन विरुद्ध आहेत. अशावेळीं पूर्वग्रहांनें दूषित न झालेल्या अशा पाश्चात्य पंडितांचें मत या योजनेविषयीं काय आहे तें जाणण्याची पुष्कळांना उत्कंठा असणें स्वाभाविक आहे. केंब्रिज युनिव्हर्सिटीचे संस्कृतचे प्रोफेसर मि० रॅपसन यांनीं आपलें मत स्पष्टपणें असें कळविलें आहे कीं या योजनेपासून देशाला हवीं तशीं उत्कृष्ट शीलाचीं माणसें तयार होतील व तीं देशाच्या उन्नतीला हातभार लावतील यांत मला बिलकुल शंका नाहीं. युनिव्हर्सिटीसारख्या विषयाच्या बाबतींत कलेक्टर, कमिशनर, फार काय पण गव्हर्नराचे मतापेक्षां सुद्धां प्रत्यक्ष युनिव्हर्सिटीच्या विद्वान प्रोफेसराचें मत अधिक ग्राह्य धरलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे हिंदु युनिव्हर्सिटी स्थापन करण्याच्या यत्नाला मूर्त स्वरूप देऊं पाहणाऱ्या ना. मालवीय यांचेसारख्यास प्रत्येकानें यथाशक्ति साह्य देण्याची किती अवश्यकता आहे तें दिसून येतें.

## एक महत्वाच्या प्रश्नाची दुसरी बाजू

आफ्रिका अमेरिका वगैरे देशांतून हिंदी मजुराविषयीं होत असलेले कडक निर्बंध हा विषय अलीकडे वर्तमानपत्रांतून वरचेवर चमकतो. पण या विषयाची दुसरी बाजू आजपर्यंत कोणाही हिंदी गृहस्थानें स्पष्टपणें मांडलेली आमच्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत नव्हती. हें काम अमेरिकेतल्या बर्कले युनिव्हर्सिटींत असलेले मि० धनगोपाळ मुकर्जी यांनीं केलें आहे. ते ह्मणतात, "हिंदी मजूर इकडे यावे कीं नाहींत या प्रश्नाला मी साफ 'नाहीं' असें उत्तर देईन. इकडे आलेल्या हिंदी मजुरांनीं हिंदुस्थानचें नांव इकडे बद केलें आहे. या लोकांना शिक्षण, स्वाभिमान, किंवा देशकालवर्तमान पाहून वागण्याचें तारतम्य मुळींच नसतें. ते मजुरीचे दर उतरवितात व त्यामुळें अमेरिकन मजुरांचें मन स्वतःविषयीं कलुषित करून ठेवतात ही पहिली गोष्ट. त्यांची राहणी गलिच्छ असते. ते अमेरिकन लोकांपासून अलग राहतात, आणि इकडच्या लोकांना हास्यास्पद उपन्न करण्यासारखा पोषाख करतात. ते जर येथल्या स्थितीला अनुरूप वर्तन ठेवतील तर इकडच्या लोकांना नकोसे होणार नाहींत.'

## बंगालच्या समित्या.

गेल्या पांचचार वर्षांत बंगालमध्यें जी धामधूम झाली तिच्यासंबंधांत त्या प्रांतांतल्या पुष्कळ समित्यांचीं नांवें कोर्टापुढें आलीं आहेत या समित्या ह्मणजे तरुण विद्यार्थ्यांचे क्लब किंवा संघ होत. या समित्यांची पूर्वपरंपरा थोडीशी गमतीची असल्यामुळें ती येथें देतों. सर हेनरी कॉटन यांनीं आपल्या आठवणींच्या पुस्तकांत ही परंपरा अशी दिली आहे. ते ह्मणतात कीं बंगालचे माजी लेफ्टेनंट गव्हर्नर सर चार्लस इलियट हे संस्थाचे मूळ उत्पादक जरी नसले तरी त्यांना उत्तेजन देणारे होते. तरुण हिंदी लोकांच्या हिताच्या प्रश्नांत ते नेहमीं मन घालीत असत बोर्डिंगें व हॉस्टेलें स्थापन करण्याची कल्पना मूळ त्यांचीं. युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट नांवाच्या संस्थेला ते स्वतःच्या पदरच्या पैशांतून मदत करीत असत. विद्यार्थ्यांना बगीच्यांतून किंवा नदीचे कांठीं सहलीला बोलावित. इंग्रज लोकांच्या खेळांची आवड देशी तरुणांना लावण्यासाठीं ते फार झटत असत. बंगाली लोकांचीं शरीरें सुदृढ व्हावीं अशी त्यांची फार इच्छा असे, आणि त्याच उद्देशानें या समित्या जागोजाग त्यांनीं स्थापन करविल्या. अशा रीतीनें व्यायामशाला ह्मणून स्थापन झालेल्या या संस्थांना पुढें पंचवीस वर्षांच्या आंतच सरकारी अधिकाऱ्यांनीं राजद्रोही संस्था ठरवून कोर्टापुढें खेंचावें हा दैवाचा दुर्विलास ह्मटला पाहिजे. एका लेफ्टेनंट गव्हर्नरानें उत्तेजन देऊन स्थापिलेल्या संस्था दुसऱ्या लेफ्टेनंट गव्हर्नराच्या कारकीर्दींत समूळ नाहींशा व्हाव्या, असें उदाहरण क्वचित् घडतें.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— या सप्तकांत उन्हाळा प्रखरतम झाला असून पारा ११७ अंशावर चढला होता आणि गेल्या मंगळवारीं व बुधवारीं उन्हाचे वारे शरीरें व वनस्पती यांस करपून टाकणारे असे होते. वारा फार सोसाट्याचा वाहत असतो. आणि कदाचित् पर्जन्याला समीप आणील.

पटकी— कडक उन्हाळा व पाण्याचें दुर्भिक्ष्य यामुळें पटकीचा उपद्रव गेल्या ५ वे तारखेपासून सुरू आहे. गेल्या १२ तारखेला या रोगाच्या आजारानें १४ मृत्यु झाले. कधीं ११,८,७,३,४ असे मृत्यु दररोज होत असतात. गेल्या १५ दिवसांत पटकीनें आजारी १६२ झाले पण फक्त ६९ जण मरण पावले.

आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं आमच्या शहरचे सिटी इन्स्पेक्टर ग. रा. खारी साहेब यांस गेल्या बुधवारीं देवाज्ञा झाली. कचेरींत कामकाज करीत असतांना ते एकाएकीं मरण पावले. यांस उन्हामुळें लूचा विकार जडून हागओकीनें अखेर देहान्त झाला. हे गृहस्थ प्रामाणिक व कामाला निस्पृह असून सर्व लोक यास फार फार चहात असत. ऐन वढतीच्या व उमेदिच्या वयांत मृत्यूनें अशा सद्गृहस्थांस गाठलें ही गोष्ट त्यांच्या आप्त मित्रांस मोठीच हळहळ लावील! ईश्वरी इच्छा बलवत्तर!

## नोटीस

मे० सेख हमजा मास्तर राहणार नांदुरा ता० मलकापूर नि० बुलडाणा यांस—

नोटीस देणार बलदारखा वल्द आजमखा राहणार नांदुरा ता० मलकापूर नोटीस देतो ऐसाजे कीं तुह्मी आमचे मालकीची जमीन नांदुराखुर्द येथील शेत सर्वे नंबर ९१ व शेत सर्वे नंबर ४७ यांतील चार आण्याचा हिस्सा व मौजे आंबोडे येथील शेत सर्वे नंबर ३० यांतील चार आण्याचा हिस्सा व मौजे अहमदपूर येथील शेत सर्वे नंबर २९ यांतील चार आण्याचा हिस्सा वरील शेतांत व इतर इस्टेटींत माझा चवथा हिस्सा खरेदी देण्याकारितां तुह्मी माझे मागें लागले आहांत व तुह्मी ह्मणता कीं माझे जवळ तुझी पावती आहे. तरी ती पावती खोटी आहे. मी तुह्मांस खरेदी विषयीं मुळीच पावती लिहून दिली नाहीं. तर आतां तुह्मांस या नोटीशीनें कळवितो कीं वरील शेतांतील व इतर जीनगीतील माझा चवथा हिस्सा मी बिलनखा वल्द आजमखा मुसलमान याजजवळून रोख नगदी ६०० रुपये घेऊन त्याचे मोबदल्यांत ता० २६।३।१२ इ० रोजीं खरेदी लिहून देऊन नोंदून दिले आहे. त्या जिनगीवर माझा मुळींच हक्क नाहीं. तर आतां तुह्मी बनावट पावतीवरून माझ्यावर दावा वगैरे आणल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर असून आमचाही खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० १२।५।१९ इ०

सही

बिल्दारखा वल्द आजमखा मु॥ राहणार नांदुरा नि० आंगठा.

नो. नं. २९२

## नोटीस

नोटीस बेशमी चंद्रभान वा। हरी माळी निमकर्डे व नथु वा। गोविंदा माळी ह्मसाये राहणार पळसी तामगांव तालुके जळगांव आणि मोतीराम वा। सदु माळी काळवांडे राहणार दहिगांव ता० आकोट यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस [illegible]ते कीं तुह्मी ता० ४ माहे मे [illegible]२ इ रोजीं गांवाला जाण्याचे [illegible]मगांव ता० जळगांस मुक्कामीं [illegible]पासून खरिदीखत दगलबाजीनें [illegible] व त्यांतील भरणावगैरेही [illegible] नाहीं. करितां तें खरिदीखत रद्द असून सर्व प्रकारें मालकी माझी आहे. तुह्मी मालकी दाखविल्यास मी दावावगैरे केल्यास त्याचा व या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० १३ माहे मे सन १९१२ इ.

सही

भागी मर्द गनाजी ह्मसाये राहणार पळसीतामगांव मुं० हिवरखेड नि० खु० बांगडी

द० किसन वा। श्रावण माळी रा० हिवरखेड

नो० नं० २९३

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेट सावकार यांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं मी माझे दुकानचे काम पाहण्यास सेवराम महेसदास मारवाडी दुसरा रामजी वा। लक्ष्मण पाटील यांस मुखत्यारपत्र देऊन मुखत्यार नेमिलें होतें परंतु सदर्हू दोघे मनुष्य दुकानचे काम बरोबर पाहात नसून दुकानांत घोंटाळा करण्याचा त्यांचा विचार आहे. यावरून आजतारखेपासून त्यांचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तरी वरील दुकानासंबंधीं सेवराम महेसदास मारवाडी व रामजी लक्ष्मण पाटील यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कळावें ता० ९-५-१२

सही

चंपा मर्द सुकदेव मारवाडी रा० माटरगांव तर्फे हेमराज कोजुराम द० खु०

नो० नं० २९४

## नोटीस

बेशमी रा. रा. सेवराम महेसदास मारवाडी व रामजी लक्ष्मण पाटील उभयतां राहणार माटरगांव ता० खामगांव यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माला कोर्टाचे व घरीं दुकानचें काम पहाण्यास मुखत्यारपत्र देऊन मुखत्यार नेमिलें होतें परंतु तुह्मी काम बरोबर करीत नसल्यानें तुमच्या दोघाचे मुखत्यारपत्र काढून तुह्माला ह्मणजे सेवराम मारवाडी याजला एकट्याला मुखत्यारपत्र दिलें परंतु आतां तुह्मीही बरोबर व्यवस्था पहात नाहीं त्यामुळें आपण मला बुडविण्याच्या विचारांत आहां. यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मागें तुह्माला व रामजीला जें मुखत्यारपत्र दिलें होतें तें व तुह्माला एकट्याला मुखत्यारपत्र दिलें तेही आज तारखेपासून रद्द समजावें. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत आमचें दुकानचें कागदपत्र व आपण वसूल केलेली रक्कम वह्यावगैरे मजला समजून देऊन आमच्या ताब्यांत द्यावे व पावती घ्यावी असे न केल्यास आपलेवर योग्य कोर्टांत दावा करून नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जाईल. ही नोटीस ता. ९-५-१२ इ.

सही [मारवाडी]

चंपा मर्द सुकदेव मारवाडी रा० माटरगांव ता० खामगांव तर्फे हेमराज कोजुराम द० खु०

नो० नं० २९५

## जाहिर नोटीस

लक्ष्मण जैराम देशपांडे व नामदेव एकोबा पाटील राहणार वरवटबकाल ता० जळगांव व गांवगांवचे सर्व साहुकार व लोक यांना—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं मौजे वरवट ता० जळगांव नि० बुलडाणे येथील शेत सर्वे नंबर ११५ एकरगुंठे ८८३८ आकार २४ यातील निम्मे व स० नं० १४२ एकर ७०२ आकार १९ सालीम नं० १४८ एकर ५-१५ आकार ११ नं० २३२ एकर ८ आकार ८ अशी जमीन वडिलार्जित असून वडलाचे मरणानंतर सदरील शेतांत निम्मे आमचा आणि निम्मे बंधु लक्ष्मण जैराम याचा याप्रमाणें हिस्सा असतां आमचे संमतीवाचून व लक्ष्मण जैराम यानें आपले स्वतः करितां सालीम शेते नामदेव एकोबा याजपाशीं गहाण ठेवल्याचे ऐकत असून यापुढें खरेदी वगैरेही देण्याचा विचार दिसत आहे. यासाठीं उभयतां देणार घेणार आणि सर्व लोकांना कळविले जाते कीं वर दाखविलेल्या निम्मे शेतांवर लक्ष्मण जैराम याची मालकी नसून ती त्यास गहाण किंवा अन्य रीतीनें देता येत नाहींत सबब त्यानीं नामदेव याजपाशीं सालीम शेते गहाण ठेविले असल्यास ते निम्म पुरते रद्द असून यापुढें कोणी कोणत्याही रीतीनें वरील माझे निम्मे हिश्शाची शेते घेऊं नये. यासाठीं लक्ष्मण जैराम व नामदेव एकोबा यांना या द्वारें कळवून सर्वांस प्रसिद्ध केले जात आहे. या विरुद्ध झाल्यास निम्मे शेते याजवर कोणतेही प्रकारची जबाबदारी राहणार नाहीं. कळावें ता० १०-५ १९१२ इ.

सही

भगवंत जैराम पटवारी मौजे वरवट बकाल द० खु०

नो० नं० २९६

## जाहिर नोटीस

आकोला येथील सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येतें कीं अकोला फायन्यान्स सब कमेटीनें ता० २७ ४-१२ इ. रोजीं ठराव नंबर ३ मध्यें घरपट्टीचा व डिव्हिजन (ड) व [ई] खेराज करून बाकीच्या सर्व डिव्हिजनमधील भंगीपट्टीचा ठराव कायम केला आहे. सदर्हु घर व भंगीपट्टीच्या ठरावांच्या याद्या कर देणारे लोकांच्या पाहण्याकारितां म्यु० कमेटिच्या ऑफिसांत तयार ठेवल्या आहेत. तरी सदर्हु करांचे आकारणीसंबंधी ज्या कोणास कांहीं सूचना अगर तकरार करावयाची असेल ती त्यांनीं ही नोटीस प्रसिद्ध केल्याचे तारखेपासून १० दिवसाचे आंत खालीं सही करणाराकडेस लेखी करावी. कळावें ता० ७ ५ १९१२

आकोला ता. ७ ५-१२ } (Sd) R. V. Mahajani व्हा० चेअरमन म्यु० कमेटी आकोला.

नो० नं० २९७

## नोटीस

डि० सबजज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १२ सन १९१२ सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—

अर्जदार

भुलाई मर्द नेवजी माळी राहणार मोरगांव भाकऱ्याचे ता० आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचें कोर्टांत दिला असून त्याची चौकशीचि तारीख ८।७।१९१२ इ० रोजीं आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० १४-५-१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज आकोला.

नो० नं० २९८

## नोटीस

सर्वत्र लोक राहणार मौजे गायगांव बुजरूक तालुके खामगांव आणि खामगांव तालुक्यातील सर्व शेट सावकार व पाटील कुळकर्णी वगैरे सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मौजे गायगांव बुजरूक येथील खुद्द आमचे मालकीचें शेत सर्वे नंबर ८ ११ एकर ३ गुंठें आकार १९ रुपये १ आणा पै ६ या शेतातील निम्मे हिस्सा पुर्वेकडील रोडी वल्द नारायण कुकडे यांस आमचे बापानीं तो हयात आहे तो पावतों त्याचे स्वतःचे उदरनिर्वाहा करितां दिला होता सदरहू हिस्सा आमचे बापानीं पूर्वी कोणतेही प्रकारें त्यास खरेदी अगर बक्षिस करून दिला नव्हता व रोडी वल्द नारायण हा मयत होऊन वर्ष १॥ वर्ष झाले. व हल्लीं त्याची बायको नांमे तानकी हा सदरहु हिस्सा विकून टाकून दुसरा घाटाव करण्याचे समजल्यावरून या नोटीशीनें जाहिर करण्यांत येत आहे कीं या पुढें सदरहु हिस्सा तिला कोणत्याही प्रकारें व कोणासही गाहाण, खरेदी अगर बक्षिस अथवा भाड्यानीं देतां येत नाहीं. करितां सदरहू हिस्सा कोणी तीचे लबाडीचे सांगण्यावरून घेऊन व्यर्थ फसूं नये. ह्मणून नोटीशीनें जाहिर केलें आहे इतक्यावर सदरहू हिस्सा कोणी खरेदी, गहाण, बक्षिस अथवा भाड्याना घेतल्यास ज्याचा तो जबाबदार होईल. व झालेला सर्व लेख खोटा व बनावट ठरला जाईल कळावें. तारीख १८ माहे मे सनं १९१२ इसवी. दस्तुर गणपत तुकाराम टोंगळे राहणार शेगांव दस्तुर खुद्द.

सही

नथ वल्लद विठोबा पाटील द० खु०

नो. नं. २९९

# इराणी बल

(जोर) मोटारगाडी अटकवितां येते साखळदंड तोडितां येतो

**इनाम रुपये ५०० ! इनाम रुपये ५०० !**

प्राचीन इराणच्या रुस्तम व अस्पाद यार वगैरे बहादुर पहिलवानांची शक्ती ज्या योगानें जगविख्यात झाली ती औषधें आह्मी हजारों मैलावरून आणलेली आहेत. गंधक सोडा दोन वस्तूंचे कुशलतेनें समिश्रण केलें ह्मणजे ज्याप्रमाणें फुलपावर दारू (Gun Powder) बनते त्याप्रमाणें सालममिश्री, द्राक्षे, बदाम, पिस्ते, डाळिंब, सफरचंद वगैरे अत्यंत शक्ती-वर्धक पदार्थांचें सत्व आह्मी शास्त्रीयरीत्या यंत्रानें बनविलेलें आहे. या पांच सात मेव्या-च्या कुशल सामिश्रणानें विद्युतशक्ती व जोर इतका उत्पन्न होतो कीं कसाही कमताकद मनुष्य असला तरी त्यांस तीन दिवसांत शक्ती येऊं लागते दहा बारा दिवस हे खाल्यावर चेहऱ्यावर लाली चढूं लागते व गेलेली ताकद पुन्हां येते. याच्या योगानें धातुपुष्टीही होते. वृद्ध तरुण, स्त्री पुरुष या सर्वांस ही फायदा देणारी व मजेदार वस्तू आहे. दोन महिने आमच्या सांगण्याप्रमाणें जर याचे सेवन झालें तर मनुष्य मोटारगाडी अडवूं शकेल व साखळदंड तोडूं शकेल खात्री पटविण्याकरितां हा जगविख्यात फळांचा मेवा आह्मां समक्ष तीन दिवस फुकट खावयास देऊं या आमच्या मेव्यांत तांबे, पारा रुप्याचा भाग वगैरे रासायनिक द्रव्यें आहेत असें जो कोणी सिद्ध करील त्यास ९०० रुपये बक्षीस देऊं किंमत एक तोळ्याची २॥ रुपये हें पंधरा दिवस पुरतें.

**बादशाही गोळी:—**

१ गोळी खाल्यानें टिकाव व ताकद माहीती पडते:— किंमत १॥ रु. एक डझनची

**इराणी मर्दानी पट्टी.**

या एकच्या पट्टीच्या योगानें मुंबईत हजारों माणसांचा फायदा झाला आहे. ज्या माण-साच्या शरीरांत ताकद नाहीं. त्या माणसानें ही पट्टी सहा सात दिवस बांधली ह्मणजे खास जवान मनुष्याप्रमाणें ताकद येते. यापासून आग होत नाहीं किंवा फोड येत नाहीं जर कोणास या औषधाबद्दल भरवंसा नसेल तर आह्मी कान्ट्रक्ट करून हें औषध पैसा घेतल्याशिवाय त्यास देऊं गुण आल्यावर पट्टीची किंमत व बक्षिस निराळें घेऊं किं. १० पट्टीची रु. ९ व पांच पट्टीची किं० रु. ३

**खानदानी हकीम-सय्यद जाफर हुसेन तबरेजी ( इराण )**

जाफरी दवाखाना जे. जे. इस्पितलचे समोर जितेकराच्या नव्या बिल्डिंगच्या शेजारी पहिला माळा, मुंबई जाफरी दवाखान्यांत. नो० नं० १९७



**विहार आनन्दका सागर रंगीन तसबीरें सहित चारों भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतु[illegible] मय सहवास स्थान क्रिया, शैय्यातिथ, कामस्थान लालासगारें, वर्तासोआभूषण, वस्त्रतआदवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुके भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशी-करण मुर्दा विद्या अदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

**पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडो अलीगड.**

नो० नं० १९



## जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

**पत्ता एम्. एम्. आणि सन्स पुलाजवळ आकोला**


## नोटीस

बेशमी सोनाजी वा[illegible] सुतार रा० पिंपळखुट ता० बाळापूर जि० आकोला यांस—

खालीं सही करणार किसन वा पुर्णाजी रा० गोपाळखेड हल्लीं मु० आकोला याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी पुतणी नामें तानी मई सोनाजी इच्याशीं तुमचे लग्न लागून आज सरासरी १२ वर्षे झाली. ती शहाणी होऊन आज ८ वर्षे झाली. तेव्हांपासून आमचे घरीं तुह्मी आणून घातले. व आह्मी तुह्माला २-३ वेळ झटके कीं घेऊन जावें. व आमचा मनुष्य तुमचे घरीं आला होता. तरी तुह्मी नेले नाहीं तिला पोसण्याकरितां आह्मी दरमहा ४ रुपयेप्रमाणें सावकाराचे आज मित्तीस ४०० रुपये मजला कर्ज झाले आहे. तरी ही नोटीस पावतांच १५ दिवसांचे आंत पैसे देऊन तिला घेऊन जावें. अगर तसे न केल्यास मी तिजला दुसरा गंधर्वाचा नवरा करून देईन आणि माझ्याकडून तिला पोसवत नाहीं ८ दिवसांत तुमचेकडून पैसे न मिळाल्यास तिजवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें तारिख १०-५-१२

सही

किसन वा पुर्णाजी सुतार द० [illegible]

नो० नं० २९१


# आमच्या औतां पासून

दुप्पट फायदा करून घ्या

[१] किर्लोस्करांच्या सुधारलेल्या लोखंडी नांगरानें लांकडी नांगरापेक्षां तितक्याच वेळांत दुप्पट काम होतें

(२) किर्लोस्करांच्या पेटेंट कडबा कापण्याचें यंत्रानें निमी वैरण वांचते

(३) किर्लोस्कराच्या मोटेच्या लोखंडी चाकानें तितक्याच वेळांत दोन बैल चार बैलांचें काम करितात.

लोखंडी नांगर नंबर ९ किंमत रु. १९

लोखंडी नांगर नंबर १० किंमत रु. ३७

लोखंडी नांगर नंबर १२ किं. रु. १०५

पेटेंट कडबा कापण्याचें यंत्र किं. रु १०५

मोटेचें लोखंडी चाक किंमत रु. ८८

विशेष माहितीसाठीं आमचा नवा क्याटलाग नंबर "व" मागवा.

**किर्लोस्करबंधु.**

पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० २४८



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटींच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला. नो. नं. १३ 'प्रांतवऱ्हाड'



# Oriental Govrnment security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under th policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life baig so uncertain, the sooner man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where one delay of a month or less, has left the family without its intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवशास्त्री यांनी छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस

मे॰ सेख हमजा मास्तर राहणार नांदुरा ता॰ मलकापूर जि॰ बुलडाणा यांस—

नोटीस देणार बलदारखा वल्द आजमखा राहणार नांदुरा ता॰ मलकापूर नोटीस देतो ऐसाजे कीं तुह्मी आमचे मालकीची जमीन नांदुराखुर्द येथील शेत सर्वे नंबर ९१ व शेत सर्वे नंबर ४७ यांतील चार आण्याचा हिस्सा व मौजे आंबोडे येथील शेत सर्वे नंबर ३० यांतील चार आण्याचा हिस्सा व मौजे अहमदपूर येथील शेत सर्वे नंबर २९ यांतील चार आण्याचा हिस्सा वरील शेतांत व इतर इस्टेटींत माझा चवथा हिस्सा खरेदी देण्याकारितां तुह्मी माझे मागें लागले आहांत व तुह्मी ह्मणता कीं माझे जवळ तुझी पावती आहे. तरी ती पावती खोटी आहे. मी तुह्मांस खरेदी विषयीं मुळींच पावती लिहून दिली नाहीं. तर आतां तुह्मांस या नोटीशीनें कळवितो कीं वरील शेतांतील व इतर जीनगीतील माझा चवथा हिस्सा मी बिलनखा वल्द आजमखा मुसलमान याजजवळून रोख नगदी ६०० रुपये घेऊन त्याचे मोबदल्यांत ता॰ २६।३।१२ इ॰ रोजीं खरेदी लिहून देऊन नोंदून दिले आहे. त्या जिनगीवर माझा मुळींच हक्क नाहीं. तर आतां तुह्मी बनावट पावतीवरून माझ्यावर दावा वगैरे आणल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर असून आमचाही खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता॰ १२।३।१९ इ॰

सही

बिल्दारखा वल्द आजमखा मु॥ राहणार नांदूरा नि॰ आंगठा.

नो. नं. २९२

## नोटीस

नोटीस बेशमी चंद्रभान वा॥ हरी माळी निमकर्डे व नथु वा॥ गोविंदा माळी ह्मसाये राहणार पळसी तामगांव तालुके जळगांव आणि मोतीराम वा॥ सदु माळी काळबांडे राहणार दहिगांव ता॰ आकोट यांस-

खालीं सही करणार इजकडून नोटीस [illegible] कीं तुह्मी ता॰ ४ माहे मे [illegible] २ इ रोजीं गांवाला जाण्याचे [illegible] तामगांव ता॰ जळगांस मुक्कामीं [illegible] पासून खरेदीखत दगलबाजीनें [illegible] व त्यांतील भरणावगैरेही [illegible] नाहीं. करितां तें खरेदीखत रद्द असून सर्व प्रकारें मालकी माझी आहे. तुह्मी मालकी दाखविल्यास मी दावावगैरे केल्यास त्याचा व या नोटीशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता॰ १३ माहे मे सन १९१२ इ.

सही

भागी मर्द गनाजी ह्मसाये राहणार पळसीतामगांव मुं॰ हिवरखेड नि॰ खु॰ बांगडी

द॰ किसन वा॥ श्रावण माळी रा॰ हिवरखेड

नो॰ नं॰ २९३

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेट सावकार यांस खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं मी माझे दुकानचे काम पाहण्यास सेवराम महेसदास मारवाडी दुसरा रामजी वा॥ लक्ष्मण पाटील यांस मुखत्यारपत्र देऊन मुखत्यार नेमिलें होतें परंतु सदर्हू दोघे मनुष्य दुकानचे काम बरोबर पाहात नसून दुकानांत घोंटाळा करण्याचा त्यांचा विचार आहे. यावरून आजतारखेपासून त्यांचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तरी वरील दुकानासंबंधीं सेवराम महेसदास मारवाडी व रामजी लक्ष्मण पाटील यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कळावें ता॰ ९-५-१२

सही

चंपा मर्द सुकदेव मारवाडी रा॰ माटरगांव तर्फे हेमराज कोजुराम द॰ खु॰

नो॰ नं॰ २९४

## नोटीस

बेशमी रा. रा. सेवराम महेसदास मारवाडी व रामजी लक्ष्मण पाटील उभयतां राहणार माटरगांव ता॰ खामगांव यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माला कोर्टांचे व घरीं दुकानचें काम पहाण्यास मुखत्यारपत्र देऊन मुखत्यार नेमिलें होतें परंतु तुह्मी काम बरोबर करीत नसल्यानें तुमच्या दोघांचे मुखत्यारपत्र काढून तुह्माला ह्मणजे सेवराम मारवाडी याजला एकट्याला मुखत्यारपत्र दिलें परंतु आतां तुह्मीही बरोबर व्यवस्था पहात नाहीं त्यामुळें आपण मला बुडविण्याच्या विचारांत आहां. यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मागें तुह्माला व रामजीला जें मुखत्यारपत्र दिलें होतें तें व तुह्माला एकट्याला मुखत्यारपत्र दिलें तेही आज तारखेपासून रद्द समजावें. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत आमचें दुकानचें कागदपत्र व आपण वसूल केलेली रक्कम वह्यावगैरे मजला समजून देऊन आमच्या ताब्यांत द्यावे व पावती घ्यावी असे न केल्यास आपलेवर योग्य कोर्टांत दावा करून नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जाईल. ही नोटीस ता. ९-५-१२ इ.

सही [मारवाडी]

चंपा मर्द सुकदेव मारवाडी रा॰ माटरगांव ता॰ खामगांव तर्फे हेमराज कोजुराम द॰ खु॰

नो॰ नं॰ २९५

## जाहिर नोटीस

लक्ष्मण जैराम देशपांडे व नामदेव एकोबा पाटील राहणार वरवटबकाल ता॰ जळगांव व गांवगांवचे सर्व साहुकार व लोक यांना—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं मौजे वरवट ता॰ जळगांव जि॰ बुलडाणे येथील शेत सर्वे नंबर ११९ एकरगुंठे ८८३८ आकार २४ यातील निम्मे व ६० नं॰ १४२ एकर ७०२ आकार १९ सालीम नं॰ १४८ एकर ९-१९ आकार ११ नं॰ २३२ एकर ८ आकार ८ अशी जमीन वडिलार्जीत असून वडलाचे मरणानंतर सदरील शेतांत निम्मे आमचा आणि निम्मे बंधु लक्ष्मण जैराम याचा याप्रमाणें हिस्सा असतां आमचे संमतीवाचून व लक्ष्मण जैराम यानें आपले स्वतः करितां सालीम शेते नामदेव एकोबा याजपाशीं गहाण ठेवल्याचे ऐकत असून यापुढें खरेदी वगैरेही देण्याचा विचार दिसत आहे. यासाठीं उभयतां देणार घेणार आणि सर्व लोकांना कळविले जाते कीं वर दाखविलेल्या निम्मे शेतांवर लक्ष्मण जैराम याची मालकी नसून ती त्यास गहाण किंवा अन्य रीतीनें देता येत नाहींत सबब त्यानीं नामदेव याजपाशीं सालीम शेते गहाण ठेविले असल्यास ते निम्मे पुरते रद्द असून यापुढें कोणी कोणत्याही रीतीनें वरील मार्गे निम्मे हिश्शाची शेते घेऊं नये. यासाठीं लक्ष्मण जैराम व नामदेव एकोबा यांना या द्वारें कळवून सर्वांस प्रसिद्ध केले जात आहे. या विरुद्ध झाल्यास निम्मे शेते याजवर कोणतेही प्रकारची जबाबदारी राहणार नाहीं. कळावें ता॰ १०-५ १९१२ इ.

सही

भगवंत जैराम पटवारी मौजे वरवट बकाल द॰ खु॰

नो॰ नं॰ २९६

## जाहिर नोटीस

आकोला येथील सर्वत्र लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येतें कीं अकोला फायन्यान्स सब कमेटीनें ता॰ २७ ४-१२ इ. रोजीं ठराव नंबर ३ मध्यें घरपट्टीचा व डिव्हिजन (ड) व [ई] खेरीज करून बाकीच्या सर्व डिव्हिजनमधील भंगीपट्टीचा ठराव कायम केला आहे. सदर्हु घर व भंगीपट्टीच्या ठरावांच्या याद्या कर देणारे लोकांच्या पाहण्याकरितां म्यु॰ कमेटीच्या ऑफिसांत तयार ठेवल्या आहेत. तरी सदर्हु करांचे आकारणीसंबंधी ज्या कोणास कांहीं सूचना अगर तकरार करावयाची असेल ती त्यांनीं ही नोटीस प्रसिद्ध केल्याचे तारखेपासून १० दिवसाचे आंत खालीं सही करणाराकडेस लेखी करावी. कळावें ता॰ ७ ५ १९१२

आकोला ता. ७ ५-१२ } (Sd) R. V. Mahajani व्हा॰ चेअरमन म्यु॰ कमेटी आकोला.

नो॰ नं॰ २९७

## नोटीस

वि॰ सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं॰ १२ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—

अर्जदार

मुलाई मर्द नेवजी माळी राहणार मोरगांव भाकऱ्याचे ता॰ आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचें कोर्टांत दिला असून त्याची चौकशीचि तारीख ८।७।१९१२ इ॰ रोजीं आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता॰ १४-५-१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज्ज आकोला.

नो॰ नं॰ २९८

## नोटीस

सर्वत्र लोक राहणार मौजे गायगांव बुजरूक तालुके खामगांव आणि खामगांव तालुक्यातील सर्व शेट सावकार व पाटील कुळकर्णी वगैरे सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं मौजे गायगांव बुजरूक येथील खुद्द आमचे मालकीचें शेत सर्वे नंबर ८ ११ एकर ३ गुंठे आकार १९ रुपये १ आणा पै ६ या शेतातील निम्मे हिस्सा पुर्वेकडील रोडी वल्द नारायण कुकडे यांस आमचे बापानीं तो हयात आहे तो पावतों त्याचे स्वतःचे उदरनिर्वाहा करितां दिला होता सदरहू हिस्सा आमचे बापानीं पूर्वी कोणतेही प्रकारें त्यास खरेदी अगर बक्षिस करून दिला नव्हता व रोडी वल्द नारायण हा मयत होऊन वर्षे १॥ वर्षे झाले. व हल्लीं त्याची बायको नामे तानकी ही सदरहु हिस्सा विकून टाकून दुसरा घाठाव करण्याचे समजल्यावरून या नोटीशीनें जाहिर करण्यांत येत आहे कीं यापुढें सदरहु हिस्सा तिला कोणत्याही प्रकारें व कोणासही गहाण, खरेदी अगर बक्षिस अथवा भाड्यानीं देतां येत नाहीं. करितां सदरहू हिस्सा कोणी तीचे लबाडीचे सांगण्यावरून घेऊन व्यर्थ फसूं नये. ह्मणून नोटीशीनें जाहिर केलें आहे इतक्यावर सदरहू हिस्सा कोणी खरेदी, गहाण, बक्षिस अथवा भाड्याना घेतल्यास ज्याचा तो जबाबदार होईल. व झालेला सर्व लेख खोटा व बनावट ठरला जाईल कळावें. तारीख १८ माहे मे सन १९१२ इसवी. दस्तुर गणपत तुकाराम टोंगळे राहणार शेगांव दस्तुर खुद.

सही

नथ वल्द विठोबा पाटील द॰ खु॰

नो. नं. २९९

Registered No. N.4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६] आकोला—सोमवार तारीख २७ माहे मे सन १९१२ ई० [ अंक २१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजार वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट;
नं १

### मुंबई बँकचं सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{1}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

### चांदीचीं भांडीं.

**खरें सचोटीचें दुकान.**

आमचें दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात मॉल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
३ आदितवारपेठ, नासिक

श्री राधावल्लभाजयति

### वर्षफल ।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि जीवन मरण, रोग, सन्तान तरेक्की, मौकूफी, व्यापारमें किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काममें कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल व्ही० पी० द्वारा २। रुपयेमें भेज देंगे. हमारे यहां जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते है अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेजकर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पत्ताः—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
नं ४ चित्तीखाना आगरा.


## निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्याही पातके कशीं होतात व त्यांचा परिणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कमा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखे सोसावी लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परिणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोपास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वत.च करावा. या सर्व गोष्टी विषयीं जगनियंत्या परमेश्वराने माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलं आहे भाड्यानें घेतलेले घर केव्हां सोडावे लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेले घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जो. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ अकोला वऱ्हाड
नो. नं. २६०


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं रा० रा० शिवराम मल्हारा गुरव मुक्काम आकोला यांस आमचे— "लक्ष्मीनारायण प्रल्हाद दुकान आकोला" तर्फे जे कुलमुखत्यारपत्र होतें तें आम्ही तारीख २३।१०।१९१२ इसवी पासून रद्द केलें आहे. यापुढें ते आमचे तर्फे मुखत्यार या नात्यानें कोणतीही कारवाई किंवा लिखापढी करतील तर त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं कळावें. २०।५।१२

सह्या ( मारवाडींत )
लक्ष्मीनारायण वा॥ जोहारमल मारवाडी
दस्तुर खुद्द.
प्रल्हाद वा॥ जोहारमल मारवाडी द. खु.
नो० नं० २६१

### जाहिर नोटीस

सर्वत्र लोक व शेट सावकार, काजीखेड येथील पाटील व पटवारी व सुपडा वा॥ पांडू पाटील यांसः——

मी खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं माझा भाऊ मोतीराम हा मयत झाला त्यास आज सुमारें ५।६ महिनें झाले व आतां माझी भावजई सेवंती ही आहे. ती आपले बापाचे घरीं आहे. तर तीजपासून कोणीही माझ्या भावाची स्थावर जंगम इस्टेट गहाण, खरेदी, किंवा बक्षीस अगर कर्ज कोणीही देऊं नये त्या इस्टेटीवर मालकी माझी आहे. गहाण, खरेदी किंवा कर्ज दिल्यास ते बातल असे तीच्याशीं जो कोणी व्यवहार करील त्यानीं आपल्या जोखमेवर करावा. व सुपडा पाटील याच्याशीं माझ्या भावाच्या इस्टेटीबद्दल कोणी व्यवहार करूं नये केल्यास तो रद्द असे. याउपर व्यवहार केल्यास त्याजवर फिर्याद करून कोर्टखर्च व नोटीशीचा खर्च भरून घेतला जाईल कळावें. ता० २२।५।१२

सही
राधी मर्दे मुकुंदेव पाटील रा० गव्हाण ता० खामगाव निशाणी हातची बांगडी असे.

नो० नं० २६२

### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

**जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.**

यांचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेंखर | दर तोळा | ५ |
| चंद्रपुटी प्रवाळ | " | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | " | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | " | १ |
| नागाच्या गोळ्या | " | २ |
| महायोगिराज गुग्गुळ | " | ० |
| खोकल्याच्या गोळ्या | | २ |
| पोलादभस्म | | ३ |
| लक्ष्मी विलास | " | १५ |
| त्रिभूवन किर्ती | " | २ |
| श्वास कुठार | " | २ |
| सुवर्णमालनीवसंत | " | ६॥ |
| लघुमालनीवसंत | " | २ |
| समिर पन्नग | " | ५ |
| रससिंदुर | " | ३ |
| चंद्रोदय | | १५ |
| हिंगाष्टक चुर्ण | बांटली | ०= |
| डोळ्यांचें औषध | " | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | -। |
| लिनिमेंट आयोडिन | " | ।॥। |
| टि. आयोडिन | " | ।= |
| महावातास्त्र तेल | " | |
| मोठी | " | ॥= |
| मध्यम | " | ।-॥ |
| लहान | " | ०= |
| उसाचा शिर्का | " | ।= |
| मध बाटली. | | |
| मोठी | " | ।= |
| लहान | " | ०=॥ |
| पिनसावर तेल | " | ।॥। |
| ग्लिसराईन बाटली. | | ०= |
| गजकर्ण अर्क | " | ।= |
| गजकर्ण मलम | " | ०=॥ |
| शंखद्राव. | तोळा | ॥। |
| कुंचल्यादि वटी | " | ।॥। |
| हिंगणबेटाचे तेल | " | ०= |
| नारायण चुर्ण | " | ०= |
| इन्द्र गोटी जुलाब डझन | | ०= |
| ग्रहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | " | २ |
| शितोपला चुर्ण | " | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | " | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.
ता. १।१।१२

जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला.

वऱ्हाडसमाचार.

ज्येष्ट शुद्ध ११ शके १८३४ परिधावी

## मद्रासची औद्योगिक परिषद.

आमच्या उद्योगधंद्याच्या उन्नतीचा प्रश्न हा सध्याचे काळीं अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्यामुळें त्या संबंधानें हिंदुस्थानच्या कोणत्याही प्रांतांत जी कांहीं चळवळ होत असेल तिच्याकडे सर्वांचें लक्ष वेधणें अत्यंत जरूर आहे. मद्रासच्या औद्योगिक परिषदेची बैठक नुकतीच झाली. तिच्या कामाचें पर्यालोचन या दृष्टीनें अत्यंत हितावह आहे. हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांचे पाऊल पुढें पडावें अशी उत्कट इच्छा प्रत्येक सुशिक्षिताचे ठायीं उत्पन्न झाली आहे यांत शंका नाहीं. पण हिंदुस्थानांत मुख्य उद्योग ह्मणजे कृषिकर्म. यांत मात्र प्रगति झाली नाहीं; शेतकरीवर्ग १०० वर्षांपूर्वी जसा अज्ञानांत होता, तसाच आतांही आहे, जुनें नांगर जुनीं आउतें, जुनीं खतें, सगळी जुनी पद्धति कायम आहे, युरोप अमेरिका, जपान वगैरे राष्ट्रांनीं कृषिकर्मांत केलेल्या प्रगतीचें आमच्या जानवा कुणब्याला यत्किंचितही माहिती नाहीं, त्यामुळें या मुख्य उद्योगांत आमचें पाऊल पुढें पडण्यास अद्याप बराच कालावधि पाहिजे असे निराशेचे उद्गार मद्रासच्या परिषदेचे अध्यक्ष मि० त्यागराज चेटी यांनीं काढले आहेत. दारिद्र्य, पावसाचें दुर्भिक्ष, शिक्षणाचा अभाव, इ० कारणें दूर झालीं नाहींत ही गोष्ट खरी आहे; पण या कारणांबरोबरच सुशिक्षित लोकांनीं आजपर्यंत शेतीविषयीं केलेली उपेक्षा हें आणखी एक कारण होतें तें हळूं हळूं दूर होत चाललें आहे. शिवाय सरकार अनेक प्रकारें शेतकरी वर्गाला साह्य करण्याचे कामीं बद्धपरिकर आहे ही गोष्टही विसरतां कामा नये. या शेवटच्या दोनच गोष्टी घेतल्या तरी भविष्यकाळाविषयींची निराशा पुष्कळ अंशानीं कमी व्हावयास पाहिजे आहे. मुंबई, मद्रास, पंजाब, मध्यप्रांत, वऱ्हाड वगैरे प्रांतांतून सरकारचें शेतकीखातें कसें जागृत झालें आहे व शेतकरी वर्गाच्या उपयोगीं पडण्यासाठीं तें कसें निरनिराळ्या प्रकारें यत्न करीत आहेत तें पाहिलें ह्मणजे मि. चेटी यांचा निराशावाद आपोआप जिरतो. सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नाच्या व सार्वजनिक तिजोरींतून या कामीं खर्च पडणाऱ्या रकमांच्या मानानें कदाचित् फलोत्पत्ति दिसत नसेल. पण हा दोष कोणाचा ? आमच्या मतें सुशिक्षितांचा आहे. यांनीं सरकारला जसें साह्य द्यावें तसें आजपर्यंत दिलें नाहीं, व कृषिकर्माच्या उद्योगांत आपलें तनमनधन घालावें तें घातलें नाहीं, सरकारी नौकरी किंवा वकिली हेंच आपल्या जीवितावें इतिकर्तव्य मानिलें त्याचा हा परिणाम आहे. पण आतां त्याना आपल्या कर्तव्यमार्ग स्पष्टपणें कळूं लागला आहे ही गोष्ट निराशाजनक नसून भावी उन्नतीचें आशापूर्ण चिन्ह आहे असें समजण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

इतर धंद्यांसंबंधानें तर आशा करण्यास अधिकच कारण आहे. कृषिकर्मांचे खालोखाल कापडाचा धंदा मोठा आहे. या बाबतींत दरवर्षी पुढें पाऊल पडत आहे ही संतोषाची गोष्ट आहे. हातमागांची सुधारणा, व त्यांच्या संख्येंत झालेली वाढ तसेंच कापडांच्या गिरण्यांत झालेली वाढ आणि त्यांपासून कारखानदारांना गेल्या पांच सहा वर्षांत झालेला विलक्षण नफा, या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर या धंद्यांत आमच्या देशाचें पाऊल खात्रीनें पुढें पडलें आहे असें दिसून येईल. या शिवाय तेलाच्या गिरण्या, अल्युमिनमचीं भांडीं करण्याचे कारखाने, कातडीं कमावण्याचे कारखाने, वगैरे ज्या गोष्टी आमच्या देशांत अगदीं अश्रुतपूर्व होत्या, त्याही आह्मी आज प्रत्यक्ष पाहत आहों. ब्यांका विमा उतरणाऱ्या मंडळ्या, संयुक्त भांडवलाचे कारखाने वगैरे इतर गोष्टींत ही आह्मी पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जाण्यास शिकत आहों. या कामीं अनेक वेळां आमचे प्रयत्न फसतात, व भलत्याच चुका करून कंपन्या बुडतात. ही गोष्ट खरी आहे, पण नवशिक्याच्या हातून अशा चुका व्हावयाच्या. त्याबद्दल खेद मानून निराश न होण्यांतच भावी यशाचें बीज आहे असें समजलें पाहिजे. आमचे हे सगळे उद्योगधंदे शास्त्रीय व व्यावहारिक तत्त्वांवर सुरळीतपणें चालविण्यास शिकणें हें सध्याच्या सुशिक्षित मंडळींचें आद्य कर्तव्य आहे. तें ते जर लक्षपूर्वक करतील तर धंद्यांत अपेशाचें प्रमाण सध्यां जें फार मोठें दिसत आहे तें बरेंच लहान होईल. सुकाणूविरहित तारूं जसें समुद्रांत भडकतें व नाश पावतें तसें आमच्या उद्योगधंद्याचें होऊं नये, यासाठीं शास्त्रीय व व्यावहारिक शिक्षण घेण्याचे कामीं सुशिक्षितांनीं बिलकुल कसूर न केली व व्यवहारांत शील न सोडलें तर हिंदुस्थानची भावी औद्योगिक स्थिति लवकरच उज्वल झालेली दिसेल. मि० चेटी यांच्या भाषणापासून जर कांहीं शिकतां येण्यासारखें असेल तर तें हें आहे.

## सर्वांच्या पुढें

सुशिक्षित, विचारी आणि कर्तृत्त्ववान् अशा महाराजांच्या नेतृत्वाखालीं बडोदें संस्थाननें जसें शिक्षणप्रसाराचे कामीं अग्रस्थान पटकाविलें आहे, तसेंच शेतकीच्या प्रगतींत ही तें संस्थान इतर देशी संस्थानांच्या पुढें आहे हें पाहून कोणालाही संतोष वाटेल. गेल्या वर्षांत त्या संस्थानच्या शेतकीखात्यानें बरीच मोठी कामगिरी केली. जपानी भुईमूग, पोपया गहूं, पुण्याकापूस, नवा ऊंस, व त्याचप्रमाणें जवस, सण, वगैरे वस्तूंच्या नव्या नव्या जातींची लागवड त्या खात्यानें जागजागीं सुरू केली आहे. एका तालुक्यांत द्राक्षें लावलीं आहेत. नवीन यंत्रसामुग्री आणून त्यांची माहिती शेतकऱ्यांना करून देणें सध्याचे काळीं अत्यंत अवश्य आहे. हेंही काम अंशतः झालें आहे. एकंदर संस्थानाच्या विस्ताराच्या मानानें ९३ नवे विलायती नांगर ह्मणजे फारच थोडे, पण सुरुवातीच्या दृष्टीनें या प्रयत्नाची योग्यता मोठी आहे. याशिवाय या यंत्रांचा उपयोग समजावून देणारीं, व लोकांचें शंका समाधान पत्रद्वारें करणारीं माणसेंही संस्थानानें ठेविलीं. कृषिकर्मविषयक चोपड्यीं देशी भाषेंत छापून वाटण्यांत आलीं. त्याचा परिणामही हळूं हळूं दिसूं लागला. लोक तितके अधिक जिज्ञासु झाले. याशिवाय प्रदर्शनें, जत्रा, प्रयोग, व्याख्यानें, वगैरेंच्या द्वारें ही कृषिकर्मोन्नतीची चळवळ त्या संस्थानानें जोरानें चालविली. परस्परसाह्यकारी मंडळ्यांचा पाया मात्र अद्याप त्या संस्थानांत बसावा तसा भक्कम बसलेला दिसत नाहीं. पण याही गोष्टींकडे संस्थानांतल्या अधिकाऱ्यांचें अधिक लक्ष जाईल अशी आह्मी आशा करतों.

## वऱ्हाडचें रेव्हेन्यु खातें.

सरकारी अधिकारी व प्रजाजन यांचीं मनें परस्परांना पुरतेपणीं जाणत असलीं व परस्परांच्या अंगच्या गुणांची योग्य पारख परस्परांना झाली ह्मणजे उभयतांनाही जें कांहीं समाधान होतें तें अपूर्व असतें. आमच्या प्रांताच्या सुदैवानें आह्मांला असेच सहानुभूति प्रेरित व गुणज्ञ अधिकारी वेळोवेळीं मिळत गेले आहेत ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. याला प्रत्यक्ष प्रमाण १९१०-११ सालच्या रेव्हेन्यु खात्याच्या रिपोर्टांत फार चांगलें आहे. वऱ्हाडची रेव्हेन्युपद्धति पूर्वीपासूनच इतर प्रांतांच्या मानानें चांगली होती. तींत हल्लींचे कमिशनर मि० स्लाय यांनीं सुधारणा करून ती अधिकारी व रयत या दोघांनाही अधिक सुखावह केली ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे. वऱ्हाडांत अधिकाधिक जमीन दरवर्षी लागवडीखालीं येत आहे व गेल्या सालीं पर्जन्यमान कमी झाल्यामुळें शेतकीला जरी थोडाफार धोका पोंचला तरी एकंदरीनें आमच्या प्रांतांतल्या शेतकऱ्यांना गेलें साल बरेंच सुखाचें गेलें या बद्दलचें पुष्कळसें श्रेय रेव्हेन्युपद्धतीला दिलें पाहिजे. शेतकऱ्यांपासून जमीन महसूल वसूल करण्यास अधिकाऱ्यांना जड गेलें नाहीं लोकांनी खुषीनें तो वेळच्यावेळीं दिला याबद्दल अधिकाऱ्यांनीं प्रदर्शित केलेला संतोष हें लोकांच्या सच्छीलाबद्दलचें उत्तम सार्टीफिकीटच ह्मटलें पाहिजे. दिवस बरे असले, व महसूल बेताचा असला ह्मणजे सरकार देणें वेळींच देऊन टाकण्यास लोक उत्सुक असतात, ऐपत असून सरकारला बुडविण्यासाठीं गरिबीचें कोंग घ्यावयाचें व विनाकारण फिर्यादी अर्यादी करण्यास लावून सरकारी अधिकाऱ्यांस त्रास द्यावयाचा ही गोष्ट आमच्या वऱ्हाडच्या रयतेला ठाऊक नाहीं अशी रेव्हेन्यु अधिकाऱ्यांची खात्री झाली आहे. अशी आमची समजूत आहे. अशी खात्री एकदां झाल्यावर एखादे अडचणीचे वेळीं वसूल भरण्याचे कामीं रयतेकडून थोडा विलंब झाल्यास तो निरुपायामुळें झाला, बुद्धिपुरःसर नव्हे, असें समजून अधिकारी रयतेस तोशीस लावणार नाहींत असें हुकूम सोडण्यास वरिष्ठ अधिकारी मागें घेणार नाहींत अशी आमची खात्री आहे.

## क्षयरोगाचा प्रतीकार.

हिंदुस्थानांत सध्या जे पांच चार रोग फार जोरानें प्रसार पावत आहेत त्यांत क्षयरोग, मलेरिया, आणि डायाबेटीस अथवा बहुमूत्राचा विकार हे तीन रोग प्रमुख आहेत. त्यांतही पुनः क्षयरोगाची गोष्ट अशी आहे कीं त्याचें ठाणें शरीरांत भक्कमपणें बसेपर्यंत तो रोग आपणास जडला आहे हें स्वतः रोग्याला व डाक्तरवैद्यांनाही पूर्णपणें कळत नाहीं. यासाठीं आपणाला तो रोग न जडावा ह्मणून प्रत्येकानें नेहमींच सावधगिरी घेतली पाहिजे. ही सावधगिरी कशा प्रकारें घ्यावी हें कळण्यासाठीं पुढील गोष्टी अवश्य ध्यानांत ठेवाव्या:—

१ भलत्या जागीं थुंकूं नये; २ दुसऱ्याच्या थुंकीवर पाय देऊं नये; ३ कोंडल्या जागेंत राहूं नये; ४ उघड्या व स्वच्छ हवेंत दिवसांतून निदान दोन तास तरी राहावें; व तेथें असतां जोरानें श्वास आंत घेऊन तो हळूं हळूं बाहेर सोडावा; ५ डोक्यावर पांघरूण घेऊन कोंव्हांही निजूं नये; ६ दूध पिणें तें नेहमी उकळून प्यावें ७ खाण्यापिण्याचे पदार्थ नेहमीं स्वच्छ भांड्यांत घालून झाकून ठेवावे. ८ घराच्या सांदीकोपऱ्यांत सुद्धां उजेड जाईल अशीं घरें बांधावीं ९ निजण्याच्या खोलीच्या खिडक्या नेहमीं उघड्या ठेवाव्या. १० बायकांनीं सकाळीं व संध्याकाळीं कांहीं तास तर उघड्या अंगणांत किंवा ओटीवर बसून कामें करावीं. ११ होतां होईल तो सर्वांनींच आपले व्यवहार उघड्या जागेंत करावें. या गोष्टी दिसण्यांत क्षुद्र दिसतात, पण परिणामाकडे दृष्टि देऊन या बाबतींत निष्काळजीपणा आपल्या हातून किंवा आपल्या घरांतल्या कोणाही माणसाचे हातून न होईल अशी खबरदारी घ्यावी.

## मुरळ्याबद्दलचें बिल.

देवाला मुरळ्या ह्मणून मुली वाहण्याची चाल या देशांतल्या बऱ्याच भागांत आहे आणि ती बरीच जुनीही आहे. तशीच मुली देवाला अर्पण करण्यांत आईबापाचा हेतु त्या मुलींनीं पुढें कुमार्गी व्हावें असा मुळींच नसतो, उलट ज्या देवाच्या कृपेनें आपणांस संततिसुख लाभलें त्याच देवाच्या सेवेंत त्या मुलीनें आपलें आयुष्य घालवावें असा अत्यंत श्रद्धामूलक व पवित्र हेतु असतो ही गोष्टही कबूल केली पाहिजे. पण या श्रद्धामूलक चालीचा प्रत्यक्ष परिणाम आईबापांच्या अपेक्षेप्रमाणें होत नाहीं व शेकडा ८० मुरळ्या झालेल्या मुली कुमार्गानें जाऊन आईबापांच्या नांवा लौकिकाला व त्यांच्या श्रद्धेला काळीमा

लावतात ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे इतक्या अनर्थाला कारण असलेली चाल समंजसपणानें लोकांनीं आपण होऊन मोडावयास पाहिजे होती; पण तें त्यांच्या हातून न घडल्यामुळें आतां कायद्याचा आश्रय करून ती मोडण्याविषयींचा विचार अनेक सुशिक्षितांच्या डोक्यांत येऊं लागला आहे हा कोणत्याही दृष्टीनें गैर नाहीं हें प्रत्येक विचारी मनुष्य कबूल करील. वस्तुतः या कामीं कायद्याचें साह्य मागण्याचें काम कोणा तरी हिंदुधर्मी गृहस्थानें करावयास पाहिजे होतें. पण तें त्यांनीं न केल्यामुळें नागपूरचे ना. मि. दादाभाई हे या कार्यास प्रवृत्त झाले आहेत व येत्या हिवाळ्यांत सिमला येथील वरिष्ठ कायदेकौंसिलाच्या बैठकीपुढें सदर बिल मांडण्याची परवानगीही त्यांनीं मिळविली आहे अशी बातमी आहे. बिलांत कोणकोणतीं कलमें आहेत व सध्याच्या कायद्यानें या बिलाचा हेतु पार पडण्यासारखा आहे किंवा नाहीं वगैरे गोष्टींची चर्चा पुढें होईलच. तूर्त आह्मी येवढेंच ह्मणतों कीं या बिलाचा हेतु स्तुत्य आहे हें लक्षांत घेऊन आमच्या धर्मांत सरकार उगाच ढवळाढवळ करीत आहे, हें बिल पास करणें ह्मणजे हिंदुधर्माचा उच्छेद करण्यास प्रवृत्त होण्यासारखें आहे, या प्रयत्नानें लोकांचीं मनें क्षुब्ध होतील, वगैरे हास्यास्पद विधानें न करतां प्रत्येक हिंदुधर्माभिमानी गृहस्थानें सुविचारानें प्रेरित होऊन मि दादभाईच्या या उद्योगास हातभार लावावा हें योग्य आहे व यांतच खरा धर्माभिमान आहे.

---

## प्रेस बिलाच्या वेळची एक गोष्ट

'बंगाली' पत्राच्या लंडनच्या बातमीदारानें लॉर्ड मिंटो यांच्या तोंडून जाहिर भाषणांत ऐकलेली एक विचित्र गोष्ट लिहिली आहे. ती अशी कीं लॉर्ड मिंटो साहेब बाहेरून आपल्या घरीं आले. इतक्यांत त्यांनीं आपल्या टेबलावर एक पत्र पाहिलें. ते उघडून पाहणार इतक्यांत त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीनें घाईघाईनें येऊन सांगितलें कीं गव्हर्मेंटहौसपासून एका हाकेच्या अंतरावर एका पोलीस इन्स्पेक्टराला कोणीं गोळी घालून मारलें. ही बातमी ऐकून साहेब दचकले व चिंताग्रस्त झाले. पुढें टेबलावरचें पत्र उघडून पाहतात तों लॉमेंबर मि० सिंह यांचा राजीनामा! या राजीनाम्याचें कारण पत्रांत असें दिलें होतें कीं सध्या घाटत असलेल्या प्रेस बिलाला आपल्याच्यानें संमति देववत नाहीं. ही दुसरी काळजी उत्पन्न झाली. त्या रात्रीं व्हाइसराय साहेबाकडे मेजवानीचा बेत होता. ती झाल्यावर दोन तासांनीं मि० सिंह यांनीं दुसरें पत्र पाठवून कळविलें कीं पोलिस इन्स्पेक्टरचा खून झाल्याचें कळण्यापूर्वी पाहिलें पत्र लिहिलें होतें, पण आतां माझें मत बदललें आहे. मी तें पत्र परत घेतों. पुढें प्रेसबिलाचेवेळीं मि० सिंह यांनीं उत्कृष्ठ भाषण करून बिलाला संमति दिली. ही गोष्ट सांगतांना लॉर्ड मिंटो साहेबांनीं गैरसमजूत होऊं नये ह्मणून आणखी हेंही सांगावयास पाहिजे होतें कीं मि. सिंह यांचा पूर्वी बिलाला विरोध असण्याला कारण ह्मणजे प्रेस आक्टाखालीं होणाऱ्या खटल्यांतल्या निकालावर मुळींच अपील असूं नये अशी तजवीज मूळच्या बिलांत होती ती गोष्ट मि० सिंह यांस पसंत नव्हती. अपीलाला जागा ठेवलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता, व कौंसिलच्या बाकीच्या मेंबरांना तें मान्य नव्हतें. सबब मि० सिंह यांनीं राजीनामा पाठविला होता. पण त्यांनीं राजीनामा परत घेतल्यावर मागाहून त्यांच्या इच्छेप्रमाणें अपिलाबद्दलचें कलम त्यांत घालण्यांत आलें. सदर आक्ट हा कायमचा व्हावा किंवा त्या काळापुरता व्हावा याविषयीं मि० सिंह यांचें मत काय होतें तें बाहेर आलें नाहीं. पण ती वेळ आतिशय धोक्याची असल्यामुळें त्यावेळेपुरता प्रेस आक्ट करण्यास पोलीस इन्स्पेक्टराच्या खुनामुळें संमति देण्याची बुद्धि मि० सिंह यांना झाली असावी, असा आमचा अजमास आहे. कारण, आतिशय घाबरण्यासारखी स्थिति असतांना केलेले कायदे शांततेच्यावेळींही तितक्याच कठोरपणानें अंमलांत यावे असें ह्मणण्याइतके घाबऱ्यावृत्तीचे ते खास नाहींत. शिवाय त्यांना आपल्या देशबंधूंच्या मूळ सौम्य प्रकृतीचें सूक्ष्म ज्ञान असल्यामुळें त्यांनीं प्रेस आक्ट कायमचा करण्यास आपली संमति दिली असेल हें संभवनीय दिसत नाहीं आपल्या संमतीचा भलता परिणाम झालेला पाहून तर त्यांनीं मागाहून दुसऱ्यांदा राजीनामा दिला नसेल ना? लॉर्ड मिंटो साहेब विलायतेंत जाऊन बसले; इकडे मि० सिंह हेही पुनः ब्यारिस्टरचा झगा घालूं लागले. पण वर्तमानपत्रकर्त्यांचें नरडें कायमचें आवळलें गेलें त्याची वाट काय?

---

## विलायतेंतला अनुभव.

पंडिता रमाबाई व पर० सौ० आनंदीबाई जोशी यांच्यामागें पुष्कळ महाराष्ट्रस्त्रिया विलायतेस जाऊन आल्या असतील पण त्यांनीं आपला विलायतेंतला अनुभव इकडच्या आपल्या भगिनींना वर्तमानपत्रद्वारें कळविल्याचें एकच उदाहरण कोल्हापूर येथील श्री० सौ० गंगूताई खेडकर यांचें आहे. यांचीं पत्रें मुंबईच्या 'दीनबंधु' पत्रांत येत असतात व हें पत्र ब्राह्मणद्वेष्टें ह्मणून प्रसिद्ध असल्यामुळें तीं पत्रें लोकांच्या वाचण्यांत न येतां दीनबंधूच्या फाइलींत बिचारीं गुरफटलेलीं पडून राहिलीं आहेत याचें वाईट वाटतें. सौ० गंगूताईनीं तिकडील स्त्रियांच्या घरांतल्या व्यवहारासंबंधानें जी माहिती सांगितली आहे तिच्यापासून आमच्या स्त्रियांनीं पुष्कळ शिकण्यासारखें आहे. तिकडच्या बायका नेहमीं कामांत कशा निमग्न राहतात, व कपडे शिवणें, धुणें, वगैरे कामें घरच्या घरीं करून नवऱ्याचा संसार कसा काटकसरीनें व दक्षतेनें करतात तें रिकाम्यावेळांत शेजारणीकडे जाऊन गांवांतल्या लोकांच्या कुचाळ्या करणाऱ्या किंवा एखादें सुगड घेऊन कापसाच्या बोटवाती करण्यांत व्यर्थ कालक्षेप करणाऱ्या रमाबाई, ठमाबाई आणि कंपनीला जर कळूं लागेल तर आमच्या गरिबीच्या संसारांतलीं अर्धीं अधिक दुःखें एकदम नाहींशीं होतील. आमच्या बायकांना आपल्या फुरसतीचा योग्य व्यय कसा करावा हें माहित नसल्यानेंच बहुधा घरांतलीं सासूसुनेचीं, जावाजावांचीं, किंवा मायलेकींचीं भांडणें होऊन त्यांच्यापायीं घरेंचीं घरें बुडतात. हाच त्यांचा फुरसतीचा काळ गृहस्थिति सुधारण्यांत, औषधपाण्याची माहिती करून घेण्यांत, मुलांमुलींना घरीं शिक्षण देण्यांत किंवा कपडे घरीं शिवणें, घरीं धुणें, वगैरे बारीकसारीक पण खर्चाच्या बाबी घरच्या घरीं करण्यांत जाऊं लागेल तर किती तरी कुटुंबें सुखी होतील! ह्मणून श्री० सौ० गंगुताई यांनीं आपला विलायतेंतला अनुभव पुस्तकाच्या रूपानें प्रसिद्ध करावा अशी आमची त्यांस सूचना आहे.

---

## सरकारी स्कॉलरशिपा

हिंदुस्थान सरकारानें युरोप, अमेरिका वगैरे परदेशांत जाऊन शास्त्रीय किंवा औद्योगिक शिक्षण घेणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांकरितां दरसाल सुमारें दोनशें पौंडाचण ह्मणजे सरासरी तीन हजार रुपयांच्या पांचसहा वार्षिक स्कॉलर्शिपा ठेविल्या आहेत. शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाचा सध्याच्या काळीं हिंदुस्थानास असलेली विशेष जरूरी लक्षांत घेतां या स्कॉलर्शिपा ह्मणजे खरोखर अगदींच थोड्या आहेत. जर्मनी, जपान, अमेरिका वगैरे राष्ट्रें अशा प्रकारच्या शिक्षणांच्या शाळांसाठीं लक्षावधि पौंड दरसाल खर्चण्यास मागें घेत नाहींत. त्यांच्यापुढें तीस कोटी प्रजेसाठीं दहावीस हजार रुपयांचा खर्च ह्मणजे अगदींच क्षुद्र आहे. वास्तविक पाहिलें असतां सरकारनें प्रांतोप्रांतीं मोठालीं टेकनिकल कॉलेजें काढावयास पाहिजे आणि अशा कामीं सढळ हातानें खर्च केलेला देशाच्या उत्कर्षास साधनीभूत होत असल्यामुळें सदर रुचिकपणाबद्दल सरकारास कोणी दोष देणार नाहींत. तें सरकारनें अद्याप केलें नाहीं, आणि नुसत्या पांच सहा स्कॉलर्शिपांवरच आपल्यावरच्या जबाबदारींतून मोकळे होण्याचा मार्ग काढला. तरी सरकार रयतेच्या हिताची जी बारीक सारीक गोष्ट करतें तिच्याबद्दल सुद्धां त्यांचे आभार मानण्यास हिंदी प्रजा तयार आहे. पण या स्कॉलर्शिपांवर सुद्धां गदा आणण्याचा विचार दिसतो हें पाहून वाईट वाटतें. या स्कॉलर्शिपांचा कितीसा उपयोग होत आहे हें पाहण्यासाठीं स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं एक कमिटी नेमिली आहे. सुदैवानें या कमिटींत इंडिया कौंसिलचे देशी मेंबर सरकृष्ण मोहन गुप्त हे एक सभासद असल्यामुळें ते या स्कालर्शिपा अजीबाद बंद करण्याची खटपट हाणून पाडतील अशी आशा आहे.

---

## प्रातिक सरकारांशीं करार.

हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांच्यामध्यें उत्पन्नाच्या बाबींची व खर्चाची वाटणी कशी करावयाची, या संबंधानें पूर्वी पंचवार्षिक करार होत असत. पुढें या पद्धतींत सुधारणा होऊन कांहीं कांहीं बाबतींत प्रांतिक सरकारला अधिक मवलती देण्यांत आल्या, आतां हिंदुस्थान सरकारानें पुनः एक ठराव काढून १९११ सालीं झालेले कायमचे करार निश्चित करून टाकले आहेत. या नव्या ठरावामुळें हिंदुस्थान सरकाराकडून प्रांतिक सरकारला मिळणारी ग्रांट कायमची न होतां वसुलाच्या उत्पन्नाबरोबर वाढती ठेवण्यांत आली आहे हें विशेष आहे. दुष्काळाचे वेळीं किंवा तसेच महत्त्वाचे प्रसंगीं मात्र यांत फेरबदल करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारानें आपणेकडे ठेविला आहे. या नवीन ठरावामुळें प्रांतिक सरकाराला कांहीं मर्यादेच्या आंत वसूल व खर्च यांचे बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. या ठरावानें घडवून आणिलेली सुधारणा पंचवीस वर्षांपूर्वी ह्मणजे लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीतच सुचविण्यांत आली होती. पण हिंदुस्थान सरकारच्या राज्यकारभाराचीं चक्रें फार मंदगतीनें फिरणारीं असल्यामुळें व वरिष्ठ सरकारी अंमलदारांकडून प्रांतिक सरकारला सुद्धां स्वातंत्र्य देण्याचे कामीं जबरदस्त विरोध घडल्यामुळें त्या सूचना आतांपर्यंत तशाच पडून राहिल्या होत्या आतां लॉर्ड क्रू व लॉर्ड हार्डिंज यांनीं त्या चक्रांस उदार राजनीतीचें वंगण घालून तीं लवकर फिरतील असें केल्यामुळें एकीमागून एक सुधारणा झपाट्यानें होऊं लागली आहे. हल्लींची सुधारणा ही प्रांतिक सरकारला भविष्यकाळीं मिळणाऱ्या पूर्ण स्वातंत्र्याचा पहिला हप्ता आहे अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे. नवीन कर बसावणें, किंवा असलेला कर उठविणें, कर्ज काढणें वगैरे कित्येक बाबतींत अजून प्रांतिक सरकारला कांहीं एक करतां येणार नाहीं. तो सगळा अधिकार हिंदुस्थान सरकारनें आपल्याकडे ठेविला आहे. पण कायदेकौंसिलें उत्कृष्ट प्रकारें कामें करून आपली पात्रता जसजशी स्थापित करतील, तसतसा एकेक अधिकार प्रांतिक सरकारला मिळत जाईल, असें दाखविण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण दिसतें.

---

## खोस्तानांतली गडबड.

अफगाणिस्तानांत फार प्राचिन काळापासून हिंदूंची मोठी वस्ती आहे. ही वस्ती मुख्यतः काफरिस्तान व खोस्तान या प्रांतांत आहे. या लोकांची संख्या आज कमींत कमी दहा लक्ष आहे. यांना जबरदस्तीनें मुसलमान करण्याचे प्रयत्न माजी अमीर अबदुल रहिमान यांचे कारकीर्दींत करण्यात आले होते त्या वेळीं हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल व व्हाइसराय लार्ड डफरीन यांनीं जुलमानें गांजलेल्या हिंदूंचा कैवार घेऊन अमीराला सामोपचारानें सांगितलें होतें कीं अशा जुलमानें बाटविण्याच्या प्रयत्नाचा परिणाम चांगला होणार नाहीं. शेजारीं हिंदुस्थानांत आधिक लोकसंख्या हिंदूंची असल्यामुळें आपल्या देशबांधवांच्या छळाच्या गोष्टी ऐकून त्यांचीं मनें क्षुब्ध होतील या गोष्टीचा विचार करावा. अमीर येवढ्यावर उमजले व त्यानीं तो छळ बंद केला. तेव्हांपासुन आतांपर्यंत त्या प्रांतांत शांतता होती. परंतु आतां तिकडे पुनः जुलूम सुरू झाला आहे व या जुलमाला अमीराची

मंजुरा आहे असाही लोक ... आहे. सध्याचे अमीर हबीबुल्ला हे थोड्या वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आले होते तेव्हां तरी निदान त्यांचा हिंदुधर्मावर तीव्र दृष्टि नव्हती हें खाए. कारण कीं त्यावेळीं बकरी-दचा सण आला असतां व मुसलमानांनीं त्यांच्या सन्मानार्थ त्या दिवशीं गोवध कर-ण्याचा विचार केला असतां ज्यामुळें हिंदू-चीं मनें दुखावतील असें कोणतेंही कृत्य माझेसाठीं करूं नका असा त्यांनीं मुसल-मानबंधूंना उपदेश केला होता. तेच अमीर हबीबुल्ला आतां आपल्या राज्यांत हिंदूंचा छळ होऊं देतील हें संभवनीय दिसत नाहीं. लॉर्ड हार्डिंज साहेब लॉर्ड डफरीन साहेबांचें अनुकरण करून अमीरसाहेबांस वेळींच सावध करतील काय ?

## कांग्रेसची तयारी.

येत्या दिसेंबरांत पाटणा येथें भरणाऱ्या कांग्रेसच्या तयारीस आतांपासून सुरुवात झाली आहे हें ऐकून कोणालाही संतोष वाटेल. विशेष संतोषाची गोष्ट ही आहे कीं मुसलमान बंधूही हिंदूंच्या बरोबरीनें कांग्रेसविषयीं उत्साह व आस्था प्रकट करूं लागले आहेत येत्या कांग्रेससाठीं जी स्वागतकमिटी नेमण्यांत आली आहे तिचें प्रमुखस्थान ना० मझरउलहक या उदार मताच्या मुसलमान गृहस्थास देण्यांत आलें असून व्हाइस चेअरमनही एका मुसलमान गृहस्थास करण्यांत आलें आहे. कांग्रेसबरोबर ति-च्याच मंडपांत भरणाऱ्या औद्योगिक परि-षदेचे स्वागत कमिटीचे चेअरमन ना० न्या-यमुर्ति हसन इमाम हे निवडले गेले आहेत व सामाजिक परिषदेच्या स्वागत मंडळीचे चेअरमन ना० मि० सिंह यांस निवडण्यांत आलें आहे. याशिवाय सेक्रेटरी वगैरेचे जागीं योग्य लायकीचीं व उत्साही मंडळी निवडली गेली आहे. तेव्हां यंदाची बैठक आजपर्यंतच्या कांग्रेसच्या बैठकींहून सरस न झाली तरी पूर्वीच्या इतकीच यशस्वी खास होईल असा रंग दिसतो.

## कारखान्यांबद्दलचा नवा कायदा.

लोक नको नको म्हणत असतां हिं-दुस्थानसरकारानें गतवर्षी गिरण्या, कारखाने वगैरे संबंधाचा नवा कायदा पास करून घेतला व त्याची अंमल बजावणी ता० १ जुलैपासून म्हणजे आणखी महिन्या सव्वा महिन्यानें सुरू व्हावयाची आहे. अशावेळीं या नव्या कायद्यांतलीं ठळक ठळक कलमें कारखानदारांच्या व मजुरांच्या माहितीसाठीं आम्ही येथें देतों. मुख्य फेरफार ज्यांत झाला आहे तें कलम म्हणजे पुरुषानें कारखान्यांत काम करण्याचे तास बारा ठरले आहेत त्याविषयींचें होय. सूत का-पड वगैरेच्या गिरण्यांत बायकांचे काम करण्याचे तास अकरा व मुलांचे सहा ठरले आहेत. इतर कारखान्यांतून मुलांकडून सात तास काम घेण्यास हरकत नाहीं. आठवड्यांतून एक दिवस कारखान्याला सुट्टी दिलीच पाहिजे व ही सुट्टी रविवारीं दिली असतां चांगली. रविवाराच्या ऐवजीं एखादा दिवस ठरविणें झाल्यास त्याप्रमाणें इन्स्पेक्टरास आगाऊ कळविलें पाहिजे. मुलाला कामावर लावण्यापूर्वीं तें काम करण्यास तो शरीरानें पात्र असल्याबद्दलचें सर्टिफिकीट मिळविलें असलें पाहिजे. पूर्वी या सर्टिफिकीटास चार आणे फी पडत असे, ती मात्र आतां पडणार नाहीं. पण सर्टिफिकीट आणणें नव्या कायद्यानें भाग झालें आहे. साधा-रणपणें कोणत्याही कारखान्यांत कामाला सुरुवात सकाळीं ५॥ व संध्याकाळीं ७ वाजण्याच्या अगोदर करूं देण्यांत येणार नाहीं. इन्स्पेक्टरांची संख्या वाढवून तपासणी सक्तीनें करण्याचा सरकारचा विचार आहे. पण हा विचार लागलीच ता० १ जुलै-पासून अंमलांत येईल असें नाहीं.

## फीमेल हायस्कूल

उमरावतीस स्त्रियासाठीं पृथक् हायस्कूल निघणार आहे हें कळविण्यास फार आ-नंद वाटतो. शालागृहाची योजना श्रीमती काशीबाई जोग यांच्या स्मारका निमित्त उभारलेल्या हायस्कूलच्या इमारतींत करण्यांत येणार आहे. अलिशान चीफ कमिशनर यांनीं हें हायस्कूल स्थापण्याविषयीं आपला अनुकूल अभिप्राय दिला ही मोठ्या संतो-षाची गोष्ट होय. या स्त्रियांच्या हायस्कू-लाचा प्रश्न इतक्या चांगल्या निर्णयाला लागला याबद्दल राजश्री स्लाय कमिशनर यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. पण सत्कार्याचा महिमाच असा आहे कीं जो जो त्यांत पडतो तो धन्यवाद संपा-दतो. रा. रा. मोरोपंत जोशी, रावबहादूर मुधोळकर, रा. रा. नरेश आप्पाजी द्रविड, कैकिणी, उमरावतीचा वनिता समाज इत्या-दिकांनीं पुढाकार घेतला आणि त्यांच्या प्रयत्नांला सुयश आलें. वऱ्हाडांत निदान ७५ विद्यार्थिणी हायस्कुलांत जाण्यासारख्या निघतील असा अंदाज आहे. मध्यप्रांताच्या सरकारला हें हायस्कूल एक भूषणाची गोष्ट होईल, आणि या हायस्कुलांतील शिक्षण-क्रम मराठी भाषेच्या द्वारानें चालू होण्या-सारखी निराळी पद्धती सुरू करण्याचा विचार घाटत आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः—उन्हाळा सौम्य सौम्य होत चालला असून ऋतुमानाचाच कल फिरल्यासारखा दिसतो. वारा सोसाट्यानें वहात असतो. उन्हाचा व तदंगभूत पटकीचा आजार अगदीं नामशेष होत चालला आहे. मध्यं-तरीं पावसाचे कांहीं थोडे थेंबही पडले यंदा पर्जन्य लवकर सुरू होईल असा सर्व रंग दिसतो.

रा. रा. अब्दुल गफूर पोलिस इन्स्पे-क्टर यांस आकोल्यास नेमण्यांत आलें.

रा. रा. विश्वंभर प्रभाकर लिमये एल. एम अँड एस यांस आकोल्यास असिस्टंट सर्जन नेमण्यात आलें.

रा. गोपाळ गोविंद सप्रे मुनसफ नर-सिंगपूर यांची बदली केळापुरास करण्यांत आली.

रा. रा. वामन रुस्तुमराव मंडलोई एक्स्ट्रा असि. कमि. आकोला हे रजेवर असून आतां त्यांची बदली दुसरीकडे झाली आहे. हे गृहस्थ फार सुशील, प्रामाणिक व गोड स्वभावाचे आहेत.

रा. रा. अमृत लक्ष्मण दिघे हे येथें आपल्या नवीन आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज व सेशनजज्जाच्या जागीं येऊन दाखल झाले.

रा. रा. इ. जे. फायडो बायलर इन-स्पेक्टर यांस १ महिन्याची हक्काची रजा मिळाली.

रा. रा. विष्णुपंत पुराणिक क्लार्क आफ कोर्ट, डिस्ट्रिक्ट जज्ज उमरावती यांस नाग-पुरास जुडिशिअल कमिशनरचे डिपुटी रजिस्ट्रार २ महिने २६ दिवसांकरितां नेमण्यांत आलें ही आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. महादेव शंकर देशमुख तह-शिलदार, उमरावती यांस १ महिन्याची हक्काची रजा मिळाली असून त्या रजेंत रा. रा. अमिरुद्दीन खान नायब तहशीलदार यांस तहशीलदार नेमण्यांत आलें.

रा. रा. गोपाळ सखाराम खरे अॅडि. मुनसफ, आकोला यांस छिंदवाडा येथें बदलण्यांत आलें हे गृहस्थ फार सात्विक, मेहनती व कायदेपंडित आहेत. यांच्या सुस्वभावामुळें हे जगन्मित्र असतात.

रा. रा. विष्णु नारायण बापट मुनसफ यांस उमरावतीस बदलण्यांत आलें.

मांजरखेड 'श्री मंगलक्षेत्र' ता. चांदूर येथील पातालेश्वराचा दशाहाराचा महोत्सव चालू आहे. या स्थलाच्या वैभवाचा हा काल दिसतो. जीर्णोद्धाराकडे मंडळी लागली असून पाटणकर नाटक मंडळीचे मालक रा. रा. माधवराव यांनीं या कामीं पुढाकार घेतला आहे.

रा. रा. सय्यद मुईनुद्दीनखां, आसि. डे. क. यवतमाळ यांस ता. २१ मे १९१२ पासून किंवा मिळेल त्या तार-खेपासून एक महिन्याची हक्काची रजा दिली आहे. व त्यांचे जागीं रा. रा. सी. ब्राऊन, आय्. सी. एस्. सब-डिविजनल आफिसर एलिचपूर यांस यवतमाळ येथें आफ. डे. क. नेमलें.

रा. रा. एच. सी. ग्रीनफिल्ड, आय्. सी. एस. असि. क. आकोला यांस एलि-चपूरला बदललें.

रा. रा. केशव बळवंत शेवडे यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतल्यावर रा. गोपिनाथ दामोदर कोतवाल आफि. मुन्सीफ यांस काढून टाकल्यावर रा. रा. बाळकृष्ण शामराव फरासखानेवाले, मुन्सीफ यांस बुलढाणा येथें बदलले.


## दरवर्षाची स्थिति यंदा नाहीं

दरवर्षी वळवाचे पाऊस फाल्गुन व चैत्र महिन्यांत सुरू होत असल्यामुळें, गुरांना हिरवा चारा लवकरच खावयास मिळत असे, व जुना कडबा शिल्लक पडत असे; परंतु यंदाची स्थिति तशी नाहीं जरी यंदा वळवाचे पाऊस कोठें कोठें पडले आहेत; तरी गुरांना हिरवा चारा लवकर मिळण्याची आशा नाहीं. व दुष्काळामुळें-ही जुना कडबा महाग होत चालला आहे. अशावेळीं तुम्ही आमचे सुधारलेलें कडबा कापण्याचें यंत्र वापरून तुमच्या गुरांचा बचाव केला पाहिजे. या यंत्रानें कडबा कापून घातल्यास थोडा कडबा पुष्कळ दिवस पुरतो, व गुरांचें पोट लवकर भरून कडब्याची बिलकुल नासाडी होत नाहीं. सबब आमच्या यंत्राची ताब-डतोब मागणी करा.

आपोआप पेंडी सरकविण्याचें यंत्राची किंमत रुपये ९१

हातानें पेंडी सरकविण्याचें यंत्राची किंमत रुपये १०८२

विशेष माहितीसाठीं आमचा नवा क्या-टलॉग नेबा व मागवा.

**किर्लोस्करबंधु.**
**पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).**

नो० नं० २७७


## नोटीस

रा. रा. त्र्यंबक लक्ष्मण आकोला आकोट मेलतांगा कंपनीचे मालक आकोला यांसी—

खालीं सही करणार याजकडून कळवि-ण्यांत येते कीं तुमचेकडे आमचे दुका-नचें बाकी रुपये १६४॥≡॥ अक्षरी एकशेचवसष्ट अकरा आणे साडा पै घेणें असून खात्यावर रुजू केले व तारीख १८-९-१२ रोजीं देण्याचा करार केला अद्याप रक्कम दिली नाहीं तुमचा एक मोडका तांगा आमचे ताब्यांत आहे तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आज पासून आठ दिवसांचे आंत आमची व्या-जासमेत रक्कम चुकती करावी. असें न केल्यास दरमहा दर शेंकडा दोन रुपये-प्रमाणें व्याज घेऊन योग्य कोर्टांत दावा केला जाऊन या नोटिसीचा खर्चही भरून घेतला जाईल हे खूप समजावें. कळावें ता० २४-५-१२ इ.

सही

गणेश हणमंत ठोंबरे आकोट
दस्तुर खुद

नो० नं० २७८

## नोटीस

रा. रा. मोतीरामशा दलाल नानकशाई मुकाम चोपडे

यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस दिली जाते कीं तुह्मी तुमची मुलगी आमचे येथें गंधर्वानें दिली असून गंधर्व रीतीप्रमाणे लावलें गेलें. व त्यानंतर तुमची मुलगी दीड महिना माझे घरांत नांदली नंतर बदमाष लोकांचे संगतीनें तिने मजला न विचारतां अंगावरील डागीनें किंमत रुपये २०० चे घेऊन रात्रीं पळून गेली ती तुमचे येथें आहे. करितां नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत डागीन्यासह माझी बायको माझे येथें पोहचती करावी तसें न केल्यास गंधर्वाचे खर्चासह व वरील डागीन्यासह रितीप्रमाणें जतवीज केली जाईल व नोटीसिचा खर्चही तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० १६-५-१२ इ.

सही

गुलाबदास गुरू चतनदास ऊदसी
रा. जळगांव हल्लीं मु. मलकापुर द. खु.

नो. नं. २६३

## नोटीस

रा० रा० फत्तेसिंह महेताबसिंह रघुवंशी रा. आकोट यांसः–

खालीं सही करणार इजकडून नोटीस दिली जाते कीं माझा मालक मैयत होऊन अजमास वर्षे ५ झालीं. त्यांचे वारल्या नंतर ४।६ चारसहा महिन्यांनीं तुह्मी मजला माझे दोन्हीं मुलीसह माझी स्थावर जंगम ईष्टेट हिसकून घेऊन नुसते अंगावरील कपड्यांनीं काढून दिलें. व माझी स्थावर जंगम ईष्टेट अन्यायांनीं दाबून बसला तुह्मी माझे मालकाचे मामा आहांत माझे मालकाचे स्वसंपादीत इष्टेटीवर तुमचा हक्क कायदेशीर नसून तो हक्क माझा व माझी अज्ञान मुलगी एक जिवंत आहे तिचा ‘ अमा ’ आमचा–उभयतां मायलेकींचा हक्क आहे. तुह्मी अन्यायानी जी स्थावर जंगम ईष्टेट माझे नवऱ्याची दाबून बसलां ती सर्व नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत चार पंचासमक्ष माझी मजला परत देऊन माझी रसीद घेणें व माझे शेत तुह्मी वाहून खाल्ले त्याचे पिकाचे नुकसानीसह रकम देऊन रसीद घेणें तसे न केल्यास रितीप्रमाणे कायदेशीर तजवीज केली जाईल व या नोटीसीचा खर्चही तुह्मांस द्यावा लागेल. माझी अज्ञान मुलगी अविवाहीत असून तिचे लग्नकार्य होणें आहे. मुलीचे व माझे उदरनिर्वाहाची सोय मुळींच नाहीं. करितां माझी स्थावर जंगम ईष्टेट मजला देऊन रसीद घेणें तसें वरील मुदतींत न केल्यास रितीप्रमाणें व्यवस्था केली जाईल कळावें तारीख १६-५-१२ इ.

सही

सिताबाई जवजे चिन्नूसिंह रघुवंशी आकोटकर निशानी खुद्द
हातची बांगडी
दस्तूर मोहनसिंह रुपसिंह रघुवंशी
मलकापूर वऱ्हाड

नो. नं. २६४

## नोटीस

नोटीस बेशमी रा० रा० रामचंद्र वल्लद नारायण गुरव (कथलकार) रा. मु. कारंजा (लाडाचे) ता० मुर्तिजापूर यांस–

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचेशी माझे लग्न होऊन सुमारें ९।१० वर्षे झालीं. मी वयात आल्यावर सुमारें ४ वर्षे आपणाजवळ राहिले परंतु आपला जनरीतीप्रमाणें मजशी व्यवहार होईल अशारीतीनें तुह्मी वागला नाहीं. ह्मणून मी माहेरी जाऊन राहिली त्यास आज सुमारें ५-६ वर्षे झालीं. ही वर्षे काळाची गेली व मला माझे चरीतार्थाबद्दल दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागले असो मी आपलेबरोबर नांदण्यास तयार आहे. पण माझा संसार आपले बरोबर होण्याचा संभव दिसत नाहीं माझा विचार आतां गंधर्व करण्याचा आहे. व मला माझा पोटगीखर्च दरमहा ५ रुपयेप्रमाणें लागला तर एकंदर ६ वर्षांचें ३०० रुपये ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत ३०० रुपये द्यावे. व फारकती द्यावी. वरील मुदतींत आपलेकडून कांहींच न कळल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग आपला नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. व रुपयाबद्दल योग्य तजवीज केली जाईल. कळावें ता० १९-५-१२ इ.

सही

गया मर्द रामचंद्र गुरव राहणार
गिरोली तर्फे भोंडू नारायण
राहणार गिरोली द० खु०

नो० नं० २६५

## नोटीस

नोटीस बेशमी रोशनअली व झिमु वल्लद परवरशाअली राहणार उमरावती यांना—

खालीं सही करणार याजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुमची नोटीस मिळाली ती सर्वस्वी खोटी आहे. ता० १०-१२-१९०९ रोजीं मी तुह्मास शेत सर्वे नंबर ५७।६० असें दोन शेता बद्दल तुह्मांस दोन वर्षांचा पट्टा लिहून दिला होता. १९-९।१९१० ह्या सालाबद्दल दोन्ही शेताची रक्कम तुह्मास देऊन तुमचा पैशाचा निकाल केला. पुढें सन १९११ सालांत सदर्हु दोन्ही शेतें मी तुमचेजवळून खरेदी घेतली आहे. खरेदीखताचें वेळीं तुह्मास पट्टा मागितला असतां तुह्मी असें सांगतां कीं, सदर्हु पट्टेखत गहाळ झालें आहे. सदर्हु प्रमाणें असून तुह्मी विनाकारण खोटी नोटीस दिली आहे. तरी तुह्मास असें कळविण्यांत येते कीं तुह्मी जर आमचेवर खोटी फिर्यादवगैरे केल्यास आह्मी त्याचे मुळींच जबाबदार नाहीं. कळावें ता० १६-५-१९१२ इ.

सही

जग्या वल्लद चित्या माहार राहणार
वाई प्रगणें माना तालुका
मुर्तिजापूर

नो० नं० २६६

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस सविनय कळविलें जाते कीं माझा मामेसासरा फत्तेसिंह महेताबसिंह रघुवंशी दलाल आकोट यांनीं माझी स्थावर जंगम इष्टेट माझें नवऱ्याची असलेली त्यांचे वारल्यानंतर ४-६ महिन्यांनी हिसकून घेऊन अन्यायानी दाबून मजला अंगावरील कपड्यांनीं माझे मुलीसह काढून दिलें वास्तव आकोट येथील शेत सर्वे नंबर ६३९ चे एकर ६ गुंठे ७ आकार रुपये १६=१४ चे व राहते घर खपरेलचे टेकडी जवळील असे कोणी त्यांचे जवळून गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे प्रकार घेऊं नये. घेतल्यास त्याजबद्दल जबाबदारी माझेवर नसून वरील इष्टेटही जबाबदार राहू शकणार नाहीं सबब जाहीर नोटीसीनें कळविलें आहे. तारीख १६-५-१२ इ.

सही

सिताबाई जवजे चिन्नूसिंह रघुवंशी
आकोटकर नि० खुद्द हातची
बांगडी
दस्तुर मोहनसिंह रुपसिंह रघुवंशी
मलकापूर

नो. नं. २६७

## नोटीस

नोटीस बेशमी -गणपत वा॥ जानजी मोपळे माळी व गुलाम मोहेदिन वा॥ शेख अमीर मुसलमान उभयतां राहणार मौजे निज्यामपूर प्रगणें अडगांव तालुके आकोट जिल्हा आकोला.

यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे राजेगांव प्रगणें अडगांव ता० आकोट जि० आकोला येथील शेत सर्वे नं. २३ निशाणी इनाम शेत सालीम, सदर्हु शेत आह्मी तुह्मांस पांच वर्षेपर्यंत स्वामीत्वानें वाहण्यास दिलें आहे. सदर्हू शेताचे स्वामीत्वाबद्दल ठरले ते रुपये १०० दर वर्षाचे दरवर्षास देण्याचे तुह्मी कबूल करून पट्टा नोंदून दिला आहे. असे असून ३ वर्षे झाली स्वामीत्व देण्याविषयीं घसावसी करून व्याज न देता वेळीं अवेळीं दिलं. आणि यंदाचे ४ थे वर्षे असून स्वामीत्वाचे रुपये अद्यापपर्यंत आले नाहींत. व हल्लीचे पांचवे पीक तुमचे घेणें राहीलें आहे. वरून पुढील सालचे स्वामीत्व देण्याचा संभव मुळींच दिसत नाहीं. आणि पट्ट्याचें शर्तीप्रमाणें सदर्हू शेतांतील कुंधाकाडी काढण्याची किस्तकारी अद्यापपर्यंत केलीच नाहीं. आणि तुह्मी आपलेतर्फे दुसऱ्यास शेत लागवण करीत आहा ह्मणून ऐकले तरी तुमचे कडून वहिती न झाल्यास उभयतानीं तुह्मी राजीनामा द्यावा ह्मणजे तुमची तक्रार राहणार नाहीं. व माझे चुलतीस ३० रुपये दिले ह्मणून तुह्मी सांगितलें व ३० रुपये शेतसारा असें रुपये ६० व त्यापैकीं राहीलेले रुपये ४० व मागील सालचे रुपये ६ एकुण रुपये ४६ माझे मजला अद्यापपर्यंत कां दिले नाहींत तरि आतां रुपये ४६ व आजतारखेपावेतो सदर्हू रुपयाचे व्याज व नोटीशीचे खर्चासमेत नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आह्मांस द्यावे. तसे करण्यास चुकाल तर दस्ताऐवजाचे शर्तीप्रमाणें आह्मी आपले तर्फे लागवण करूं कारण लागवणीचे दिवस संपत आले आहेत. व स्वामीत्वाचे रुपयाबद्दल फीर्याद करून कोर्ट खर्चासमेत भरून घेऊं आणि सदर्हू शेत यंदा तुह्मांस आह्मी देऊं शकत नाहीं. कारण स्वामीत्वाचे रुपये व सदरहु शेताची दस्ताऐवजाचे शर्तीप्रमाणें कांहींएक किस्तकारी वगैरे केली नाहीं तरि आतां यापुढें तुमची तक्रार मुळींच ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली तारीख ७-५-१२ इ.

सही

श्रीधर लक्षीताराम टेकाडे रा०
कनवे अडगांव द. खु.

नो. नं. २६८

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक यांना कळविण्यांत येतें कीं आमची चुलती नामें सोनाई मर्द सखाराम ठाकरे कुणबी रा० खंडाळे ता० बाळापूर इच्या नांवानें आमची वडिलोपार्जित इस्टेट आहे. तरी तिजजवळून आमच्या सहीशिवाय तिला त्या इस्टेटीवर कर्ज वगैरे देऊं नये व गहाण, खरेदी, बक्षीसही घेऊं नये घेतल्यास ते बातल असें कळावें. तारीख २२।५।१९१२ इ०

सही

मारुती वा॥ पुंजाजी राहणार खंडाळे
दस्तुर खुद्द.

नो० नं० २६९

## नोटीस

नोटीस बेशमी सोनाई मर्द सखाराम ठाकरे कुणबी रा० खंडाळे ता० बाळापूर पो० आकोला इसः––

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुझा नवरा व माझा बाप हे सख्ये बंधु होते. व सर्व जिनगी त्यांनीं समाईक मिळविली होती तर ते आतां दोघही वारलें. ती इस्टेट आतां तुझे नांवे आहे. ती तुझ्या हयांत दम आहे तोपर्यंत तुला खाण्यास हरकत नाहीं. परंतु तुला विकण्याचा किंवा गहाण, खेरदी, बक्षीस, वगैरे देण्याचा अधिकार नाहीं. कारण तूं मेल्यावर त्या इस्टेटीचा वारसदार मी आहे. त्या जिनगीवर कर्ज वगैरे करूं नये. वडिलांचे हातचें कांहीं एक कर्ज नाहीं. तर या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तूं जर कोणास गहाण वगैरे दिल्यास त्याची जबाबदारी इस्टेटीवर राहणार नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे कळावें. तारीख २२।५।१२ इतक्या उपर तूं जर इस्टेटीचा कांहीं किंवा कोणत्याही प्रकारें व्यवहार करशील तर मला कोर्ट मार्फत तुझे अन्नवस्त्राची रक्कम ठरवून घेऊन इस्टेट माझे ताब्यांत घेणें भाग पडेल कळावें.

सही

मारुती वा॥ पुंजाजी ठाकरे राहणार
खंडाळे ता० बाळापूर द० खुद्द.

नो० नं० २७०

## नोटीस

नोटीस बेशमी मारोती वा राघोजी कुणबी करडे रा० कदमापूर ता० खामगांव

यांस–

खालीं सही करणार यांजकडुन नोटीस देण्यांत येतें कीं मोजे तुलंग बुजरुख ता० बाळापूर येथील शेते

| नंबर | एकर गुंठे |
|---|---|
| ५२ | २६०२७ |
| ५२ | २१०३४ |
| ७३ | ३४०३५ |
| ७२ | ३२०२१ |
| ८२ | ३२०३५ |

ही शेते पांच वर्षांकरितां सन १३२२ ते १३२६ पावेतो धनको कल्यानचंद साहू दुकान देवळे तर्फे वहीवाटदार न्याहलचंद दुर्लाचद दुकान बाळापूर यांजपासून दर साल रुपये १२५० साडे बारासे स्वामीत्व देण्याचे करारानें वहीतीस ता० ११-३-१२ चे रजीस्टर पट्टेखतावरून आह्मी ह्मणजे पन्नालाल रेणुलाल, २ हनोती वा जानजी, ३ रावजी वा सुर्यभान, ४ मारोती वा राघोजी, ५ मारोती वा भगुर्ज, ६ उकर्डा वा खंडुजी असे सहाजन मिळुन घेतला. असे असुन तुह्मी सदहू शेतात काम करण्यास घेत नाहीं व तुह्मी आपल्या हिशाप्रमाणें खर्चही लावीत नहीं व मनास वाटेल तशा गोष्टी सांगता असें करण्यात तुमचा काय हेतु आहे तें काहींच समजत नाहीं तरी अजमासानें असेच आह्मी समजले पाहीजे की सदरहु शेतात खर्च लावण्याची तुमची शक्ती नहीं व नागनींत शरीक होण्याची तुमची मुळींच इच्छा नहीं सबब या नोटीशीनें अगदीं निक्षून कळविण्यांत येते की ही नोटीस दिल्या तारखेपासुन सदरहु पट्टेखतवरून सदरहु सर्व शेतांत तुमचा अगदींच हक्क राहीला नाहीं तुमचे काहीं ह्मणणे असल्यास ही नोटीस पावल्यापासुन दोन दिवसांचे आत आह्मांस लेखी कळवावे व ही नोटीस आह्मांस देणे भाग पडले सबब या नोटीशीचा खर्च व जाण्यायेण्याचा आगगाडीचा खर्च व खाण्यापिण्याचा खर्च अशी एकदर रक्कम आह्मास देऊन आमची पावती घ्यावी तसे न केल्यास कोर्ट मार्फत सर्व रक्कम भरून घेतली जाईल कळावें ता० २।५।१२ इ.

दस्तुर विष्णु प्रभुराम रा. आकोला

सही

खुद स्वतः मालक व चवघा तर्फे वहिवाटदार पन्नालाल रेणुलाल द० खु०

नो. नं. २७१

## नोटीस

नोटीस बेशमी विश्वनाथ नागोसा रंगारी रा० खामगांव

यांस:–

आह्मी खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं सजनपुरी येथील शेत सर्वे नंबर १४ येकर ३० गुंठे १६ आकार रुपये ६॥ या शेताचे खाते आह्मा भावाचे गणपत वा जानजी यांचे नांवे असून ते आपण वाहातां तर शेत आपले जवळ किंवा आपले वडीलाजवळ कर्ज आलें या संबंधाचें जे कांहीं कागदपत्र वगैरे असतील ते आह्मास पंचलोकांसमक्ष दाखवावें कर्ज वगैरे घेणें असल्यास रितीप्रमाणें आह्मी देण्यास राजी आहो. कागदपत्र न दाखविल्यास शेत वाहूं देणार नाहीं. ह्मणून वगैरे मजकुरची नोटीस यापूर्वी ता. १६-३-१२ ईसवीची वऱ्हाडसमाचारातून दिली आहे. नोटीशीचे उत्तर आज पावेतो न आल्यामुळें नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत उत्तर द्यावे उत्तर न आल्यास सदर्हू शेत आह्मी रिती प्रमाणे वाहूं आमच्यावर कोणत्याही तऱ्हेनें जबाबदारी राहील नसून यदाकदाचित् कोर्टांत दावा आणल्यास कोर्टखर्च आह्मा-कडून मीळणार नाहीं कळावें तारीख १९५१२ इ.

सह्या

१ संपत वा जानजी याचे हातची नि. असे
२ जानकीराम वा जानजी याच हा. नि.
३ दवलत वा जानजी याचे हा. नि. असे

नो. नं. २७२

## नोटीस

नोटीस बेशमी तानकी मर्द रोडी कुकडे राहणार गायगाव बु॥ हल्लीं मु० झाडेगांव ता० खामगाव जि० बुलडाणा

इसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुझा नवरा नामे रोडी वल्द नारायण कुकडे हा माझे बापाचा आतेभाऊ असल्यामुळें तो आमचे घरीं राहत होता व त्याचे लहाणपणापासून पालनपोषण व लग्नवगैरे माझे बापानीच केलें आहे. व तो सज्ञान होईपर्यंत आमचे घरीं राहात होता पुढें काहीं कारणामुळें घरात न नल्यामुळें व तुझे नवऱ्यास काहीं खाण्यापिण्यास आधार नसल्यामुळें माझे बापाने रोडी यास मौजे गायगाव येथील आमचे खुद्द मालकीचे शेत स० नं० ८ एकर ११ गुंठे ०२ आकार रुपये १५-१-६ या शेतांतील निम्मे शेत पूर्वेकडील भाग जो हयात आहे तोपावेतों त्यास त्याचे स्वतःचे उदरपोषणार्थ दिलें होतें व त्यापैकींचे निमे शेत अजून आमचे आमच्याजवळच आहे सदहु निम्मे शेत वर लिहिलेले तुझे नवऱ्यास आमचे वडिलांनीं पूर्वी कोणतही प्रकारें खरेदा बक्षीसवगैरे करून दिलेले नसून हल्लीं तुझा नवरा नामे रोडु हा दीडवर्ष झाले मरण पावला आहे. व तूं हल्लीं सदहु शेत कोणास विकून दुसरा नवरा करून जाण्याचें समजल्यावरून तुला या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सदर्हु शेतांतील नुजजवळचा निम्मे हिस्सा यापुढें कोणास कोणत्याही प्रकारे गाहाण, खरेदी, बक्षीस अथवा माड्यानें देता येत नाहीं इतकेंही करून तूं त्याची लबाडीनें कोणास विक्री गाहाण अथवा बक्षीस व माड्यानें दिल्यास तो सर्व लेख बनावट व खोटा समजला जाईल. व त्याजबद्दल तुजला आमचेकडून जबाबदार धरले जाऊन तुजवर कोर्टात फिर्याद करून सदर्हु शेतासंबंधी लागणारा सर्व खर्च तुझेजवळून भरून घेतला जाईल करितां सदर्हु शेत आमचे विचाराशिवाय कोणास विकल्यास त्याला तूं फसविल्यास रखे होईल व त्याचाही बोज्या तूजवर राहील करितां तूं असे लबाडीचे वर्तन करून तूं कोणास फसवूं नये ह्मणू। या नोटिशीनें सूचवितो कीं तूं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तूं आमचेकडेस येऊन सदर्हू शेताबद्दल आपसांत निकाल करून टाकावा व त्याबद्दल आमचे जवळून पावती घ्यावी. कळावे तारिख १८ माहे मे सन १९१२ इ.

द० गणपत तुकाराम टोंगळे राहणार शेगांव द० खु०

सही

नथु विठोबा पाटील रा० शेगाव

द० खु०

नो० नं० २७३

## नोटीस

नोटीस बेशमी सेवंती मर्द मोतीराम पाटील कार्जाखेड हल्लीं राहणार मांडव ता० बाळापूर

इस —

खालीं सही करणार राधी मर्द सुकदेव राहणार गव्हाण ता० खामगांव इजकडून नोटीस देण्यात येते कीं तं माझी सखी भावजई आहेस व माझा भाऊ मोतीराम हा मरण्यास पांचसहा महिने झाले. त्याची वडिलोपार्जित जिनगी येणेंप्रमाणें—

मौजे कार्जाखेड येथील मेळाचे शेत सर्वे नं० १५ पैकीं २ एकर१९ गुंठे ०२० आकार रुपये १७ ४ याचे खाते मोतीराम रवजी याचे नवें असून यांतील दोनत्रितिआंश आहे. व शेत सर्वे नं० १५ एकर १० गुंठ ०३९ आकार रुपये १९॥। याचे खाते यमुना मर्द भोनाजी ह्याचेन याचे नावे आहे यांतील हिस्सा एकात्रेतिआंश आहे. याचे खातें माझा भाऊ मेल्यानंतर माझे नावानीं झाले होतें. त्याच्यावर मालकी माझा आहे. माझा चुलता सुपडा पाटील हा तीसऱ्या पिढीचा आहे. यानें अपील करून तुझे नावें लावले तर आता या नोटिशीनें कळवितें कीं तूं जोपर्यंत हयात आहे तोपर्यंत त्याचा उपभोग घ्यावा. तूं कोणास गहाण खरेदी किंवा बाक्षिस देऊं नये. व त्याच्यावर कोणाचे कर्जही काढूं नये. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. मी तुला खाण्यापिण्यास देण्यास तयार आहे यापुढे या जिनगीवर आपण कोणाचे कर्ज काढल्यास व गहाण खरेदी बाक्षिसपत्र दिल्यास तें रद्द समजलें जाईल. कळावें ता० २२-५-१९१२

सही

राधी मर्द सुकदेव पाटील राहणार गव्हाण ता० खामगाव नि० हातची बांगडी असें

नो० नं० २७४

## नोटीस

नोटीस बेशमी नाना वा माधव पाटील २ रुपा वा बाळकृष्ण पाटील ३ गोविंदराव श्रीपतराव देशमुख त्रिवर्ग राहणार मोमनाबाद ता० मलकापूर व सिताराम ना नटवाजी पाटील राहणार वरवटबकाल ता० जळगांव जि० बुलढणा यांना

नोटीस देणार गंगाई मर्द तोताराम पाटील राहणार असलगांव मी आणि माझी सवत असे दोघे मिळुन तुह्मास कुलमुखत्यारपत्र, कोर्टाचें काम व घराची व्यवस्था ठेवण्याबद्दल, देवघेवीबद्दल मुखत्यार नेमिलें होते. त्याप्रमाणें आपण कोणत्याही प्रकारची व्यवस्था ठेविली नाहीं. करितां नोटिशीनें कळविते कीं नोटीस पावल्यापासून तुमचे चौघाचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. याउपर आपण माझेसंबंधाचा कोणताही व्यवहार करूं नये. केल्यास तो बातल समजला जाईल. कळावें ता० २३-५-१२ इ

सही

गंगाई मर्द तोताराम पाटील रा० असलगाव नि० हातची बांगडी

नो० नं० २७५


## *FEVER-AGUE and INFLUENZA.*

A posively cured by Batliwala's Ague Mixture and Pills. They have stood the only real test. The test of use and time. O all chemists and idalers.

Rs. 1 each.

Batliwala's Tonic Pills for pale people is a valuable remedy in all cases of overwrought brain work, impotency, weakness, early stage of consumption and indigestion, etc.

Re. 1—8 ans. each

Batliwala's Tooth-Powder is scientifically mixed with "MAYAPHAL" and English antiseptic drugs, Ans. 4.

Batliwala's Ring-worm Ointment, cures ring-worm, Dhobies, itch, ect., in a day. Ans. 4 each.

May be had of all deaiers, or of

DR. H. L. BATLIWALA, J P.
Warli Laboratory, Dadar BOMBAY
N 276

## विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरें सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

अमली हमसे मगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रिया, गौप्यगातथ. कामस्थान सालासगारि, वर्तासोभागुशण, वस्त्रतआदवमधान पुत्रस्टीकर्म, नपुसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुके भाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रा विद्या अदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडी अलीगड.

नो० नं० १९


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.